# सूरज गातडे

## अ हेवी प्राईझ



मि.वाघ
कथा

# अ हेवी प्राईझ्

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अ हेवी प्राईझ्

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

अ हेवी प्राईझ्
सूरज काशिनाथ गाताडे
चिंगळे गल्ली, पेठ वडगांव
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
महाराष्ट्र 416112
mob.no – 9890137797, 9021584727
surajgatade26@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन  : २१ डिसेंबर २०१८



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

# मनोगत

नमस्कार वाचनप्रेमिंनो,

माझ्या पूर्वीच्या पुस्तकांना खूप चांगल्या प्रतिक्रिया दिल्याबद्दल मी आपला सर्वांचा मनापासून आभारी आहे...

ईसाहित्यने केलेल्या या सहकार्याबद्दल मी त्यांचा आणि वाचकांचाही खूप ऋणी आहे. यांच्यामुळेच मला वाचकांपर्यंत पोहोचता आले. आज वाचन संस्कृती संपत चालली आहे, असे सर्वजण म्हणत असताना ईसाहित्यची ही साहित्य चळवळ वाचन संस्कृतीला उभारी देणारी आहे. त्यामुळे ईसाहित्यचे सहस्त्र आभार...

आपण सर्वांनी मला दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल आणि प्रतिसादाबद्दल एक ‘थँक यू गिफ्ट’ म्हणून नव्याने या कथा मी खास ई साहित्य व वाचकांसाठी लिहिल्या आहेत. या कथांची पार्श्वभूमी जरी वास्तविक असली, तरी या कथांचा वास्तवाशी काही एक संबंध नाही. या पूर्णपणे एक काल्पनिक कथा आहेत. आशा आहे आपणा सर्वांना या कथा आवडतील... काही चुका आढळल्या तर जरूर कळवा...


सूरज काशीनाथ गाताडे.

पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

फोन नं. - 9890137797

व्हॉट्स एप नं. - 9021584727


इ मेल. - surajgatade26@gmail.com

सूरज गाताडे यांची ई साहित्यवर प्रकाशित ४ पुस्तके:

१) द डेथ ऑफ लिंकन्स मदर - वैज्ञानिक शोधकथा




२) डेथ विल - वैज्ञानिक शोधकथा





३) दे किस्ड् बाय मिस्टेक - प्रेमकथा




४) द पॅरासाइट




५) फ़्लेम




कृपया ही पुस्तके सुद्धा वाचून

आपल्या प्रतिक्रिया व सूचना कळवा...

अनेक धन्यवाद...

सुरज गाताडे

mob.no – 9890137797

# आभार



नेहमीच मोलाची साथ दिल्याबद्दल सुनील सामंत सर आणि ई - साहित्य टीमचे अनेक आभार.

आणि वाचकांनाही खूप सारे धन्यवाद. नेहमीच आपल्या प्रतिक्रियांनी सतत काही चांगलं करण्यासाठी आपल्या प्रेमभऱ्या शब्दांनी प्रोत्साहन दिल्याबद्दल मी वाचकांचा अपरिमित ऋणी आहे...

सूरज काशीनाथ गाताडे.
पेठ वडगांव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर
फोन नं. - 9890137797
व्हॉट्स एप नं. - 9021584727
इ मेल. - surajgatade26@gmail.com

काही चुका असतील, तर नक्की कळवा. आपल्या सूचना आणि प्रतिक्रियांच्या प्रतीक्षेत...

**या कथेचा आपण आनंद घ्याल अशी आशा करतो...!**

## पूर्वीची प्रकाशित पुस्तके (अनुक्रमे)

१) द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf

२) डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजीकल क्राइम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf

३) दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

४) द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf

५) फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजीकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf


सूरज गाताडे

नांव - सूरज काशिनाथ गाताडे.

पत्ता - चिंगळे गल्ली, पेठ वडगांव, ता. हातकणंगले,

जि. कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२

ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

# प्रस्तावना

मिस्टर वाघ परत आलाय. पूर्ण एक वर्षांनंतर. 'डेथ विल' प्रकाशित झाल्यावर मिस्टर वाघच्या पुढील कथांसाठी वाचकांकडून बरीच मागणी आली. पण मला इतर प्रकारही हाताळायचे होते. म्हणून मग 'दे किस्ड् बाय मिस्टेक', 'द पॅरासाइट' या कादंबऱ्या आणि 'फ्लेम' हा चार कथांचा कथासंग्रह घेऊन आलो.

शिवाय डिटेक्टिव्ह फिक्शन लिहायचे म्हटले, की बुद्धीची खूप कसरत होते त्याचबरोबर चांगले प्लॉट्स सुद्धा असावे लागतात. असे नाही, की प्लॉट्स नाहीत; पण 'डेथ विल' मध्ये म्हंटल्याप्रमाणे मी खरंच आळशी आहे. पण अगदीच तसे काही नाही. मिस्टर वाघला मी मुद्दामच होल्ड केले होते. कारण फक्त प्लॉट्स असून चालत नाही. मला मिस्टर वाघ बद्दल कोणतेही कॉम्प्रोमाईज करायचे नव्हते. बेस्ट नसेल, पण किमान बेटर तरी घेऊन यायचे होते. म्हणून इतके दिवसाचा हा थांबा! 'डॉक' सुद्धा त्यामुळेच होल्डवर आहेत. सामाजिक दुर्भावनांबद्दलची चीड म्हणजे मिस्टर वाघ. पण मिस्टर वाघला वाईटही म्हणता येत नाही, कारण समाजात काही वाईट घडत असले, तर त्याबाबत गप्प बसणेही योग्य नाहीच. हा! पण म्हणून आपणही कायदा हातात घ्यावा असा त्याचा अर्थ नक्कीच होत नाही. यावर उपाय काय; तर एक चांगला, समजूतदार, जबाबदार व कर्तव्यनिष्ठ नागरिक होणे हाच!

आणि मिस्टर वाघ याचसाठी मला प्रेरणा देतो. चांगल्या - वाईटाचा ऊहापोह करण्याचे मिस्टर वाघ हे एक साधन आहे. आणि म्हणूनच मिस्टर वाघला पुन्हा घेऊन आलो आहे. असो मागील कथेप्रमाणे मिस्टर वाघचा हा सायकॉलॉजीकल खेळ सुद्धा आपल्या सर्वांच्या पसंतीस पडेल अशी अशा करतो... **धन्यवाद!!!**

ई-साहित्य वाचकांना साभार समर्पित...

आणि

मिस्टर वाघला प्रेरित करणाऱ्या त्या सर्व सामान्यांना

म्हणजे आपल्या सर्वांनाच अर्पण...

# "अ हेवी प्राईझ्"

## लेखक - सूरज काशिनाथ गाताडे



# अ सब्जेक्ट ऑफ रिवोल्युशन

खूप दिवस झाले मिस्टर वाघला भेटून. त्याच्या घरी जाण्याची माझी काही हिंमत होत नाही (कशी होईल? हा घरात विषारी साप पाळतो). तोच येतो अधून मधून माझ्याकडे. बरेच दिवस तोही माझ्या घराकडे फिरकलाच नाही. पण काल येऊन गेला.

ते एक बरे आहे, की आई घरी नसतानाच हा येतो. नाही तर माझे अशा माणसाशी संबंध आहेत म्हंटल्यावर तिला खूप धक्का बसेल, काळजीत पडेल ती... ही मला वाटणारी भीती त्याला जाणवली असावी कदाचित. म्हणूनच तो कधी आई असताना येत नाही, पण तसे त्याने कधी स्पष्ट सांगितले नाही. ब्लॅक ब्लेझर, रिंकल फ्री अँड स्टेन फ्री प्योर कॉटन व्हाईट शर्ट व डार्क ब्लू जीन्स असा त्याचा पोशाख होता. असो, तो आला आणि नेहमी प्रमाणे स्वतःच्याच हातांनी चहा करून घेतला. मीही नेहमी प्रमाणे काही लिहीत होतो, काय ते नाही सांगू शकणार. कारण ते मिस्टर वाघबद्दलचे सिक्रेट डॉक्युमेंटेशन आहे. त्याच्याही न कळत मी ते नोट डाऊन करतोय. कुणी सांगावे उद्या गरज पडेल...

तो आत आला तेव्हाच मी ते सगळे गुंडाळून ठेऊन दिले होते, पण माझी झालेली गडबड पाहून तो काही तरी समजल्यासारखा हसला होता. तरी तो आत

चहा करण्यासाठी गेलेला तेव्हा मी एक अपूर्ण कथा लिहायला घेतली त्याला कळू नये म्हणून.

त्याने माझ्यासमोर चहाचा कप ठेवला.

"काळजी करू नको, या सगळयाची तुला कधीच गरज पडणार नाही!" चहाचा घोट घेता घेता तो म्हणाला. कपाआडूनही त्याच्या ओठांवरचे स्मित मला दिसले.

'आता यापुढे कानाला खडा. आई नसल्यावर मिस्टर वाघविषयी काही घेऊन बसायचं नाही...'

"ते मी कथेसाठी..." मी अडखळत बोलून गेलो.

"सूरज!" त्याने मला हाक मारली. त्याच्या हाक मारण्यात नक्की कोणते भाव होते ते मला अजून ठरवता येत नाहीत...

"हं..." एवढंच माझ्या तोंडून निघाले.

"तुला माझी का भीती वाटते ते मला कळत नाही." असे म्हणून त्याने चहाचा कप खाली ठेवला आणि होलस्टर मधून एक पिस्टल बाहेर काढली. ती होलस्टरमध्ये कशीतरीच कोंबून ठेवली होती.

"हिच्यासाठी नवीन होलस्टर लवकरच बनवावे लागेल..." तो पुटपुटला.

'मी मिस्टर वाघला असे अनऑर्गनाईज्ड् कधीच पाहिले नाही.

मग तो आज असा का?

याचे मन विचलित तर नाही ना?

मिस्टर वाघ; आणि विचलित?

शक्यच नाही. तो खूपच संयमित आहे. आत्ताही वावरताना तो किती सहज वावरतोय... त्याच्यासारखाच! काहीच तर बदल नाही...'

"माऊसर सी नाइन्टी सिक्स, निकनेम ब्रूमहँडल..."

असे म्हणून त्याने एक खूपच विचित्र दिसणारी एक पिस्टल माझ्यासमोर ठेवली.

"इट्स ए हेवी प्राईझ् फॉर माय असायनमेंट टिल डेट..." तो म्हणाला.

याला ब्रूमहँडल का म्हणतात ते मला ती पिस्टल पाहूनच कळाले. तीचे हँडल झाडूच्या दांड्यासारखे लंबगोलाकार होते. तिला हँडल व बॅरेलला जोडणारा एक चौकोण होता. तो काय ते मात्र समजले नाही. पण या चौकोनी पेटीमुळेच त्याची ही विचित्र पिस्टल त्याच्या होलस्टरमध्ये नीट बसली नव्हती व ते खूप विचित्र दिसत होते एवढे मात्र खरे.

"द सी नाइन्टी सिक्स सेमी ऑटोमॅटिक पिस्टल. १८९६ ते १९३६ पर्यंत याचे मॅन्युफॅक्चरिंग जर्मनी मध्ये झाले. फिडलर ब्रदर्स फिडेल, जोसेफ व फ्रेडरिच आणि पॉल माऊसर यांचे डिझाईन व माऊसर व हाण्यांग अर्सनल यांचे मॅन्युफॅक्चरिंग. आपल्या स्वातंत्र्य संग्रामात सुद्धा या पिस्टलचा उपयोग केला गेला

आहे. ती चीन कडून इम्पोर्ट केली जायची. चीन व स्पेन या पिस्टलची नकल करायचे, पण ही १०० टक्के ओथेन्टीक आहे. अशा फक्त १० लाख पिस्टल्सच बनवल्या गेल्या होत्या. इतकी रेअर पिस्टल आत्ता माझ्या कलेक्शन मध्ये आली आहे. या पिस्टल्स कोण वापरायचे माहीत आहे?"

मला नेहमी प्रमाणे बाऊन्सर्स चालले होते, तरी स्वातंत्र्य संग्रामात इंडियन रिवोल्युशनसाठी महत्त्वपूर्ण ठरलेली ही पिस्टल पाहून मीही विचार करायला लागलो. पण मला उत्तर सुचण्यापूर्वीच मिस्टर वाघाने उत्तर देऊनही टाकले.

"भगत सिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, प्रसाद बिस्मिल, अश्फाकउल्ला खान, सुखदेव थापर असे बरेच जण..." हे सांगताना त्याच्या डोळयांत विलक्षण चमक होती. आणि ओठांवर विस्मयकारक हसू.

पण ही नांवे ऐकून एक गोष्ट मात्र माझ्या लक्षात आली, की काही मोजकी नांवे सोडली, तर आपल्याला आपल्या फ्रीडम फायटर्स बद्दल किती माहीत आहे? शेवटची नांवे तर मी कधी ऐकलीही नाहीत. तेही एका अर्थी बरेच आहे म्हणा... एरवी माहीत असते, तरी केले काय असते? इतिहास अभ्यासायचा तो पूर्वी घडलेल्या चुका वर्तमानात व पर्यायाने भविष्यातही टाळता याव्यात म्हणून; पण आपण मात्र आत्ता आपल्या सोयीनुसार इतिहासाचे गठन करतो. शिवाय अशा महान पुरुषाचे भांडवल करतो. यांच्या जन्म व पुण्यतिथ्या साजऱ्या करण्यापलीकडे आणि त्यांच्या कार्याचा आपल्याला हवा तसा अर्थ लावून आपले स्वार्थ साध्य करण्यापलीकडे आपण काय केलंय म्हणा. त्यांच्या तिथ्यांवरूनही वाद होतो तो वेगळाच! प्रयत्न न करता आयते स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वातंत्र्य सेनानींना नांवे ठेवणे आणि त्यांचा त्यावेळचा एखादा

निर्णय कसा चुकीचा होता याचा उहापोह करण्यात सर्व शक्ती खर्ची घालणे आत्ता खूप सोपे आहे आणि असे करण्याला सध्या शहाणपणाचे लक्षण समजले जाते. आजची ही ट्रेण्डच झाली आहे, पण त्यावेळची परिस्थिती काय होती, कोणी कोणत्या परिस्थितीत काय निर्णय घेतले हेही पाहिले पाहिजे. आम्ही किती ज्ञानी हे दाखवण्याच्या होड मध्ये त्या लोकांना नांवे ठेवणे कितपत योग्य हे आपणच विचारात घेतले पाहिजे... त्या काळी एक - एक स्वातंत्र्य सेनानी आपल्या भविष्यासाठी लढले म्हणून आज आपण हे सोकोल्ड फ्रीडम अनुभवतोय. फ्रीडम फायटर्स मध्ये मतभेद, मनभेद असतील, पण त्याचे ध्येय एक होते; आपला भारत! आपणही त्याच विचाराने चालायला नको का? मनभेद असू देत, विचार राष्ट्राचा झाला पाहिजे. पण आपण मात्र हे लोक वाटून घेतलेत, त्यांच्या विचारांचा चुकीचा किंवा हवा तसा अनव्यार्थ लावलाय आणि भांडत बसलोय...

असो, काही स्वातंत्र्य सेनानी माहीत नाहीत ते बरेच. नाही तर त्यांच्याही जाती, धर्म आपण शोधले असते. निदान ते तरी समाधानाने शांत चिरनिद्रा घेताहेत...

माफ करा जरा भरकटलो...

मला विचारात गढलेला पाहून मिस्टर वाघ थोडा वेळ शांत झाला. एक मात्र होते, की ही नवी पिस्टल हाती आल्याने एका लहान मुलाला नवीन खेळणे

मिळावे असे भाव त्याच्या चेहऱ्यावर होते. त्याच्या फॅमिली मध्ये नवीन मेंबर जो एड झाला होता.

मी भानावर आल्यावर त्याने पुढे सांगितले,

"जर्मन, फिलिपीन, मेक्सिकन रिवोल्युशन मध्येही हिचा मोठा सहभाग आहे. वर्ल्ड वॉर १,२, चायनीज सिव्हिल वॉर, रशियन सिव्हिल वॉर, व्हिएतनाम वॉर, अशा खूपशा महत्त्वाच्या घटनांमध्ये सी नाइन्टी सिक्स खूप रिलाएबल ठरली आहे. तुला माहितीये, ७.६३×२५ एमएम माऊसर कार्टेज हे खूप मोठ्या प्रमाणात बनवले जाणारे कार्टेज होते. त्या काळच्या इतर कार्टेजेस् पेक्षा हे खूप खोलवर घाव करायचे. नो वंडर, की १९३५ मध्ये माझ्या आवडीची .३५७ मॅग्नम कार्टेज येण्याआधी ही खूप लोकप्रिय पिस्टल होती!"

बोलून त्याने एक स्टीलची पट्टी खिशातून काढली. त्याला उभे पाच होल्स होते. सोबत काढलेल्या गोळया त्याने त्या होल्समध्ये लोड करायला सुरुवात केली.

मी टरकलो. मला एक कळत नाही हा हे असलं सगळं माझ्या समोर येऊनच का करतो?

"ओरिजिनल कार्टेजेस्" लोड करता करता तो म्हणाला.

पण पाच ऐवजी ती चारच होतीत... एक गोळी गेली कुठे?...

त्याने अतिकाळजीपूर्वक ती स्टीलची पट्टी उभी करून त्या चौकोनी पेटीमध्ये वरून खुपसली. तेव्हा माझ्या लक्षात आले, की ती पेटी म्हणजे मॅगझीन

आहे. पाचच गोळया त्यात बसतात. आणि आता चार गोळया त्यात लोड झाल्या होत्या. त्याने स्टील पट्टी जोराने खेचून बाहेर काढली.

मला जेवढे माहीत आहे त्यानुसार तरी त्याकाळच्या रिव्हॉल्व्हर्सचे मॅगझीन्स सिलेंड्रीकल असायच्या. पिस्टल्सचे मॅगझीन्सही हँडलमध्येच फिट केले जायचे, म्हणूनच ही पिस्टल वेगळी होती.

"चिनी याला बॉक्स कॅनन म्हणतात. याच्या या चौकोनी मॅगझीनमुळे. याचे होलस्टरही चौकोनी बॉक्स असतो म्हणून पण. तो आता मला बनवून घ्यावा लागेल." असे बोलत त्याने पिस्टल लोड केली आणि नेहमी प्रमाणे माझ्यावर एम केली.

मला माहित आहे, हा माझ्यावर गोळी नाही चालवणार, पण याने असे केले, की नेहमीच मी अस्वस्थ होतो, कारण पुढे काही तरी भयानक कळणार याची ती खूण असते...

## माऊसर फायर्ड्

बाबाराव देसाई यांची डेडबॉडी उद्यानात पडली होती. पोलिसांचा पंचनामा चालू होता. इतक्यात तिथे मिस्टर वाघ आला. नेहमीसारख्या त्याला आवडणाऱ्या पोशाखात. हायली डेलिगेटेड केस असल्याने इन्वेस्टीगेशनच्या पहिल्याच टप्प्यात कमिशनरनी मिस्टर वाघला पाचारण केले होते. वाघ डेडबॉडीची पाहणी करू लागला.

बाबाराव यांच्या पाठीत कुणी तरी गोळी घातली होती. बरेच रक्त गेले होते आणि ते बऱ्यापैकी गोठलेले होते. साहजिक दिसत होते, की खून होऊन बराच वेळ झाला होता.

"सकाळचे ७:१३ झालेत. रात्री ११ - ११:३० च्या दरम्यान खून झाला असावा. वेपेन सापडले?" मिस्टर वाघने रिस्ट वॉच पाहत तेथील इंचार्जला विचारले.

"नाही. शोध चालू आहे. पण शक्यता कमी आहे." पोलिसाने माहिती पुरवली.

"कशावरून?"

"डॉग स्कॉड २ तास झाले शोध घेताहेत, पण अजून यश नाही."

"ओके!" आणि वाघने गालातल्या गालात कोणाला कळू नये असे स्मित केले.

"बॉडी हलवा!" तेथून निघून जात मिस्टर वाघने सर्वांना जवळ - जवळ ऑर्डरच दिली.

झालं! बाबारावांची डेडबॉडी अटॉप्सीसाठी पाठवून देण्यात आली. मिस्टर वाघ आला काय आणि निघून गेला काय? सगळेच चक्रावून गेले होते.

दुसऱ्या दिवशी अटॉप्सीचा रिपोर्ट आला. वाघाला कमिशनरनी त्याच्या हेडकॉर्टरवरच बोलवून घेतले. तिथे अटॉप्सी ऑबजर्वर फिजिशियन, पॅथलॉजिस्ट ज्याने एक्च्युअली अटॉप्सी केली, व ही केस हॅंडल करणारे काही ऑफिसर्स उपस्थित होते.

वाघ केबिन मध्ये आला व कमिशनरने बसण्यास सांगण्याची वाट न पाहता त्याच्यासाठी रिकामी ठेवण्यात आलेल्या खुर्चीचा ताबा घेतला.

"७.६३×२५ एमएमची माऊसर कार्टेज त्यांच्या स्पाईनल कॉर्डच्या लंबर व्हर्टिब्रेला छेदून गेली आहे." वाघ अटॉप्सी रिपोर्ट नजरेखालून घालत असताना कमिशनर त्याला सारांश सांगत होते.

"माऊसर! हं?!"

"हो. घावावरून लक्षात येते, की गोळी खूप जवळून मारली आहे. फ्रॉम झिरो डिस्टन्स. म्हणूनच शरीरात गोळी सापडली नाही. क्राईम सीनवर शोध चालू आहे. स्पाईनल कॉर्ड इज व्हेरी वाईटल बॉडी पार्ट. ब्रेन आणि स्पाईनल कॉर्ड मिळूनच तर सेंट्रल नर्व्हस सिस्टीम बनते. यामुळेच तर आपले बॉडी फंक्शन चालते. शंका नाही, की त्यांचा जागीच मृत्यू झाला असेल."

"माऊसर... इतकी जुनी पिस्टल आत्ता कोण वापरत असेल?" केसवर काम करणाऱ्या इन्वेस्टीगेशन टीम मधील एकाने प्रश्न केला?

यावर वाघ नुसताच हसला. नकळतच. म्हणाला,

"लंबर व्हर्टिब्रे म्हणजे रिब केज व पेल्विसला जोडणारे पाच व्हर्टिब्रे होय ना?"

"होय." तिथे असणारा अटॉप्सीचा ऑबजर्वर फिजिशियन उत्तरला,

"लास्टच्या एल फाईव्ह म्हणजे पेल्विस जवळच्या व्हर्टिब्राला गोळी लागली आहे. व्हर्टिब्राचा इंटेरिअर, पोस्टेरीयर आणि रेक्टम खूपच डॅमेज झाले आहे. आतडीही फाटली आहेत." एक्सरेवर पॉईंट करून फिजिशियन म्हणाला.

"गोळीची रेंज काय" कमिशनरने प्रश्न केला.

"झिरो डिस्टन्स आहे म्हंटल्यावर सरळ रेषेतच असणार. नाही." मिस्टर वाघने रिपोर्ट मधून मान वर न बघताच बोलून टाकले.

"हो." फिजिशियननी दुजोरा दिला.

"यावरून एक गोष्ट तरी नक्की लक्षात येते, की कल्प्रिट बाबारावांपेक्षा पाच - सहा इंच तरी उंच असणार. शिवाय त्यांच्या ओळखीचा असण्याचीही शक्यताही आहे." वाघने आपला अंदाज वर्तवला.

"तो माणूस ओळखीचाच असेल असे काही जरुरीचे नाही. काहीतरी कारण काढून किंवा कशाची तरी भीती घालून, ब्लॅकमेल करून अशा बऱ्याचशा कारणांनी अनोळखी व्यक्ती भेटायला बोलवू शकतोच की. बाबाराव देसाई फ्रीडम फायटर आणि सक्रिय समाजसेवक होते. यामुळे त्यांचे खूप लोकांशी संबंधही यायचे. त्यामुळे असा निष्कर्ष काढण्यात काही अर्थ नाही."

नवखा ऑफिसर मध्येच बोलून गेला तसा मिस्टर वाघने त्याला एक जळजळीत कटाक्ष टाकला. मिस्टर वाघचे म्हणणे धुडकावण्याची हिंमत कोणी करत नाही, जरी ते कोणाला पटले नाही तरी. आणि हे या नवीन ऑफिसरला माहीत नव्हते. मिस्टर वाघचे त्याच्याकडे असे पाहणे कमिशनरच्या लक्षात आले आणि त्याने दटावून त्या ऑफिसरला गप्प केले.

"नवीन खाडे, जरा शांत बसा. मिस्टर विजय वाघ कधीच चुकत नाहीत."

"पण सर मी फक्त त्यांच्या तर्कांतील कमजोर दुवा सांगितला. बाबाराव देसाई स्वातंत्र्य सेनानी व समाजसेवक जरी नसते, एक साधारण व्यक्ती असते, तरी त्यांना एका अनोळखी व्यक्तीने भेटायला बोलावणे इतके काही अवघड नाही..."

"खाडे! विल यू शट अप?" कमिशनर त्याच्यावर ओरडले.

"नाही कमिशनर. त्याचे म्हणणे इतकेही चुकीचे नाही." वाघ

"पण मिस्टर खाडे," वाघाने आपला मोर्चा नवीन खाडेकडे वळवला, "एक लक्षात घ्या, खुन्याने बाबाराव देसाईंचा खून केलाय याचा अर्थ त्याचा यामागे काही तरी मोटिव्ह असणार. आणि जिथे मोटिव्ह आहे तिथे यांचा कधी न कधी संबंध आलाच असणार. नाही? रँडम्ली खुनी असा कोणालाही मारणार नाही ना! आणि तुम्ही म्हणताय तसा तो खुनी अनोळखी असेल, तर देसाई त्याच्याकडे पाठ करून का उभे राहतील. त्यांची ही क्रिया हे दर्शवते, की ते भेटायला गेलेल्या व्यक्तीसोबत त्यांचे अगदीच सहज व मोकळे ढाकळे संबंध होते. आणि एक, की अटॉप्सी रिपोर्टमध्ये त्यांची खुन्याशी हातापाई झाल्याची काहीच नोंद नाही. त्यांच्या शरीरावर इतर कोणतीही जखम नाही. ना त्यांना खाली पाडून गोळी घालण्यात आली आहे. इट प्रुव्हज् दॅट ते ओळखीच्याच माणसाला भेटले होते." मिस्टर वाघने एक्सप्लेन केले.

"डिटेल्स?" मिस्टर वाघने कमिशनरला विचारले.

"वय ब्यान्नव वर्षे. उंची पाच फूट सात इंच. ब्रिटिश सरकार विरुद्ध वयाच्या सतरा - अठराव्या वर्षीच त्यांनी सशत्र लढा चालू केला होता. १९४१ मध्ये ब्रिटिश

जनरल ऑगस्टस याचा त्यांनी एकट्यानेच खून केला होता. त्यांना आजन्म कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली होती आणि स्वातंत्र्यानंतरच त्यांना भारत सरकार कडून सन्मानाने मुक्त करण्यात आले. या पूर्वी पंधरा वर्षांचे असताना त्यांनी काही बंदुका स्वातंत्र्य सैनिकांना पोहोचवण्याचे काम करताना ते पकडले गेले होते आणि त्यांना काळया पाण्याची शिक्षा सुनावण्यात आली होती. पण ज्यावेळी त्यांना अंदमानला नेले जात होते, त्यावेळी त्यांनी कसे बसे आपली सुटका करून घेतली व ते भूमिगत झाले. पुढे दोन वर्षांनी त्यांनी जनरल ऑगस्टसला ठार केले. तुम्हाला माहीत आहे त्यासाठी त्यांनी कोणते हत्यार वापरले असेल?"

वाघने नकारार्थी मान हलवली.

"ब्रूमहँडल. माऊसर सी नाइन्टी सिक्स! स्ट्रेंज! इज्नट इट?!"

"येस इट इज!" वाघने दुजोरा दिला.

"म्हणजे तशीच पिस्टल ज्याने त्यांचा खून झाला?" ऑफिसरने आश्चर्याने विचारले.

"हो!" फिजिशयनने पुष्टी केली.

"आणि विशेष म्हणजे बाबारावांना अटक झाली, तरी त्यांनी ऑगस्टसला मारण्यासाठी वापरलेली माऊसर सापडली नव्हती."

"पण एक गोष्ट अनाकलनीय आहे. बाबाराव देसाई यांचा गुन्हा इतका मोठा असून देखील ब्रिटिश सरकारने त्यांना फाशी कशी दिली नाही." नवीनची उत्सुकता चाळवली होती. त्याने प्रश्न केला.

"बाबाराव यांचे वडील श्यामसुंदर हे स्टीलचे मोठे व्यापारी होते. त्यांनी आपल्या मुलाच्या बदल्यात आपली सारी संपत्ती क्वीन एलिझाबेथच्या नांवे केली होती आणि शिवाय व्हाइसराय अँगसला त्यातील काही हिस्सा देऊन क्वीनला समजवण्याबद्दल गळ घातली होती. दुसरे महायुद्ध चालू होते. हत्यारांसाठी मोठ्या प्रमाणात स्टील लागणारच होते. क्वीनने त्यांचे म्हणणे मान्य केले, पण बाबारावांना मुक्त न करता त्यांनी आजन्म कारावासात त्यांना टाकले. दुसरे महायुद्ध चालू असल्यामुळे बाबारावांना सोडून देणे ब्रिटिश सरकारला श्रेयस्कर नव्हते. ब्रिटिशांबद्दलची भीती लोकांमधून नष्ट होण्याची शक्यता होती. म्हणून कडक नजरकैदेत त्यांना बंद करण्यात आले. आपला मुलगा किमान जीवंत तरी आहे म्हणून मग श्यामसुंदरही तेवढ्यावरच समाधान मानून गप्प बसले. सत्तेचाळीसला भारत स्वातंत्र झाल्यावर ते नजर कैदेतून मुक्त झाले." मिस्टर वाघने एक्सटेन्सिव्ह माहिती पुरवली. आणि उठून उभा राहिला,

"ओके. आय एम टेकिंग लिव्ह! बाय!" वाघ कमिशनरच्या केबिन मधून निघून गेला.

बाहेर तो एका ओळखीच्या ऑफिसर सोबत बोलत उभारला, पण त्याचे लक्ष आतील सगळ्यांवर होते. आवाज काही येत नव्हता. पण कमिशनरला बोलताना तो पाहू शकत होता.

कमिशनर नवख्या ऑफिसरला झापत होते,

'मूर्खांसारखे मध्ये मध्ये बोलत जाऊ नका. ही केस मुख्यमंत्री व गृहमंत्री सीबीआयकडे सोपवणार आहेत. होम मिनिस्ट्री व खुद्द पंतप्रधानही या केसवर लक्ष ठेऊन आहेत. याचा निकाल लागला नाही, तर त्यांच्या खुर्च्या धोक्यात येऊ शकतात. विरोधक टपून बसलेच आहेत. मीडिया पाठ सोडत नाही. सगळे त्यांच्या अंगाशी आलंय आणि आपल्या गळयाशी. आपल्याला फक्त प्रायमरी इन्वेस्टीगेशन करायचे आहे. काही दिवसांत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एक समिती इन्वेस्टीगेशनसाठी स्थापन करण्यात येईल. तोपर्यंत आपण काही तरी करून वेळ मारून न्यायचा आहे. वाघला काय करायचे ते करू द्या! मला आपल्या डिपार्टमेंटवर नाकर्तेपणाचा शिक्का नको आहे! जो काही तपास करायचा तो वाघला करू दे. समजलं?'

'म्हणून आपण आपली जबाबदारी सोडून गप्प बसायचे का सर?' नवीनने कमिशनरलाच प्रश्न विचारण्याचे धाडस केले होते. ते पाहून वाघच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. त्याला नवीनची कर्तव्यनिष्ठा आणि त्याचा करारीपणा आवडला होता.

"गेट आउट!" लालबुंद होऊन कमिशनर ओरडले. तो आवाज मात्र हेड क्वार्टरभर घुमला.

ते ऐकून मिस्टर वाघ पुन्हा हसला. पण त्याच्या सोबतचा ऑफिसर मात्र मोठ्याने दचकला.

"चल बाय!" म्हणत मिस्टर वाघने त्याचा निरोप घेतला.

"बाय!" ऑफिसरही आपल्या कामाला पळाला.

# चेसिंग दि फॅमिली

त्यांनंतर पुढचे काही दिवस मिस्टर वाघ बाबाराव देसाई यांच्या कुटुंब सदस्यांचा पाठलाग करू लागला. कधी त्यांच्याशी भेटून चौकशी करायचा. बाबाराव गेली ७ - ८ वर्षे त्यांच्या नातीच्या मुलीकडे प्रभाकडे राहायचे. परिस्थिती खूपच गरीब. प्रभाचा नवरा शेखर एमआयडीसीतील एका फौंड्रीवर कामाला होता.

फौंड्रीचा मालक दहादहा - बाराबारा तास काम करून घेऊन कधी कधी ओव्हर नाईटही राबवून घ्यायचा. पण पगार मात्र कधीच वेळेवर नाही. दिला, तर तो ही तुटपुंजा.

हे आधीच त्रिकोणी कुटुंब प्रभा, शेखर आणि त्यांची पाच वर्षांची मुलगी संस्कृती. कुटुंब लहान असूनही शेखरच्या पगारात त्यांचे चालायचे नाही. तशात तीन महिन्यांपूर्वी बाबारावांची भर पडली होती. त्यांच्या देखभालीचा औषधाचा बोजा आता यांच्यावर येऊन पडला.

मग प्रभा सुद्धा बाबाराव यांच्या येण्याने महिन्याभरात एका खेळणी बनवण्याच्या कारखान्यात नोकरी करू लागली. शेखरच्याच ओळखीने तिला हे काम मिळाले होते. दोन महिने तर तिला सगळे शिकून घेण्यातच गेली. त्यामुळे तिला पगार बंदच होता. पण पुढे काही आशा होती.

मिस्टर वाघ कडून मला कळाले, की बाबाराव देसाई यांचा नातू मेल्यानंतर त्यांच्या पणतूने त्याच्या आईची जबाबदारी त्याच्यावर आहे आणि तो एकावेळी दोन म्हाताऱ्यांना सांभाळू शकत नाही असे सांगून त्यांना सांभाळण्यास नकार दिला. त्यांचा नातू मेल्यावर मग शेवटची नातेवाईक ही प्रभाच उरली होती. बाकी जे इतर नातेवाईक होते तेही त्यांना सांभाळायला तयार नव्हती. जास्तीत जास्त एक दोन आठवडे ठीक; रोज कोण सांभाळणार? असे त्यांचे म्हणणे. कोणी तरी असेही म्हणाले होते, की हा म्हातारा मरत का नाही? एवढे जगून हा करणार काय आहे. बायको, मुलगा, सून, मुलगी, त्याची मुले सगळी तर मेली. काय अमर पट्टा घेऊन जन्माला आलंय काय हे थेर्डं कुणाला माहीत. हे ऐकूनच मग प्रभालाच त्यांची दुरवस्था पाहवली नाही आणि तिने त्यांना घरी आणले होते.

प्रभा जमेल तशी त्यांची काळजी घेत होती. तिचा नवराही काही कुणकुण करत नव्हता. पण हे किती दिवस?... आणि हे बाबारावांच्या ही लक्षात आलेले...

आणि एक दिवस बातमी थडकली. बाबारावांच्या खुनाला चारच दिवस झाले असतील आणि दिनेश याचाही मृत्यू झाला होता. हा तोच बाबरावांचा नातेवाईक होता ज्याने बाबारावांच्या मरणाची कामना बोलून दाखवली होती.

कसा मेला तो? की कोणी मारले असेल त्याला?

सुरवातीला कोणाला असा अंदाज आला नाही, की बाबारावांच्या खुनाचा आणि यांच्या मृत्यूचा काही संबंध असेल... पण पुढे हा त्यांचा नातेवाईक आहे अशी माहिती समोर आल्याने त्या दृष्टीने तपास चालू करण्यात आला होता. या तपासात मिस्टर वाघ अग्रेसर.

दिनेशच्या बॉडीला तर लास्ट मोमेंटला चितेवरून खाली उतरवून मिस्टर वाघने अटॉप्सीसाठी पाठवले होते. त्याच्या या वागण्यावर गावकरी, दिनेशचे संबंधी - नातेवाईक फारच खवळले होते. पण मिस्टर वाघने कोणाच्याच नाराजीला भीक घातली नाही. पोलिसही मिस्टर वाघसोबत असल्याने कोणी काही आवाजही काढला नाही नंतर.

सर्व तपास युद्ध पातळीवर चालू होता. कमिशनरना हवी तशी चालढकल करता येणं शक्यच होतं नव्हतं. वरून त्यांच्यावर खूप प्रेशर येत होतं. याच गडबडीमुळे दिनेशच्या बॉडीचा अटॉप्सी रिपोर्ट काही तासांतच सगळयांच्या समोर होता.

यावेळी मिस्टर वाघ कोठे आहे हे कोणालाच माहीत नव्हते. रिपोर्ट त्याला मेल करण्यात आला...

दिनेश वय सदतीस वर्षे. त्याच्या शरीरावर खोल असा घाव कुठेच नव्हता. एक छोटा कट त्याच्या डाव्या हातावर होता. ज्यातून भळाभळ रक्त वाहून गेले होते. आणि ओव्हर हेमोरेज (अति रक्तस्त्रावा) मुळे तो मेला होता.

पोलिसांनी दिनेशच्या घरात इंटेरोगेशन केल्यावर त्यांना कळले होते, की दिनेशचा मृत्यू झाला तेव्हा तो एकटाच घरी होता. आणि फळे कापून घेत असताना त्याच्या हातावर घाव झाला होता. घरात जागोजागी पडलेल्या रक्ताच्या डागांवरून हे लक्षात येत होते, की दिनेशने रक्त थांबवण्याचा जमेल तो हरेक प्रयत्न करून पाहिला होता, पण काही उपयोग झालेला नव्हता. शेवटी तो फेंट होऊन देव्हाऱ्यासमोर पडला होता. त्याने मुठ भरून हळद आपल्या घावात भरली होती. पण रक्त थांबले नव्हते.

हे सगळे झाल्यावर दोन - तीन तासांनी दिनेशच्या घरातील लोक जे परगावी देवस्थानी गेले होते, ते परतले. पाहतात, तर दिनेशची ही अवस्था. त्याला लगेच हॉस्पिटलला नेण्याची लगबग - गडबड करण्यात आली होती, पण कुणी एकाने तो संपला असल्याची ग्वाही दिली होती.

त्या व्यक्तीला बोलावून घेण्यात आले.

"तुम्ही कोण आणि दिनेश मेलाय हे तुमच्या लक्षात कसे आले?"

आत्तापर्यंत सीबीआय ऑफिसर कार्तिक याने येऊन केस हातात घेतली होती. तो सर्व इन्वेस्टीगेशन रिपोर्ट गठीत केलेल्या समितीसमोर सादर करणार होता. आणि सीबीआय इन्वेस्टीगेशन टीमचा इंचार्ज होता. आल्या - आल्या त्याच्या टीमला कमिशनर कडून ब्रीफ दिला गेला होता. आणि त्यांनी इथून पुढे केस हाती घेतली होती. पण कमिशनर व त्यांची टीम सुद्धा सोबत काम करणार होती.

कार्तिकने त्या व्यक्तीला प्रश्न केला होता.

"मी रवी पवार. पुढच्या गल्लीत पाटील दवाखाना आहे तिथे मी कंपौंडर म्हणून काम करतो."

"आय सी!"

कमिशनरची केबिन, कार्तिकने सविस्तर सगळे पहायचे म्हणून मिटिंग घेतली होती...

"दिनेशच्या रक्तात 'वॉरफरीन' नांवाचे मेडिसीन सापडले आहे. ब्लड क्लॉटिंग डिसऑर्डरसाठी हे औषध दिले जाते. असे दिसते, की त्याच्या रक्तात गुठळया होत असाव्यात आणि त्यासाठी त्याला हे औषध चालू असावे. त्याने जखम होण्याआधी नुकतेच हे औषध घेतले असावे. म्हणूनच त्याचे रक्त वहायचे थांबले नाही. आणि खूप रक्तस्राव झाल्याने तो मेला." पॅथलॉजिस्टनी दिनेशचा अटॉप्सी रिपोर्ट ब्रीफ केला.

"आता ही ब्लड क्लॉटिंग काय भानगड आहे?"

मीडिया आणि ह्युमन राईट्सवाल्या लोकांच्या प्रश्नाच्या भडिमाराला नुकतेच तोंड देऊन आलेले कमिशनर वैतागले होते.

"युज्वली ब्लड क्लॉट्स हे फायद्याचेच असते. त्यामुळेच तर जखम झाली, की काही वेळाने आपले रक्त वहायचे थांबते. पण याची गरज नसतानाही जेव्हा

रक्ताच्या गुठळया व्हायला लागतात, तेव्हा ते धोकादायक ठरते. यामुळे स्ट्रोक किंवा हार्ट अटॅक होण्याचा संभव असतो."

"कमिशनर, दिनेशला असा काही आजार होता का याची चौकशी करा." कार्तिकने फर्मान सोडले.

"नवीन!" कमिशनरनी त्यांच्या कोर्टात आलेला बॉल खाली पडून न देता तसाच नवीनच्या कोर्टमध्ये पोहोचवला.

"येस सर!" म्हणून एक कडक सॅल्युट ठोकून नवीन ही पुढ्यात आलेली नवीन कामगिरी पार पडण्यास निघून गेला.

नवीन गाडी स्टार्ट करणार इतक्यात,

"शाल आय?" कोणीतरी प्रश्न विचारला.

नवीनने काच खाली करून पाहिले. गाडीबाहेर मिस्टर वाघ उभा होता. नाखुषीनेच नवीनने दार उघडले.

"या बसा."

दोघांनी दिनेशच्या घरच्यांकडे आणि त्यांच्या माहितीनुसार त्यांच्या फॅमिली डॉक्टर मोहन पाटीलकडे चौकशी केली या सगळयात त्यांनी रवी पवार या त्याच क्लिनिकमध्ये काम करणाऱ्या कंपौंडरला सोबत घेतले. मोहन पाटीलला ते

भेटले, तेव्हा दिनेशला ब्लड क्लॉटिंग डिसऑर्डर असल्याचे नक्की झाले. आणि ही केस मार्गी लागली(?)

पण आता याला मर्डर म्हणायचे, की अक्सिडेंटल डेथ हे ठरवणे मुश्किल झाले होते. दिनेशच्याच हलगर्जीपणामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले. त्यामुळे सध्या तरी याला अक्सिडेंट कन्सिडर करून पुढील इन्वेस्टीगेशन चालू ठेवण्याचे कार्तिकने ठरवले, पण दिनेशची डेडबॉडी त्यांच्या नातेवाईकांकडे न सोपवता मॉर्गमध्येच प्रिजर्व्ह करून ठेवण्यात आली. हा कार्तिकचाच निर्णय होता.

ही केसच अशी होती, की कोणाच्या भावना दुखावल्या जातील याचा विचार करत बसणे श्रेयस्कर नव्हते आणि हे कार्तिक जाणून होता. त्याला कुठे तरी अजूनही शंका येत होती, की हा खुनच असावा. आणि जरी नसला, तरी त्याला कोणती रिस्क घ्यायची नव्हती. त्याने स्वतःही मॉर्ग मध्ये जाऊन दिनेशची डेडबॉडी पाहिली होती. त्यालाही काही सस्पिशियस पाहताक्षणी तरी वाटले नव्हते.

आणि पुढे आणखी एका मृत्यूची बातमी येऊन थडकली. बाबाराव देसाईंच्याच कुटुंबातली. आणि सर्वांचा मोर्चा त्या घटनेकडे वळला.

बाबाराव देसाई यांच्या पणतूची विरेनची आई वारल्या होत्या... बाबारावांची नातसून लीलावती. जीच्यामुळेच त्याने बाबारावांना सांभाळण्यास नकार दिला होता.

मधल्या काळात मिस्टर वाघ चौकशीसाठी यांच्याकडे आला होता. त्याच्या कडूनच ही बातमी पोलिसांपर्यंत पोहोचली होती.

मिस्टर वाघला कार्तिक, कमिशनर आणि त्यांची इन्वेस्टीगेशन टीम हॉस्पिटलला भेटले. न्यूरो सर्जरी हॉस्पिटल होते ते. हॉस्पिटलच्या चीफ सर्जनला भेटल्यावर त्यांना लीलावतीबाईंची केस हिस्ट्री समजली. तो पर्यंत विरेनला स्टँडबाय ठेवले होते. त्याच्या सोबत वाघ आणि एक सीबीआय ऑफिसर होते. वाघ विरेनकडे पाहून स्मित करत होता. विरेनला त्याचे असे पाहणे असह्य झाले आणि त्याने खाली मान घातली.

विरेनचे वडील रमाकांत मेल्यावर त्याचा लीलावतीबाईंना खूप मोठा धक्का बसला होता. या इमोशनल ट्रोमामुळेच त्यांच्या मेंदूत कळ मारायला सुरू झाली. ती इतकी विकोपाला गेली, की त्यांना या हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले होते.

त्यांना ब्रेन कॅन्सर असल्याचे निदान झाले होते. थर्ड स्टेज. अगदीच नाजूक. तरी सर्जन्सनी त्यांना ऑपरेट केले होते. सर्जरी सक्सेसफुल झाली होती. पण त्या रिकव्हर होत नव्हत्या. त्यांना मेंदूत 'एनाप्लॅस्टिक एस्ट्रोसिटोमस' नांवाचा ट्युमर झाला होता. हा ट्युमर बरा होणारा नाही. तो वाढतच राहतो. पण सर्जरी,

किमोथेरपी (केमिकल मेडिकेशन) किंवा रेडिएशनच्या ट्रीटमेंटने याला आटोक्यात ठेवता येते.

ऑपरेशन झाल्या नंतरही गेली दोन महिने त्या व्हेंटिलेटरवरच होत्या. ऑपरेशन ठीक झाल्याने व इतर ट्रीटमेंट्सही चालू असल्याने त्या जगतील वाचतील, बऱ्या होतील या आशेवर विरेन होता, पण तसे काहीच होत नव्हते. शेवटी व्हायचे ते झाले होते.

विरेनची चौकशी चालू झाली. त्याला व त्याच्या बायकोला सर्जनच्या केबिनमध्येच बोलावून घेतले होते. त्याची बायको रमा तर रडून अर्धमेली झाली होती. सासूचे असे जाणे तिला धक्का देऊन गेल्याचे दिसत होते. तिचे आई - वडील व बाकीचे नातेवाईक एव्हाना हॉस्पिटलमध्ये जमा झाले होते.

विरेन कडून माहिती मिळाली, की रमाकांत त्याचे वडील जाण्याच्या आधीपासून त्याच्या आईच्या लीलावतीबाईंच्या डोक्यात कळ मारायला चालू झाली होती. पुढे तर उलट्याही. पण त्यांनी किरकोळ काही तरी असेल म्हणून लक्ष दिले नव्हते. डोकेदुखीच्या, पित्ताच्या गोळया घेऊन त्या आपले दुखणे तात्पुरते बरे करायच्या. आणि इतके गंभीर काही असेल असा कोणाला अंदाजच आला नव्हता, कारण लीलावतीबाईंना ॲसिडिटीचा त्रास होता व त्यामुळे सतत डोके दुखत असेल, उलटीचा त्रास होत असेल म्हणून कोणीच आणि त्यांनीही लक्ष दिले नव्हते. बऱ्याचदा त्या गोष्टी विसरायच्या, त्यांची नजर कमजोर झाली होती, त्यांना कोऑर्डीनेशन

करणे अवघड जायचे व स्वतःचा तोल संभाळणेही त्यांना शक्य व्हायचे नाही. पण हे सगळं वय परत्वे होत असेल असेच सर्वांना वाटले होते. खरे तर ही एस्ट्रोसिटोमाची लक्षणे होती. ज्याकडे सर्वांनीच दुर्लक्ष केले होते.

रमाकांत वारल्याच्या धक्क्याने जेव्हा लीलावतीबाई घेरी येऊन पडल्या, तेव्हा एका क्लिनिकमध्ये नेल्यावर तेथील डॉक्टरला काही शंका आली आणि त्याने लिलावतीबाईंचे एमआरआय स्कॅन करण्याचे रेकमेंड केल्यानंतर ते या हॉस्पिटलला आले होते. स्कॅनिंगनंतर त्यांना एनाप्लॅस्टिक एस्ट्रोसिटोमस असल्याचे निदर्शनास आले होते.

एस्ट्रोसिटोमा हा ग्रेड थ्री ब्रेन ट्युमर आहे जो सेरेब्रेम (सेंट्रल नर्व्हस सिस्टीमचा सर्वात वरचा भाग) मधील ताऱ्याच्या आकाराच्या ग्लियल सेल्समध्ये तयार होते, ज्याला एस्ट्रॉसाइट्स म्हणतात. हे ब्रेन (मेंदू) व स्पाईनल कॉर्ड (पाठीचा कणा) मध्ये स्थित असते. हे नर्व्हस टिशूजना न्यूट्रिशन पोहोचवण्याचे काम करते व ब्रेन व स्पाईनल कॉर्डवर होणारे मोठे आघात रिपेयर करण्याचेही काम करते. २० - ४०% एस्ट्रॉसाइट्सचा भाग हा ग्लियाने प्रमाणित असतो. ग्लियाला सेंट्रल नर्व्हस सिस्टीमचा ग्लू म्हंटले जाते. हे व्हाईट मॅटर (यात इलेक्ट्रिक इम्पल्सचे वाहक नर्व सेल बॉडीज किंवा न्यूरॉन असतात. हे ग्रे मॅटर चे विविध भाग कनेक्ट करायचे काम करते व हे कण्याच्या आतील बाजूस असते) आणि ग्रे मॅटर (यात नर्व फायबर्स किंवा एक्सॉन असते. विविध न्यूरॉन्स, स्नायू व ग्रंथींना माहीत पुरवण्याचे काम हे करते व हे

कण्याच्या बाहेरील बाजूस असते) या दोन्ही टिशूज् मध्ये असते. सेंट्रल नर्व्हस सिस्टीम या दोन टिशूज् पासून बनलेली असते.

एनाप्लॅस्टिक एस्ट्रोसिटोमस हा ग्रेड थ्री एस्ट्रोसिटोमा (हाय ग्रेड एस्ट्रोसिटोमा) आहे. ग्रेड तीन व चारचे एस्ट्रोसिटोमस हे वेगाने वाढणारे व अतिघातक असतात. त्यामुळे ते कॅन्सरस असतात. आणि म्हणूनच क्युरेबल नसतात.

विरेनच्या वागण्यातून दिसून येत होते, की त्याला अतीव दुःख झाले आहे.

इन्वेस्टीगेशन केल्यावर समजले, की लिलावतीबाईंचे व्हेंटिलेटर कुणी तरी बंद केले होते. त्या कोमात असल्याने साहजिकच हे कोणाला लवकर समजले नाही. आणि कळले तेव्हा खूप उशीर झाला होता.

जनरल आयसीयू मधील व सोबत हॉस्पिटल मधील सर्व एक अन् एक सीसीटीव्ही फुटेज चेक करण्यात आले. संशयास्पद असे काहीच आपडले नाही. मिस्टर वाघ तेवढा हरेक फुटेज मध्ये वारंवार दिसत होता. कार्तिकला त्यामुळे मिस्टर वाघवरच संशय आला. म्हणून आत्तापर्यंत गप्प असलेला व लीलावतीबाईंच्या इन्वेस्टीगेशनमध्ये भाग न घेतलेला मिस्टर वाघ मौन तोडून बोलला. त्याने जनरल आयसीयूचे रात्री एक वाजून छत्तीस मिनिटांचे फुटेज रन करायला सांगितले.

यात विरेन व्हेंटिलेशनपाशी कॅमेऱ्याकडे पाठ करून उभा असलेला दिसत होता. काही सेकंदात तो त्याच्या डाव्या बाजूला आईकडे वळला आणि तो पाणी पीत असताना दिसला.

"हा नक्की काय प्रुव्ह करण्याचा प्रयत्न करतोय? नीट बघा तो जाणून बुजून आपण पाणी पीत असल्याचे दाखवतोय. झुम ऑन द व्हेंटिलेटशन मशीन. त्याचे स्वीट्च विरेन पाणी घेण्याआधी ऑन होते आणि तो पाणी पिताना बंद आहे. आता काय प्रश्न विचारायचे ते विरेनला विचारा. मला नाही!" मिस्टर वाघने कार्तिकला दटावले. त्याच्या तीक्ष्ण नजरेची व सावधगिरीचे हे दर्शन होते.

मिस्टर वाघच्या तीक्ष्ण नजरेतून ही सुक्ष्म गोष्ट सुटली नव्हती. त्याला विरेनवर आधीपासूनच शंका आली होती. त्याने पूर्वी केलेल्या विरेनच्या चौकशी मध्ये कधी तरी चुकून विरेन आई लवकर गेली तर बरे होईल असे बोलून गेला होता. आणि म्हणूनच लिलावतीबाईं मेल्यानंतर मिस्टर वाघ विरेनकडे पाहून सतत स्मित करत होता.

कार्तिकचा एकच सणसणीत हात विरेनच्या कानाखाली पडल्यावर विरेनचा धीर सुटला आणि तो सगळी गुपिते फोडू लागला...

"आईच्या ऑपरेशनसाठी आणि आता तिच्या ट्रीटमेंटसाठी खुळयासारखा पैसा वाया गेला होता. मी एक साधारण माणूस तीस हजाराच्या नोकरीत काय काय

बघणार होतो. जे काय होतं ते सगळं तर ट्रिटमेंटसाठी विकून बसलो. वरून काही कर्जही झाले. आता असह्य झालं होतं. कुठून आणणार होतो मी पैसे?" विरेन हमसून रडत रडत सगळं कथित करत होता.

त्याची बायकोही हुंदके देतच होती. कदाचित हा सगळा प्रकार तिला आधीपासून माहीत असावा. कारण मिस्टर वाघला तिच्या रडण्यात काळजी मात्र वेगळ्याच गोष्टीची वाटत असल्याचे जाणवून गेले होते.

"अरे मग डॉक्टरना सांगून रीतसर तू व्हेंटिलेटर काढू शकत होतास. त्यासाठी हे करण्याची काय गरज होती?"

हे ऐकून कार्तिकच्या डोक्यात तिडीक गेली होती. तो विरेनवर ओरडला आणि त्याच तिरिमिरीत त्याने आणखी चार - पाचदा विरेनला कांफडवले.

विरेन खाली कोसळला. त्याची बायको रमा त्याला सावरण्यासाठी पुढे सरसावली. पण कार्तिकच्या इशाऱ्यावर एका लेडी ऑफिसरने तिला बाजूला ओढले. तिचा आक्रोश काही कमी झाली नाही. ती लेडी ऑफिसरच्या कचाट्यातून सुटण्याचा प्रयत्न करत होती. लेडी ऑफिसरची पकड इतकी मजबूत होती, की तिचा तो प्रयत्न फोल ठरला.

कार्तिकने तिच्या रडण्याला काहीच भीक घातली नाही. त्याने एका ऑफिसरला इशारा केला. त्या ऑफिसरने पुढे होऊन विरेनला उभा केला. विरेन

त्याचा आधार मिळूनही धडपडतच होता. तो नीट स्थिर झाल्यावर कार्तिकने एक जोरदार ठोसा त्याच्या पोटात लगावला.

"बोल साल्या!" कार्तिक ओरडला.

हे सगळं हॉस्पिटलमध्येच चालू होते. पण कार्तिकला थांबवण्याचे धाडस त्याच्या क्रूर चेहऱ्याकडे पाहून कोणीच करत नव्हते.

"मी... मी... बऱ्याचदा..." विरेनला बोलण्याशिवाय गत्यंतर नव्हते. तशा परिस्थितीतही तो सांगू लागला,

"डॉक्टरना याबद्दल वारंवार सांगण्याचा... सांगण्याचा प्रयत्न केला. पण... पण त्यांचे म्हणणे होते, की... की तुमचे म्हणणे आम्ही मान्य करू. पण मग... मग तुमच्या आईला घरी... घरी काही झाले, तर... तर आम्ही ती जबाबदारी घेत नाही... त्यामुळे तुम्हाला डेथ सर्टिफिकेटसाठी आमच्याकडून कसलीच... कसलीच मदत होणार नाही... आणि डेथ सर्टिफिकेट तर... डॉक्टरांच्या... डॉक्टरांच्या सर्टिफिकेट शिवाय डेथ सर्टिफिकेट गव्हर्नमेंट इशू करत... करत नाही. आणि आईचे इन्शुरन्सचे पैसे मिळवण्यासाठी मला... मला तिच्या डेथ सर्टिफिकेटची गरज होती... होती... म्हणून... म्हणून मला हे... करावे... करावे लागले..."

विरेन जसा जसा सारा खुलासा करत होता, तसे तसे कार्तिकच्या डोक्याची शीर तट्ट फुगत होती.

"मला... मला ठाऊक होते. पणजोबांच्या खुनाचा तपास चालू असल्याने माझे हे असे करणे खूप रिस्की आहे, पण माझ्याकडचे पैसेही संपले होते. माझ्याकडे दुसरा कोणता पर्याय नव्हता. कर्जाचा बोजा वाढत होता. व्हेंटिलेटर बंद होणे ही हॉस्पिटलचा हलगर्जीपणा आहे असा कांगावा करून यांच्याकडून हवी ती रक्कम उकळणे व डॉक्टरचे ओथेन्टीक सर्टिफिकेट सुद्धा मिळवणे हा माझा प्रयत्न होता..."

विरेनचा हा प्लॅन कदाचित यशस्वी झाला देखील असता, जर मिस्टर वाघ तिथे पहिल्यापासून उपस्थित नसता तर... आपल्या हॉस्पिटलचे रेप्युटशन जपण्यासाठी हे प्रकरण दाबण्याचा हॉस्पिटलने पुरेपूर प्रयत्न केला असता. आणि विरेन हॉस्पिटलकडून पैसे उकळण्यात यशस्वी झाला असता.

विरेनचे हे स्पष्टीकरण ऐकून तर कार्तिकचे डोकेच फिरले. त्याच मेंटल अनकॉन्शियसनेसमध्ये त्याने जोरदार ठोसा विरेनच्या जबड्यावर मारला. विरेनचा जबडा डिसलोकेट झाला. तो जोरात जमिनीवर आदळला आणि त्याच्या तोंडातून भळाभळा रक्त वाहू लागले. त्याला धरलेला ऑफिसरही भेलकांडे खात दूर जाऊन आदळला. आता पर्यंत रडत असलेली रमा हे दृश्य पाहून लेडी ऑफिसरच्या हातातच बेशुद्ध झाली. पण आता मात्र इतका वेळ शांत असलेले इतर ऑफिसर्स आणि कमिशनर कार्तिकला सावरून बाहेर घेऊन गेले. मिस्टर वाघ मात्र तेथेच उभा होता. विरेनला ट्रीटमेंटसाठी घेऊन जाताना पहात. रमालाही दुसऱ्या स्ट्रेचरवर टाकून तेथून नेण्यात आले.

या भयानक कॉन्स्पिरसीमधील एक केस तरी सॉल्व्ह झाली होती. मार्गी लागली होती. आणि तीही मिस्टर वाघमुळे!

पण हे प्रकरण एवढ्यावर थांबणारं नक्कीच नव्हते...

# फ्यू मोअर डेथ्स्

मध्यरात्री कधी तरी विरेन मरण पावला होता. आता हे प्रकरण जास्तच चिघळत जात होते. म्हणून मग कार्तिकने निर्णय घेतला, की विरेनची पोस्टमार्टम इथेच डेंटल हॉस्पिटलमध्ये होईल. त्याला जॉ सर्जरी साठी इथे आणण्यात आले होते. शुद्धीवर आल्यावर रमालाही इथेच आणले गेले होते. चीफ सर्जन, डीन, चेअरमन, हॉस्पिटल ओनर सर्वांनीनी आडकाठी करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना दटावून, धमकी देऊन, भीती घालून गप्प केले गेले. त्यांनाही शांत बसण्याशिवाय पर्याय नव्हताच. कारण त्यांनी जास्तच आडवे लावले असते, तर त्यांची ओथेरिटी किंवा लायसेन्स कॅन्सल होण्याची भीती होतीच. शेवटी युद्ध पातळीवर हे प्रकरण हाताळले जात होते. आणि पंतप्रधानांपासून मुख्यमंत्रींपर्यंत सर्वच यात लक्ष घालून होते. शेवटी त्यांनी परवानगी दिली.

असे करण्यामागे कार्तिकचा तर्क होता, की इथेच जर अटॉप्सी झाली, अटॉप्सीसाठी विरेनची बॉडी नेण्याच्या मधल्या काळात विरेनच्या डेडबॉडीशी काही छेडखाणी होण्याची शक्यता खूपच कमी होते. कार्तिकला आता कोणतीही रिस्क घ्यायची नव्हती.

खरे तर या मागे दुसरेही कारण होते. विरेनची बायको रमाही विरेनला ठेवण्यात आलेल्या हॉस्पिटलच्या जनरल वॉर्ड मधील बाथरूम मध्ये मेलेली आढळली होती...

दोघांच्याही आटॉप्सीज् एकाचवेळी करण्यात आल्या. बाबाराव देसाईंच्या अटॉप्सीचा इंचार्ज असलेला फिजिशियन याही अटॉप्सीज् सुपरवाईज करत होता.

काही तासांतच अटॉप्सीजचा रिपोर्ट आला. मिळण्यासारखे जास्त काही नव्हतेच. म्हणूनच पोस्ट मार्टम लगेच उरकला होता.

रिपोर्टवरून समजले, की विरेनचा मृत्यू अनेस्थेशियाच्या ओव्हर डोसमुळे झाला होता आणि त्याच्या मृत्यूच्या दोन तास आधी त्याच्या बायकोचा रमाचा मृत्यू झाला होता. तिने बाथरूममध्ये आपल्या हाताची शीर कापून घेतली होती.

पतीच्या अपराधाचे ओझे सहन न होऊन तिने आत्महत्या केली असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. कारण तो खून असल्याची काहीच लक्षणे दिसत नव्हती.

कार्तिकलाही बाबारावांचा खुनी पकडणे अधिक गरजेचे असल्याने त्याने रमाचा विषय तिथेच थांबवला. प्रश्न राहिला होता तो विरेनच्या मृत्यूचा. त्याला अनेस्थेशियाचा ओव्हर डोस कसा झाला? हे शोधून काढणे आता क्रमप्राप्त होते.

हॉस्पिटल मधील सर्वांची चौकशी करण्यात आली. विरेनच्या देखभालीसाठी असलेल्या नर्सेस व त्याची ट्रीटमेंट करत असलेल्या डॉक्टर याचे इंटेरॉगेशन करण्यात आले. पण कुणाचीच चूक आढळून आली नाही. पुन्हा सारे

सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यामध्येही काहीच संशयास्पद नव्हते. मिस्टर वाघही यावेळी काही करू शकला नाही.

पण त्याने एक गोष्ट मात्र सर्वांच्या निदर्शनास आणून दिली, की अटॉप्सी रिपोर्ट मध्ये सांगितल्याप्रमाणे विरेनचा मृत्यू अनेस्थेशियाच्या ओव्हर डोसमुळे झाली असे म्हंटले गेले असले, तरी त्याची मात्रा ही नॉर्मलच होती. त्याला एक्सेसिव्ह अनेस्थेशिया देण्यात आला नव्हता. ऑपरेशन वेळी त्याला लोकल अनेस्थेशिया देण्यात आला होता आणि त्यामुळे तो पूर्ण बेशुद्धावस्थेत होता. कदाचित म्हणून नंतर त्याला जो अनेस्थेशियाचा डोस देण्यात आला तो त्याच्या प्रकृतीला तो अनेस्थेशिया मानवला नसेल असा मिस्टर वाघने काढलेला निष्कर्ष.

कार्तिकने मारलेल्या ठोशामुळे विरेनच्या जबड्याची करकोळ सर्जरी करावी लागली होती. त्यासाठीच त्याला अनेस्थेशिया देण्यात आला होता. सर्जरीनंतर आठ तास तो बेशुद्धावस्थेतच होता. उठल्यानंतरही त्याचा जबडा खूप दुखत होता. पण घडलेले काही त्याला आठवत नसल्याने तो भ्रमिष्टासारखा वागत होता. त्याला खूप त्रास होत होता म्हणून त्याला पुन्हा एकदा अनेस्थेशिया देण्यात आला होता. आणि हे चीफ सर्जनच्या परवानगीनेच झाले होते. यात कोणता धोकाही नव्हता. पण विरेन मेला होता. हे कोणालाही अपेक्षितच नव्हते.

शेवटी कार्तिकच्या या मोठ्या चुकीमुळे त्याला ताबडतोब या केसवरून हटवण्यात आले. आणि पर्यायाने संपूर्ण सीबीआय टीमलाही. पण ही बातमी कुठेही लीक होऊ नये याचीही पुरेपूर काळजी घेण्यात आली.

इथे केस अजिबातच पुढे सरकत नव्हती, पण मृत्यू वर मृत्यू मात्र होत होते. आणि दुसरीकडे आणखी एक कडी या केसला जोडली जात होती. दुसऱ्या अंगाने या केसची चौकशी चालू होती.

केस पुन्हा कमिशनरच्या ताब्यात आली होती. बाबाराव हे समाजसेवक म्हणूनही काम करायचे आणि त्यांच्या या कार्याचा खूपशा 'कार्यकर्त्यांना' त्रास झाला होता. त्या दृष्टिकोनातून आता केसचा विचार चालू झाला होता.

प्राथमिक चौकशी अंती तरी यातील कुणीच त्यांना धमकी दिल्याचे काही आढळून आले नाही.

पण बाबू सुतार नांवाच्या एका माणसाची आणि बाबारावांची काही महिन्यांपूर्वी भर रस्त्यात भांडण झाल्याचे पोलिसांना समजले.

हा बाबू सुतार दिसायलाच खवट माणूस. वय साधारण चाळीस - पंचेचाळीस. गावांत याचे दोन दुकान गाळे. बरोबर. मलाही जेव्हा कळले तेव्हा आधी असेच वाटले, की दुकान गाळे असणे हा काही गुन्हा नाही. मग ते का भांडले असतील.

नंतर मिस्टर वाघ कडूनच मला कळाले, की त्याचे जुगाराचे अड्डे आहेत. गेमिंग पार्लर. त्याचा हा व्यवसाय लायसन्स्ड् आहे. म्हणजे असे म्हंटले तरी जाते. पण तिथे येणारे लोक ज्या योग्यतेचे (लायकीचे) असतात यामुळे गल्लीतील इतर लोकांना त्याचा त्रास व्हायचा म्हणूनच बाबाराव बाबूला बोलले होते.

बाबूचे म्हणणे होते, की माझ्याकडे येणारे लोक कसेही असोत. असतात तर ते माझे कस्टमर. आणि मी माझ्या कस्टमरला काहीच बोलू शकत नाही. आणि यावरूनच दोघांची जुंपली होती. या बाबूचे बाजूच्या दोन गावांतही मिळून तीन 'गाळे' आहेत. दिवसाला नाही म्हंटले तर चार - पाच लाखांचा 'गवणा' तरी नक्कीच गोळा होतो अशी मिस्टर वाघने मला माहिती पुरवली. हे सांगत असताना त्याच्या चेहऱ्यावरील भाव मला सांगत होते, त्याला मी किती बावळट वाटलो होतो त्यावेळी.

"काय? मला या गोष्टी माहीत नाहीत... आणि ते चांगलंच नाही का?" मी त्याला प्रश्न केला.

यावर तो नुसताच हसला.

बाबू सुतारला आत घेण्यात आले. बाबू सुतारचे क्रिमिनल रेकॉर्ड काढण्यात आले. तसा तो कोरा होता. काही क्रिमिनल रेकॉर्ड नाही.

हा फक्त एका टेररिस्टच्या स्टेटमेंटमध्ये त्याचा उल्लेख रेकॉर्ड झाला होता. पण त्यालाही काही वर्षे झाली होती.

टेररिस्टचा संदर्भ या केस मध्ये येताच. होम मिनिस्ट्रीच्या आदेशानुसार तातडीने आयबीला यामध्ये ओव्हर द नाईट इन्क्लूड् करण्यात आले.

ही केस मोस्ट इफिशियन्ट आयबी ऑफिसर वरूण त्रिपाठी यांच्याकडे सोपविण्यात आली. ही इज् २००९ बॅच पुलीस ऑफिसर फ्रॉम महाराष्ट्र कॅड्रे.

केसची धुरा पुन्हा कमिशनर कडून वरुणकडे सोपवण्यात आली. कमिशनरला हे तसे मानवणारेच होते. कमिशनर रामचंद्र शिंदे हे कामचुकार नक्कीच नव्हते. पण ही केसच इतकी जटिल आणि नाजूक होती, की त्यांना ते इंचार्ज असताना ती अनसॉल्व्हड राहणे मान्य नव्हते. त्यामुळे या केसची जबाबदारी दुसऱ्या कोणावर तरी जाणे त्यांना तसे नाहरकतीचेच होते.

आल्या आल्या पहिले वरूणने बाबूला इंटेरोगेशनसाठी आत घेतले. इंटेरोगेशन रूममध्ये दोघेच होते. सर्व सर्विलेन्स कॅमेराज् वरुणच्या सांगण्यावरून बंद ठेवण्यात आले होते. त्यामुळे बाबूचे इंटेरोगेशन रेकॉर्डवर आले नाही. त्यामुळे त्यांच्यात नेमके काय बोलणे झाले हे मात्र कोणालाच समजले नाही.

इंटेरोगेशन रूमच्या बाहेरून कमिशनर, नवीन काही इतर केसशी रिलेटेड ऑफिसर्स आणि मिस्टर वाघ त्यांना वन वे मिररच्या पलीकडून पाहत होते. नवीन हे इंटेरोगेशन त्याच्याकडील एक्शन कॅमेरामध्ये कोणाच्याही न कळत रेकॉर्ड करत होता. ही गोष्ट मिस्टर वाघच्या डोळयांतून मात्र सुटली नाही. नवीनने सुरवातीपासूनच मिस्टर वाघवर अविश्वास दाखवला असे नाही व तसे म्हणता येणार; पण त्याच्या डिडक्शन्सवर शंका उभी करण्याचे काम केले होते, म्हणून मिस्टर त्याच्यावर विशेष लक्ष ठेऊन होता.

पण याचवेळी तो आणखी एका कामात होता आणि ते म्हणजे वरुण बाबूला काय विचारतोय आणि बाबू काय उत्तर देतोय याकडे. इंटेरोगेशन रूम साऊंड प्रूफ

असल्याने त्यांच्यातील बोलणे कोणाला ऐकू येत नव्हते. नवीनचा कॅमेराही त्यांची हलती तोंडेच कॅप्चर करत होता. पण वाघ त्यांचे म्हणणे पूर्णपणे समजू शकत होता...

'बाबू, मला तुझी फालतू माहिती नकोय! मुद्द्याला हात घाल!'

बाबूला वाटत होते, त्याच्या गेम पार्लरसाठीच त्याला आत घेतले आहे. त्यामुळे तो आपलाच इतिहास वरुणला सांगत होता. हे पाहून मिस्टर वाघला हसू आवरले नाही. त्याचे हसणे पाहून कमिशनर व बाकीचे ऑफिसर्स कोड्यात पडले.

'अरे हा मूर्ख आहे का? याला कशाचाच सिरीयसनेस नाही!' अशी टीका नवीनने स्वतःशीच नोंदवली, पण त्याच्या हलणाऱ्या होठांवरून मिस्टर वाघला नवीनचे त्याच्या विषयीचे बोलणे समजले. मिस्टर वाघने त्याच्या टिकेकडे दुर्लक्ष केले आणि म्हणाला,

"असे केल्याने आपण किती ग्रेट इन्वेस्टिंगेटर आहोत ही दाखवण्याची या वरुणची धडपड किती केविलवाणी आहे!"

आपल्याला आतील गोष्टी कळतायत हे यांना समजायला नको म्हणून मिस्टर वाघने विषय बदलला.

"एवढंच कळतंय तर स्वतः करायचे ना इंटेरोगेशन." नवीनने मिस्टर वाघला टोमणा मारला.

"नवीन!" कमिशनरने नवीनला खडसावले.

"होय सर! आतापर्यंत या विजय वाघची ठोस अशी कुठे काय मदत झाली आहे? पिकनिकला आल्यासारखे हा आपल्यासोबत फिरत असतो फक्त!"

मिस्टर वाघचे लक्ष आतही होते. तो नवीनला ऐकत होता, पाहत मात्र आत होता. चेहऱ्यावर बेपर्वाईचे स्मित. आपल्याला हा सिरियस्लीच घेत नाही हे पाहून नवीनची मात्र जास्तच चरफड झाली.

अब्दुल हकीम ज्या टेररिस्टच्या स्टेटमेंटमध्ये बाबूचे नांव रेकॉर्ड झाले होते, त्याला दोन वर्षांपूर्वीच फाशी झाली होती. त्यामुळे त्याच्याशी इंटेरोगेशन करणे शक्यच नव्हते. पण त्याच्या स्टेटमेंटमध्ये त्याने सांगितले होते, की बाबूने रत्नागिरी मधून हत्यारे आणून याला सप्लाय केली होती. त्यांनी या बदल्यात त्याला दोन लाख रुपये देण्यात आले होते. ही हत्यारे समुद्र मार्गे कोस्ट गाड्र्सना हुलकावणी देण्यासाठी रत्नागिरीत इम्पोर्ट केली गेली होती. पण ही एका नागरिकाने योग्य ठिकाणी पोहोचवणे कमी धोक्याचे आहे असे वाटून बाबूला यात सामील करून घेतले होते.

वरुणने याविषयी बाबूला विचारणी केली असता बाबूला दरदरून घाम फुटला. त्याने घाबरत का असेना, पण अब्दुलचे स्टेटमेंट धुडकावून लावले. त्याने सांगितले, की त्याने फक्त अब्दुलला राहण्यासाठी जागा मिळवून दिली होती. रोजच्या भेटण्यातून त्यांची मैत्री होत गेली. अब्दुल हा केमिकल इंजिनियर आहे आणि तो नोकरीचा इंटरव्ह्यू देण्यासाठी म्हणून इकडे आला आहे असे त्याने बाबूला सांगितले होते. अब्दूलने त्याला नांवही शाहनवाज असे सांगितले असल्याचे त्याने वरुणला सांगितले.

अब्दुलच्या स्टेटमेंटने बाबू सुतारला आधीही अडचणीत आणले होते. जेव्हा त्याच्यावर व त्याच्या साथी टेरिरिस्ट्सवर केस चालू होती. यामुळेच तर शहरातील सर्वजण तेव्हापासूनच बाबूला घाबरायला चालू झाली होती. पण त्यावेळी बाबूचे बोलणे एटीएसच्या इन्वेस्टीगेशनशी तंतोतंत जुळत असल्याचे पाहून त्याला उच्च व सर्वोच्च न्यायालयानेही निर्दोष ठरवले होते. बाबूला नाहक अडकवण्याचा अब्दुलचा प्रयत्न फोल ठरला होता. बाबूचा विश्वास संपादन करण्यासाठीच अब्दुलने त्याला त्याचे गेमिंग पार्लर्स सुरू करण्यासाठी पैशांची मदत केली होती. त्याच पैशांतून त्याचे 'दुकान गाळे' उभे राहिलेले होते.

(कॉन्फिडेनशीयल इन्फॉर्मेशन व सेक्युरिटी इशूज् निमित्त मी त्या टेररिस्ट अटॅकची संपूर्ण माहिती देऊ शकत नाही. त्यासाठी क्षमस्व...)

बाबूला सोडून देण्यात आले.

नवीन एका हॉटेल रूमच्या बाहेर होता. त्याने दार ठोठावले. त्याच्या ठोठावण्यावरून ते काहीतरी सांकेतिक होते हे त्या वाजवण्यावरून लक्षात येत होते.

दार जरा उघडल्यासारखे झाले आणि त्या तेवढ्याच फटीतून नवीन आत शिरला.

रात्रीची वेळ बाबूला घरी सोडण्यात आले होते. मात्र त्याला शहर सोडण्याची परवानगी नव्हती. बाबू घरी न जाता त्याच्या दुकानाकडे गेला. सकाळपासून झालेल्या मनःस्तापाचा निचरा त्याला करायचा होता.

दुसऱ्या दिवशी तोही दुकानात मेलेला सापडला...

## द सस्पेक्ट्

नवीन एका व्यक्तीला एका मॉलच्या पार्किंग लॉटमध्ये भेटला. तोही त्याच्या सोबत गाडीतच बसलेला होता. काचा बंद.

'काही अपडेट्स?' त्याने विचारले.

'विशेष काहीच नाही. पण मला त्या विजय वाघवर मला खूप दाट संशय आहे.'

'तसा मला पण आहे. पण तो केस बाबत जास्त सिरीयस नाही. त्यामुळे मी त्याच्याकडे जास्त लक्ष देत नाहीये.'

'त्याचे या केसबाबत सिरीयस नसणे हेच तर चिंतेचे कारण आहे. तो पहिल्या पासून ऑफिशियली या केसमध्ये इनवॉल्व्ह आहे. तरी तो इतका निष्काळजी कसा काय आहे? इजन्ट इट सस्पिशियस?'

'गेस यू आर राईट! नजर ठेव त्याच्यावर!'

'येस सर!'

पण यांना हे कुठे माहीत होते, की मिस्टर वाघच त्यांच्यावर नजर ठेवून होता.

"एक मिनिट! म्हणजे हा नवीन भेटत कुणाला होता?" मिस्टर वाघला मध्येच अडवून मी त्याला प्रश्न केला.

आणि नांव ऐकून मी दचकलोच...

"कार्तिक रणशिंगे! सीबीआय ऑफिसर."

"म्हणजे?! तो परत गेलाच नव्हता?"

यावर मिस्टर वाघ नुस्ता हसला...

खोटी मेडिकल लिव्ह घेऊन कार्तिक इथेच थांबला होता. त्याला त्याचे रेकॉर्ड खराब होऊ द्यायचे नव्हते. आज पर्यंत एकही केस त्याची अनसोल्व्हड राहिली नव्हती. त्यामुळे त्याला ही केस अनोफिशियली क्रॅक करायची होती आणि म्हणूनच त्याने नवीनला हाताला धरले होते.

कार्तिकला ही लिव्ह याच बेसिसवर देण्यात आली होती, की त्याने बाबाराव यांच्या केसपासून दूर रहावे आणि लगेच हे शहर सोडावे. विरेनच्या प्रकरणानंतर कार्तिकची मानसिक स्थिती ठीक नाही हे सीबीआयला तसे

पटण्यासारखेच कारण होते. यासाठी त्याला एकदा सीबीआय हेडकोर्टरला जाऊन सुट्टीचा अर्ज देऊन यावे लागले होते. सायकियाट्रिस्टकडून त्याची रीतसर तपासणीही करून घेतली होती. आणि सायकियाट्रिस्टकडून ही कार्तिक मानसिक तणावाखाली असल्याचे रिपोर्ट्स दिले गेले होते.

सायकियाट्रिस्टचे म्हणणे होते, की कार्तिकने दिल्लीत राहूनच काऊंन्सिलिंग ट्रीटमेंट घ्यावी. पण कार्तिकमुळे झालेल्या प्रकरणामुळे ब्युरोवर काय ओढवेल याची चिंता करत सीबीआय डिरेक्टरनी त्याची सुट्टी संँग्शन केली होती.

(कार्तिकवर व पर्यायाने सीबीआयवर विरेनच्या प्रकरणामुळे पुढे काय एक्शन घेतली गेली ते आपल्या विषयासाठी तितकेसे महत्त्वाचे नाही. आणि ते इतके गंभीरही नाही. म्हणून टाळतोय...).

डिरेक्टरनी त्याला त्याच्या गावी जाऊन सायकियाट्रिस्टचे काऊंन्सिलिंग व नीट आराम घेण्यास सांगून धाडले. आणि सोबत एक ऑफिसरही त्याला घरी सोडण्यासाठी पाठवला होता.

त्यानुसार त्याने आपले मूळ गांव गाठलेही होते, पण फक्त घराला पाय लावून तो परतला होता.

"पण हे सगळं तुम्हाला कसं माहिती?"

खरे तर माझा हा मिस्टर वाघला प्रश्न मूर्खपणाचाच होता. त्याला काय अशक्य आहे?...

"आईव्ह फिक्स्ड सम बग्स्!" त्याने स्पष्ट केले.

"कुठे?"

कपड्यांत तर नक्कीच नाही. कारण कपडे तर रोज बदलले जात असणार. मग कुठे?...

"मी सांगू नये आणि तू ऐकू नये!" तो निर्विकार चेहरा करून मला म्हणाला.

हे ऐकून माझ्या चेहऱ्यावर मात्र जे भाव आले ते मी नाही सांगू शकत. माझी ही अवस्था पाहात मिस्टर वाघ काही काळ तसाच बसून राहिला. पण दोन - तीन मिनिटांनी तो बस्ट झाला आणि जोरजोरात हसायला लागला.

"तू समजतोयस तसे काही नाही. कार्तिकचे हॉटेल रूम, त्याची गाडी, शूज, नवीनचे घर, शूज अशा बऱ्याच ठिकाणी. म्हणून तसे म्हणालो. खूप दमछाकीचे काम होते ते."

त्याचा खुलासा ऐकून मी रिलॅक्स झालो. नाही म्हणजे मिस्टर वाघचा काही नेम नाही म्हणून... बाकी काही नाही.

मागे नवीन एका हॉटेल रूमवर कोणाला तरी भेटायला गेला होता. त्यावेळी मिस्टर वाघने त्याचा पाठलाग केला होता. त्यावेळी त्याला कुणकुण लागली होती म्हणून त्याने दारामागील 'राक्षस' नक्की कोण हे शोधून काढले होते. आणि तो कार्तिक निघाला होता. आणि त्याच्या जोडीला होते नवीन नांवाचे पिशाच्च... पण हे दोघे मिळून सुद्धा मिस्टर वाघला झपाटू शकणार नव्हते. दोघे कर्तव्यनिष्ठ होते, म्हणूनच ते वाघच्या टप्प्यातून वाचले होते...

नाही तर त्याला या दोन शिकारी मिळाल्या असत्या...

(या वाक्यावरून एक घटना आठवली, पण ती पुन्हा कधी तरी...).

दरम्यानच्या काळात बाबू सुतारचा पोस्टमार्टम झाला होता. त्याच्या पोटात व्हिस्की व रावस माशाचे तुकडे सापडले होते. त्याचा मृत्यू मात्र एक्सेसिव्ह कार्बन डायॉक्साईड स्वालोव्ह केल्यामुळे झालाय असा पॅथलॉजिस्टचा निष्कर्ष होता.

कार्बन डायॉक्साईड बाबू सुताराच्या शरीरात गेले कसे यासाठी तपास चालू झाला होता. पंचमाना करून त्याचा मृत्यू झालेले त्याचे दुकान सील करण्यात आले होते व तो व्हिस्की घेत असलेला ग्लास, तो खात असलेला 'इलेयुथेरोनेमा टेटॅडॅक्टिलम' (रावसचे सायंटिफिक नांव. हो. वाघने मला सांगितल्यावर मीही आठ - दहा वेळा पुन्हा पुन्हा ते नांव विचारले. वैतागून त्याने मला ते लिहून दिले) म्हणजेच

सॅलमन मासा, इत्यादी संशयित वाटणाऱ्या गोष्टी जप्त करून फॉरेन्सिकला पाठवण्यात आल्या होत्या.

फोरेन्सिक रिपोर्ट वरून कळाले, की तो व्हिस्की घेत असलेल्या ग्लास मधून अतिरिक्त कार्बन डायॉक्साईड त्याच्या पोटात गेले होते.

वाघने सुद्धा बाबूच्या दुकानाची पाहणी केली आणि कोणाच्याही लक्षात न आलेली एक गोष्ट त्याला तेथील स्टोरेजमध्ये सापडली.

त्या गेम पार्लरच्या स्टोररूममध्ये वेल इन्सुलिटेड स्टायरोफोम् कुलर मध्ये खूप सारी कार्डिस म्हणजेच ड्राय आईस व व्हिस्कीच्या, बिअरच्या बाटल्या पडल्या होत्या. (स्टायरोफोम् म्हणजे हलका थर्मोकोल सारखा पण त्यापेक्षा टणक पदार्थ आहे जो कंटेनर्स, कप्स्, इ. बनवण्यासाठी वापरतात).

त्याने तेथील नोकराकडे चौकशी केल्यावर समजले, की शहरात अवेळी लाईट जाते म्हणून बिअर वगैरे थंडगार ठेवण्यासाठी त्या ड्राय आईसचा वापर केला जायचा. ड्राय आईस म्हणजे सॉलिड स्टेटमध्ये असलेले कार्बन डायॉक्साईड. यावरून सर्वांना सगळा खुलासा झाला.

बाबूने टेंशनमध्ये चुकून ड्राय आईस व्हिस्कीत घातले असेल, किंवा मग ड्राय आईस व नॉर्मल आईस मधला फरक बाबूला नशेत लक्षात आला नसेल असा तर्क मिस्टर वाघने काढला; जो सगळयांना अगदीच पटण्यासारखा होता.

"थँक्स मिस्टर वाघ. तुम्ही आणखी एक केस सॉल्व्ह केली. हे प्रकरण खूप जटिल होत असताना तुमची ही मदत खूप मोलाची आहे." कमिशनरनी मिस्टर वाघला धन्यवाद दिले.

"हो. पण तुमच्यातल्या काही जणांना तर असे वाटतेय, की मी इथे फक्त टाईमपास करण्यासाठीच येतोय."

ही केस देखील मिस्टर वाघनेच सॉल्व्ह केली आणि एक उपहासात्मक कटाक्ष त्याने नवीनकडे टाकला. त्याच्या चेहऱ्यावरचे हसू नवीनला डागण्या देत होते आणि नवीन यावेळीही चरफडण्याशिवाय काहीच करू शकला नाही.

# डिगिंग् अप्

आतापर्यंत मृत झालेल्या सर्व लोकांच्या अटॉप्सीज् होऊनही त्यांच्या बॉडीज् त्यांच्या त्यांच्या कुटुंबियांकडे सोपवण्यात आल्या नव्हत्या. ही लोकं जोडलीच गेली होती अशा कॉन्स्पिरसी सोबत, की त्यांना जावू देणे कोणालाच हितावह नव्हते.

बाबाराव देसाईंच्या ऐवजी कोणी दुसरी व्यक्ती असती, तर कोणीच त्याला इतके सिरियस्ली घेतले नसते. पण बाबाराव यांचा समाजावर एक प्रभाव होता. लोक त्यांना आदर्श मानायचे. त्यांच्या अशा प्रकारे जाण्याने जनसमुदाय खवळला होता. त्यामुळे ही केस लवकरात लवकर मार्गी लावण्याकडेच सर्वांचे लक्ष होते. पण ते काही केल्या होत नव्हते. दरवेळी कोणा नवीनच व्यक्तीचा खून व्हायचा आणि या प्रकरणाला फाटे फुटायचे व मूळ तपासाला बगल व्हायची.

त्यामुळे वरुणने एक गोष्ट पक्की केली, की आता इतर कोणत्याच गोष्टीत लक्ष घालायचे नाही. एकदा का बाबारावांच्या खुन्याचा पत्ता लागला, की सगळयाच मृत्यूचे खुलासे होतील असे त्याला वाटत होते. कारण एक गोष्ट नक्कीच सगळयांच्या निदर्शनास आली होती, की खून त्याच लोकांचे होत आहेत, जे या - त्या कारणाने बाबाराव देसाईंशी जोडले गेलेले आहेत; मग ते त्यांचे नातेवाईक असोत वा त्यांच्या संपर्कात आलेला कोणी...

मुडद्यांवर मुडदे पडत होते. आणखी किती मरतील याची काही कल्पना नव्हती. आणि आत्तापर्यंत इन्वेस्टीगेशन टीमने जवळपास दोन हजार पानांचा रिपोर्ट समितीसमोर सादर केला होता आणि तोही तसा निरर्थकच. त्यातून ठोस असे काही निष्पन्न होत नव्हते. ना गरजेची माहिती समोर येत होती. आतापर्यंत झालेल्या मृत्यूची आणि मृतांची नोंदच फक्त त्यात नमूद होती.

म्हणून वरुणने पुन्हा सगळया डेडबॉडीजचे पोस्टमार्टम्स् पुन्हा करण्याची परवानगी कोर्टाकडून मिळवली व तसे आदेशही दिले. मृतदेह हाती येत नाहीत म्हणून मृतांच्या सर्व नातेवाईकांचा संताप होत होता. आम्हाला त्यांच्यावर अंत्यसंस्कार करू द्या. त्यांच्या शवांचा असा विटाळ करू नका असा आग्रह काहींचा होता, तर काही नातेवाईकांकडून पोलिसांना शिव्या - शापांच्या लाखोली व्हायल्या जात होत्या.

बाबारावांचा मृतदेहही असाच पोलिसांच्या ताब्यात होता. त्यामुळे त्यांचे समर्थक, स्नेही सुद्धा पोलिसांवर नाराज होते आणि रस्त्यावर उतरून सर्वांचीच आंदोलने, आक्रोश चालू होते. बाबारावांना वाचवू शकला नाहीत, निदान आता शांतपणे मरू तरी द्या असे काहींचे म्हणणे होते. त्यांच्या खुन्याला लवकरात लवकर पकण्यात यावे असा तगादा सुद्धा काही सेवाभावी संस्थानी लावून धरला होता. पण वरूणने कोणालाच भीक घातली नव्हती.

आदेशानुसार पुन्हा सगळया मृतदेहांवर अटॉप्सीज् करण्यात आल्या. पूर्वीपेक्षा नवीन काही समोर आले नाही आणि या प्रयत्न देखील फोल ठरला. तसे तर मृत्यू होईन खूप वेळ लोटला होता. या साऱ्याचा तसा काही उपयोग झालाच नसता,

तरी एक प्रयत्न म्हणून या अटॉप्सीज् ऑपरेट केल्या गेल्या होत्या. असे नव्हते, की ही गोष्ट वरुणला लक्षात आली नव्हती. पण त्याला काही धागा मिळण्याची एक आशा होती. पण ती निष्फळ ठरली होती.

निराश होऊन सर्व डेडबॉडीज् त्यांच्या - त्यांच्या नातेवाईकांना सोपवण्यात आल्या. मिस्टर वाघ प्रत्येकाच्या अंत्यसंस्कारासाठी आवर्जून हजर होता. बाबारावांची डेडबॉडी मात्र अजूनही कस्टडीतच ठेवण्यात आली होती. यामुळे तर जनतेचा रोष अधिकच उसळला.

या सगळया रामरगाड्यात मिस्टर वाघ मात्र शांत होता; चेहऱ्यावर तेच नेहमीचे गूढ स्मित घेऊन. जणू जे काही चालू आहे, ते का आणि कसे होते आहे, कोण करत आहे हे माहीत असल्यासारखा...

आणि काही दिवसांनी आणखी मृत्यू; प्रभाच्या नवऱ्याचा, शेखरचा. आता कोणत्या घटनेवर लक्ष द्यायचे नाही असे ठरवूनही वरुणला यावेळी तसे करता आले नाही. कारण आता मृत्यू बाबाराव देसाई मरणापूर्वी राहत असलेल्या घराची चौकट पार करून आत गेला होता...

यावेळी कोणतीच ढिलाई पत्करायची नाही असे वरुणने ठाम केले. सर्वांत आधी त्याने प्रभाला सिक्युरिटी देऊ केली. काही मेल व लेडी ऑफिसर्सना तिच्या व तिच्या पाच वर्षांच्या मुलीच्या सुरक्षेसाठी तिच्या घरी थांबवण्यात आले. पण तिला नक्की काय झालंय हे अद्यापही कळू दिले नव्हते. सिक्युरिटीचेच कारण आहे, तर

तिलाही प्रोटेक्शन दिले आहेच की. मग शेखरला त्यांच्या पासून दूर ठेवण्यामागचे कारण काय अशी शंका तिच्या मनाला चाटून गेली. पण तिच्या या शंकेचे तिच्या मनाला पटेल असे उत्तर मात्र कोणी देऊ शकले नाही. गुन्हेगाराला पकडण्याची पॉसीबिलिटी वाढण्याच्या शक्यतेवरून हे केले गेले असल्याचे ती खूपच मागे लागल्यावर तिला सांगण्यात आले. पण याने काही तिचे समाधान झाले नाही.

वरूणचा प्लॅन काय होतं माहीत नाही, पण तो वर्क झाला, तर खुनी नक्कीच सापडणार होता...

शेखरचा मृत्यू तो काम करत असलेल्या निकम फौंड्री मध्ये काम करत असताना झाला. तेथे तो एक वेल्डर म्हणून काम करायचा. दहा - बारा तास काम करूनही नऊ हजार रुपये पगार होता. त्यातही कामावर यायला वेळ झाला, की पगार कापला जायचा.

मरणापूर्वी शेखरला डायरियाचा त्रास चालू झाला होता. तो सतत टॉयलेटला जात असल्याचे त्याच्या सहकार्यांनी सांगितले. यावरून शेखरला मॅनेजरने खूप झापलेही होते. शेखर कामचुकारपणा करण्यासाठी हे नाटक करतोय असे तो ओरडत होता. पण सहकार्यांच्या मते शेखरला खरेच खूप थकवा जाणवत होता. सतत मळमळ होत होती. डोके दुखत होते. तोंड शुष्क व्हायचे आणि मग इच्छा नसताना त्याला बळजबरी खूप सारे पाणी प्यावे लागायचे. मग पुन्हा त्याला बाथरूमचा त्रास चालू व्हायचा. अशात त्याच्या हृदयाची धडधड खूप जोराने चालू झाली होती.

"सकाळी आल्या आल्या त्याला हा सगळा त्रास चालू झाला होता?" वरुणने माहिती देणाऱ्या शेखरच्या सहकाऱ्याला विचारले.

"डोकेदुखी, अस्वस्थपणा नेहमी असायचाच, पण त्या दिवशी त्याला खूपच त्रास झाला होता." त्याने आणखी माहिती पुरवली.

"त्याच्या आजूबाजूला काम करणाऱ्या लोकांना सुद्धा थोडी अस्वस्थता, डोकेदुखी जाणवत होती. मी शेखर पासून थोड्याच अंतरावर होतो. माझी पण तीच वाट लागली होती!" एकजण पुढे होऊन म्हणाला.

त्याचे सहकारी त्याला आराम करण्याचा आग्रह करत होती. त्याचे काम त्याच्यातील कोणी तरी करेल असेही सांगण्यात आले, पण तो ऐकला नाही. पगार कट होऊ नये म्हणून तो तशा बिकट अवस्थेतही काम करत होता. लंच ब्रेकपर्यंत त्याने स्वतःला कसे तरी सांभाळले.

लंच ब्रेकमध्ये मात्र तो जेवण्याआधी म्हणून जो बाथरूमला गेला तो दहा - पंधरा मिनिटे परतलाच नाही म्हणून सर्वांनी सावध होऊन टॉयलेटचा दरवाजा फोडला, तर आत त्याचा मृतदेह आढळला.

प्रभापासून मात्र ही गोष्ट लपवून ठेवण्यात आली. सिक्युरिटी रिजन्सचे कारण देऊन शेखरला एका सुरक्षित जागी ठेवलंय एवढेच तिला सांगण्यात आले.

शेखरचा पोस्टमार्टम रिपोर्ट वरुणच्या हातात पडला. शेखरच्या मृत्यू दरम्यान त्याचे ब्लडप्रेशर खूप लो झाल्याचे पॅथेलॉजिस्ट्सना आढळून आले. त्याच्या शरीरातील झिंकचे प्रमाणही खूप कमी झाले होते. डोपामाईन तयार करणारे सेल्स डेड झाले होते (डोपामाईन हे न्यूरोट्रान्समीटर आहे. जे मेंदूत माहिती प्रसाराचे काम करते. यामुळे आपल्या शरीराच्या अवयवांची हालचाल होत असते). त्यामुळे डोपामाईन प्रोडक्शनही रिड्युस झाले होते. आणि तो पार्किन्सन्स डिसीजचा शिकार झाला होता. त्याचे सेंट्रल नर्व्हस सिस्टीम ब्रेक डाऊन झाली होती आणि यामुळेच त्याचा मृत्यू झाला होता.

त्याच्या शरीरात नायट्रिक ऑक्साईडचे प्रमाण प्रमाणापेक्षा जास्त झाले होते. ऑक्युपेशन सेफ्टी अँड हेल्थ अडमिनिस्ट्रेशन या अमेरिका स्थित संस्थेने दिवसाच्या आठ तासाच्या कामात २५ पीपीएम (पार्टस पर मिलियन/मिलिग्राम्स पर लिटर) इतके नायट्रिक ऑक्साईडचे लीगल लिमिट सेट केली आहे. इतक्या प्रमाणात मानवी शरीर नायट्रिक ऑक्साईडशी कॉन्टॅक्ट सहन करू शकते. पण १०० पीपीएमच्या वर नायट्रिक ऑक्साईड हे विनाविलंब घातक ठरते.

नायट्रिक ऑक्साईड ही एक शिल्डिंग गॅस आहे. शिल्डिंग गॅसेस हे रासायनिक क्रिया करू न शकणारे इनर्ट किंवा सेमी - इनर्ट गॅसेस असतात, जे

वेल्डिंगच्या कामासाठी वापरले जातात. वेल्ड एरिया ऑक्सिजन व वॉटर वेपर पासून संरक्षित करण्याचे काम या गॅसेस् करतात.

नायट्रिक ऑक्साईड वेल्डिंगच्या वेळी ओझोन निर्मिती कमी करण्याचे काम करते. ओझोन जास्ती श्वसन करण्याने घसा खराब होवू शकतो. हे फुफ्फुसासाठी घातक असते. फुफ्फुसे काम करणे बंद करू शकतात. श्वसनाचा त्रास संभवू शकतो. अस्थमाची भीती असते. छातीत दुखणे सुरू होऊ शकते. आणि यापासून बाचावासाठीच नायट्रिक ऑक्साईडचा उपयोग होतो. पण त्याचेही प्रमाण ठरवले गेले आहे. अति नायट्रिक ऑक्साईडही घातकच. आणि शेखरचा १०० पीपीएम् पेक्षा जास्त नायट्रिक ऑक्साईडशी संपर्क आल्याने त्याचा मृत्यू झाला होता.

मिस्टर वाघसह सर्वजण पुन्हा फौंड्रीवर पोहोचले. क्राईम सीन(?)ला प्रोटेक्ट करण्यासाठी आदल्यादिवशीपासून ऑफिसर्स तेथे तैनात करण्यात होते. फौंड्रीच्या भोवतीने क्राईम सीनच्या पट्ट्या लावल्या गेल्या होत्या. सर्व सामान काल शेखर रावराणेच्या मृत्यूवेळी ज्या ठिकाणी पडले होते, ते तसेच आत्तापर्यंत पडून होते.

सकाळी आलेले सर्व कर्मचारी काम चालू होऊ शकत नसल्याने फौंड्री बाहेरच उभे खोळंबले होते. आणि आज आलो नसतो, तर बरे झाले असते असे भाव बहुतांश लोकांच्या चेहऱ्यावर मिस्टर वाघला दिसत होते. त्यांचेही बरोबरच होते म्हणा. या प्रकरणाचा छडा लागल्याशिवाय आता काम थोडीच चालू होणार होते?

फौंड्रीचा मालक सुशांत निकम हा तर खूपच वैतागला होता. वरुणसह सर्वजण आल्यावर त्याने कांगावा करण्यास सुरवात केली. वरपर्यंत जाण्याच्या

धमक्याही त्याने देऊन झाल्या, पण कोणीच त्याच्याकडे लक्ष दिले नाही. त्याला कोणी किंमत देत नाही हे पाहून काही कर्मचाऱ्यांना एक वेगळाच असुरी आनंद मिळत होता. आलो ते बरेच झाले असे आता हिरमुसलेल्या लोकांना वाटू लागले. निदान आपल्याला त्रास देणाऱ्या मालकाची ही फजिती 'याची देही याची डोळा' पाहण्याचे दुर्लभ दृश्य त्यांना पाहायला मिळाले होते. शेवटी त्याचे मुटकुळे करून त्याला त्याच्याच फौंड्रीत एका कोपऱ्यात बसवण्यात आले.

वरुणने फौंड्रीचे सगळेच्या सगळे सेफ्टी गियर्स व वेल्डिंगचे सगळे साहित्य तपासण्याचे आदेश दिले. त्याच्या एका वाक्यावर तेथील सर्व सामान फॉरेन्सिक लॅबला हलवण्यात आले.

त्या दरम्यान मिस्टर वाघने शेखर वेल्ड करताना वापरत असलेले इलेक्ट्रोड व त्याचा आणखी इलेक्ट्रोड्स असलेला बॉक्स उचलून घेतला. हे नवीनच्या नजरेतून सुटले नाही. तो वरूणच्या कानात काही तरी कुजबुजला, तसा वरुण मिस्टर वाघकडे आला.

"काय उचललंय?" त्याने मिस्टर वाघला जाब विचारला.

"वेल्डिंग करण्यासाठी वापरतात ते इलेक्ट्रोड्स आहेत." मिस्टर वाघ निर्विकार चेहऱ्याने म्हणाला.

"गिव्ह दोज टू मी! तुम्ही कोणतीही वस्तू आणि तीही जी प्राईम एव्हीडेन्स ठरेल अशी तुम्ही घरी नाही घेऊन जाऊ शकत!" वरुणने मिस्टर वाघला खडसावले.

या प्रकारामुळे नवीन मात्र आतून चांगलाच सुखावत होता. हे मिस्टर वाघला समजून आलेच. मग त्यानेही कुरघोडी केली.

"मी देखील या केसवर ऑफिशियल इन्वेस्टीगेटर आहे. तुम्ही मला रोखू शकत नाही!"

'इन्वेस्टीगेटर कसला? तू तर एलिगेटर आहेस.' नवीन पुटपुटला.

त्याच्या ओठांची हालचाल झाल्याने तो नेमके काय म्हणाला हे मिस्टर वाघला समजले. तो नवीनकडे रोखून पाहू लागला, तसा नवीन चपापला आणि खाली पाहू लागला.

"बट आय डोन्ट अलाव्ह दॅट! अँड इस्पेशली टू यू!" वरुण रागाच्या फणकाऱ्यातच बोलला.

"वन थिंग ऑलवेज् रिमेम्बर मिस्टर वरुण त्रिपाठी; आय एम नॉट बॉण्ड टू यू! मी ही केस कमिशनर यांच्या सांगण्यावरुन हाताळतोय. त्यांनी मला सांगावं. मी निघून जाईन. अदर व्हाईज नो!" मिस्टर वाघने वरुणला ठामपणे ठणकावले,

"आणखी एक! या प्रकारातील बऱ्याच गोष्टींची उकल मीच केली आहे. ज्यात तुम्ही, तुमची संपूर्ण टीम आणि यंत्रणा कुचकामी ठरली आहे!"

"यू बास्टर्ड...!"

वरुणने मिस्टर वाघाची कॉलरच पकडली!

मिस्टर वाघ मात्र काहीच भाव चेहऱ्यावर न आणता त्याच्या कॉलर धरलेल्या हाताकडे पाहत होता फक्त.

हा गदारोळ पाहून दूर फौंड्रीतील कर्मचाऱ्यांची चौकशी करत असलेले कमिशनर धावत तेथे आले आणि त्यांनी वरुणचे हात मिस्टर वाघच्या कोलरवरून खाली घेतले,

"हे काय करताय मिस्टर वरुण? पब्लिकमध्ये तेही फिल्डवर आपण आपल्याच सहकाऱ्याशी भांडणे आपल्याला शोभत नाही. अशाने चुकीचा मेसेज जाईल फक्त! विसरू नका मीडिया आपल्या मागावर आहे. आपली एक चूक आणि सगळं संपेल. लोकांना आपल्याला हरलेलेच तर पाहायचंय. त्यामुळे आपण सामंज्यस्याने घ्यायला हवे! लेट हिम डू व्हॉट ही वॉन्ट्स. आय अशोअर यू!"

कमिशनर मिस्टर वाघची जबाबदारी घेतायत म्हंटल्यावर वरुण थोडा ढिलवला.

"ओके! पण मी याला सगके इलेक्ट्रोड्स घेऊ जावू देणार नाही!"

"मिस्टर वाघ, इस इट फाईन टू यू?" कमिशनरनी अगदीच नम्रतेने मिस्टर वाघला विचारले.

"तुम्ही त्याला काय विचारताय? मी माझा निर्णय सांगतोय!" वरुण अजूनही ठाम होता.

यावर काहीच न बोलता मिस्टर वाघने सर्व इलेक्ट्रोड्स खुले हात करून वरुण समोर धरले. वरुणने स्वतः काही इलेक्ट्रोड्स त्यांतून निवडले व साथी ऑफिसर करवी फॉरेन्सिकला पाठवून दिले.

# डेव्हिल्सेस् गेट - टुगेदर

ऑल डेव्हिल्स व्हेअर गॅदर्ड ऑन द सेम टेबल अगेंस्ड मिस्टर वाघ! पण याचा खरंच काही उपयोग होणार होता का?...

'मला अगदी पहिल्यापासून त्या वाघवर संशय आहे. जिथे - जिथे गुन्हा घडलेला असतो, तिथे - तिथे हा आधीच हजर असतो!' नवीनने बोलायला सुरुवात केली.

'मीही सहमत आहे. त्याने नेलेल्या इलेक्ट्रोड्सचा रिपोर्ट क्लिअर आलाय.' वरुण बोलला.

'सॉरी टू से. मी ऑफेन्ससाठी बोलत नाही, पण तो तसा तुम्ही नेलेल्या लेक्ट्रोड्सचाही आला आहेच ना? शंका नको म्हणून विचारतोय.' कार्तिक बोलला.

'पण त्याने तेथील इतक्या वस्तू सोडून इलेक्ट्रोड्सच का उचलावीत? शंकेला जागा आहे, की नाही?' वरुणने त्याचा तर्क सांगितला,

'त्याला त्याबद्दल आधीच काही माहीत होते का? त्याचे कॉल रेकॉर्ड्सही रजिस्टर होत नाहीत. त्याच्या मागे लावलेल्या ऑफिसर्सना ही तो कसा चकवा देऊन निघून जातो हे त्यांनाही कळत नाही...'

आपल्या घरी बसून हे ऐकताना मिस्टर वाघ मात्र मनमोकळे स्मित करत होता, चहा घेत. त्याच्या नाकपुड्यांतून निघालेल्या उष्माने त्याच्या ओठांजवळील चहाची वाफ जवळपास विखुरली गेली. त्या वाफेतून मिस्टर वाघचे ते दिलखुलास स्मित सुद्धा काही तरी गूढ भासत होते, काही तरी गूढ सांगत होते...

'शेखरची बायको आणि बाबाराव देसाई यांची पणती प्रभा हिच्याकडे मी शेखरच्या आजाराबद्दल चौकशी केली. तो पहिल्यापासूनच पार्किन्सन्स डिसीजपासून त्रस्त होता. म्हणजे तिने आजाराचा स्पष्ट उल्लेख केला नाही, पण तिने जी सिम्टम्स् सांगितली होती ती बऱ्यापैकी पार्किन्सन्स डिसीजशी जुळतात. फौंड्रीमध्येच काम करत असताना त्याला एकदा सिरीयस हेड इंज्युरी झाली होती. एक हेवी मेटल पार्ट त्याच्या डोक्यावर पडला होता. त्यावेळीही सुशांत निकमने नुकसान भरपाई तर दूर, पण उपचाराचे पैसेही दिली नव्हते. आणि जेवढे दिवस तो कामावर गैरहजर होता तितके दिवस शेखरचा पगारही कापण्यात आला होता. म्हणून मग बाबारावांनी त्यांच्या नांवावर जी काही उरली सुरली दोन एकर जमीन होती, ती विकली होती आणि त्याचे उपचार केले होते. या उपकाराची जाण म्हणूनच प्रभा आणि शेखर ऐपत नसताना बाबारावांना सांभाळत होते.

'प्रभाकडून टेक्निकल इन्फॉर्मेशन मिळणे कठीण होते म्हणून मग मी त्याची ट्रीटटमेंट करत असलेल्या न्यूरॉलॉजिस्टला भेटलो. त्यांच्याकडून समजले, की या डोक्याच्या इंज्युरीमुळेच शेखरला पार्किन्सन्स डिसीज हा आजार झाला होता. हा

लॉन्ग टर्म डिजनरेटिव्ह न्यूरॉलॉजीकल डिसऑर्डर आहे. जे मेन्ली मुव्हमेंटवर अफेक्ट करतं. त्याचा मेंदू कधी कधी रिस्पॉन्ड करणे बंद करायचा. डोपामाईन प्रोड्यक्शनही कमी होत चालले होते. तो पार्शिअली पॅरेलाईज्ड् होता ते त्यामुळेच. त्याच्या हातामधील व मेंदूमधील ताळमेळ कधी कधी हरवायचा. तो कित्येकदा रिस्पॉन्ड करायचा नाही. बोलतानाही अडखळायचा. त्याचा मूड, वागणे, विचार बदलत रहायचे. शरीरात कापरे भरायचे. अलीकडच्या काळात तो डिप्रेशनचाही शिकार झाला होता. कसून प्रॉब्लेम चालू झाले होते. गिळण्यासही त्याला त्रास व्हायचा. चालण्यातही त्याची गती कमी झाली होती. ही सगळी सिम्टम्स् पार्किन्सन्स डिसीजचीच आहेत. मी फिजिशियनकडून कंफॉर्म करून घेतलंय. शिवाय ही डिसीज कम्पीट्ली क्युरेबल नाही. पण याला औषधांनी आटोक्यात ठेवता येते.' वरुणने सारे विगतवार विश्लेषण केले.

'म्हणजे हाही निव्वळ एक एक्सिडेंट होता?' कार्तिकने प्रश्न उपस्थित केला.

'हो! कारण अटॉप्सी रिपोर्टवरच माझे समाधान झाले नव्हते. त्यामुळे मी नंतर मिस्टर वाघ आणि कमिशनरच्याही अपरोक्ष शेखरच्या आसपास काम करत असलेल्या सर्व वर्कर्सच्याही टेस्ट्स फॉरेन्सिक कडून करवून घेतल्या. त्याच्यात सुद्धा नायट्रिक ऑक्साईडचे प्रमाण थोडे अधिक आढळून आले. आणि मगच मी आश्वस्त झालो.' कार्तिक म्हणाला.

'काहीही म्हणा, पण ज्या - ज्या लोकांचे मृत्यू झालेत, त्या सगळयांच्या जरी एक्सिडेंटल किंवा नॅचरल डेथ्स् असल्या, तरी ही जरा अतिशयोक्तीच नाही का, की

बाबारावांच्या नात्यातील मेलेल्या लोकांना काही ना काही मोठे आजार असावेत? किंवा त्यांच्या माहितीतील लोकच मरत आहेत. त्यामुळे हे सगळेच्या सगळे मर्डर्स आहेत यात मला तरी काही शंका नाही!' नवीन दोघा मोठ्या ऑफिसर्स समोर जरा धिटाईनेच बोलला. कदाचित ही धिटाई मिस्टर वाघवरच्या रागातून आली असावी...

आणखी एक मृत्यू झाला. नवीनच्या ज्यूरिसडिक्शन मधील घटना... पण यावेळी मात्र बाबाराव देसाईंशी या खुनाचा काही संबंध नव्हता. वरकरणी तरी तसेच दिसत होते. म्हणून या केसची संपूर्णतः जबाबदारी ही नवीन खाडेची होती.

क्राईम सीनवर तो पोहोचला. एका अरुंद गल्लीतील सिमेंट ब्लॉक्सच्या विटांनी बांधलेली एक साधारण खोली. सिमेंटचे पत्रे असलेले छत. थंडगार जमीन आणि अंधारात पडलेले ते त्याहूनही थंडगार शव...

# दि लास्ट मूव्ह

किती दिवस झाले बाबाराव देसाईंची केस चालू आहे याची गणती नव्हती. आणखी किती दिवस चालू राहील याचा अंदाज नव्हता...

तशात हे आणखी...

मरून पडलेल्या व्यक्तीच्या पोटात सूरा खुसून खून केला गेला होता. बाबारावांच्या मरणानंतर इतक्या दिवसांत नवीनने पहिल्यांदाच एवढी साधारण मर्डरची केस पहिली होती. ही केस जाता - जाता सॉल्व्ह होईल अशी त्याला आशा होती...

पंचनामा झाला. डेडबॉडी हलवण्यात आली. पोस्टमार्टम करण्यासारखे काही नव्हते. तरी अटॉप्सी ऑपरेट करण्यात आली. काही विषेश सापडले नाही. खून सूरा खुपसूनच झाला होता. ७.२५ इंच खोल व १.५ इंच रुंद अशी जखम होती.

मेलेल्या व्यक्तीची माहिती गोळा करण्यात आली. त्याच्याकडे आढळलेल्या काही वस्तू जसे पाकीट, मोबाईल, त्याची गाडी, इत्यादींवरून त्याचा शोध घेण्यात आला.

मृताचे नांव शक्ती आनंद शुक्ला. मूळचा तो उत्तर प्रदेश मधला. कामानिमित्त दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्रात आलेला. कामानिमित्त इथे येणे हा फक्त त्याचा बहाणा होता. युपीमध्ये त्याच्या कारखान्यात बनणाऱ्या अवैध बंदुकांना इथले मार्केट खुले व्हावे म्हणून तो इथे आला होता आणि या दहा वर्षांत त्याने इथे खूप जम बसवला होता हे त्याच्या फोन कॉन्टॅक्ट्स व रेकोर्ड्स वरून कळून आले. पण त्याला जवळचे असे कोणी नातेवाईक नव्हते. त्याच्या व्यवसायातील कोणी तरी हा खून केल्याची शक्यता आता समोर येत होती...

अगदीच साधारण वाटणारी ही केस अशी चिघळत जात होती... एका काजव्याने सूर्याचे रूप घेतले होते.

नवीनने कार्तिक आणि वरूणकडे जाण्याचा निर्णय घेतला. कारण यात आतांकवाद्यांचा अंतर्भाव असण्याची शक्यताही आता डोकावत होती. वरुणने संपूर्ण यंत्रणा या प्रकरणाच्या उकलीसाठी खर्ची घातली. या सर्व हालचालींत मिस्टर वाघला जाणून बुजून या इन्वेस्टीगेशन बाहेर ठेवण्यात आले.

कार्तिकलाही उघडपणे यात भाग घेता येत नव्हता. शिवाय त्याची मेडिकल लिव्ह केव्हाचीच संपली होती. मात्र यासाठी त्याने एक नामी शक्कल लढवली होती. गावातीलच एका मानसोपचार तज्ज्ञांकडून त्याला अधिक ट्रीटमेंटची गरज असल्याचा एक रिपोर्ट रायटिंग मध्ये घेतला आणि तो ब्युरोला मेल केला आणि आपली लिव्ह

वाढवून घेतली होती. पण मात्र तो अधिकच लपून राहू लागला. नवीन आणि वरुण कडून जी माहिती मिळेल तेवढीच.

शक्ती शुक्लाच्या कॉन्टॅक्ट्समधील झाडून पुसून सगळयांना अटक करण्यात आली, एक व्यक्ती सोडून. सगळयांची अगदी कसून चौकशी देखील करण्यात आली, पण काहीच होऊ शकले नाही.

दुसरीकडे मीडिया व त्यांच्या मार्फत बाबाराव देसाई समर्थक आणि सरकार विरोधक मात्र तपास यंत्रणेच्या या डायव्हर्जनमुळे त्यांच्यावर चांगलेच तोंड सुख घेत होते. यात स्वतःचे स्वार्थ पाहणारे आणि समाजाची दिशाभूल करणारेही बरेच होते.

इन्वेस्टीगेशन टीमचा प्रवक्ता म्हणून उभारलेल्या नवीनकडून मीडिया मार्फत लोकांना एवढेच सांगण्यात आले,

"आम्ही तपासापासून भरकटलो नाही आहोत. यातून आम्हाला नक्कीच एखादी लीड मिळेल अशी आम्हाला आशा आहे!"

"अशी आशा पोलिसांना का वाटते हे आपण जनतेला खुलासेवार सांगावे." एका महिला पत्रकाराने नवीनकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला.

पण नवीन सुद्धा हुशार, त्याला तिचा हा प्रयत्न चांगलाच लक्षात आला. जनतेच्या उल्लेखाने त्याच्यावर उत्तरे देण्यासाठी प्रेशर टाकण्याचा पंचवीस वर्षीय त्या महिला रिपोर्टरचा हा प्रयत्न आहे हे त्याला लक्षात आले.

"आताच आम्ही काही माहिती बाहेर काढू शकत नाही!" नवीनने तो प्रयत्न हाणून पडला.

"का नाही? तुम्ही जनतेच्या प्रश्नांच्या उत्तराचे देणे लागता! जनतेला हे कळलंच पाहिजे, की पोलिसांचा तपास कशाप्रकारे चालू आहे. जनतेला हे कळलं पाहिजे, की ते या समाजात कितपत सुरक्षित आहेत?" तिने पुन्हा तोच सायकॉलॉजीकल गेम खेळण्याचा प्रयत्न केला.

"मान्य आहे! पण जनतेने सुद्धा हे समजून घेतले पाहिजे, की आम्ही आम्हाला मिळालेल्या लीड्स जर असे जाहीर टीव्ही चॅनेल्सवर सांगत बसलो, तर आम्ही कधीच गुन्हेगाराला पकडू शकणार नाही! आम्ही जी गुप्तता पाळतो, ती जनतेच्याच सुरक्षेसाठी!"

जनतेच्या नांवानेच आता नवीनने महिला रिपोर्टरला गप्प केले. आणि जनतेच्याच नांवाने त्याने तिला तिच्या आगाऊ प्रश्नांचे उत्तर दिले.

रिपोर्टर्सच्या प्रश्नांना तर टाळता आले, पण ओथोरिटीजचे काय?

नवीनचा बाईट् झाल्या - झाल्या होम मिनिस्ट्री मधून इन्वेस्टीगेशन टीमचा प्रमुख असलेल्या वरुणला घरचा आहेर देण्यासाठी फोन आला.

'विल यू प्लिज एक्स्प्लेन, हाऊ कॅन धिस मॅन शुक्ला विल हेल्प अस टू कॅच बाबाराव देसाईज मर्डरर?' पलीकडून खुद्द रक्षामंत्री बोलत होते.

"सर, मरे हुये शक्ती शुक्ला के रेकॉर्ड्स से मालूम हुआ हैं, की उसने माऊसर सी नाइन्टी सिक्स यह पिस्टल किसीं समर नकाते को बेचीं थी; जिससे लेट बाबाराव देसाई का मर्डर हुआ हैं! हम उसीकी तलाश मैं हैं।" वरुणने घाम पुसत स्पष्टीकरण दिले.

'ठीक हैं! जो करना हैं जलदी करो! कोई भी गलती नहीं होनी चाहीये!'

पलीकडून न सांगताच फोन डिस्कनेक्ट करण्यात आला होता.

"अरेऽऽऽ याऽऽऽर...! मला आत्तापर्यंत वाटत होते, मिस्टर वाघच हे सगळं करत आहे; पण आता हे काही नवीनच?..." माझा मेंदू ओरडत होता.

मिस्टर वाघ काही तरी म्हणाला तसा मी भानवरती आलो.

"अं?"

"अरे मी विचारले आई कुठे गेल्या आहेत, कधी येणारायत?"

'आई? आता याचे आईकडे काय काम?' मनात मी स्वतःला प्रश्न केला आणि त्याला बोललो,

"गावी गेलीये. पाहुण्यांच्यात लग्न आहे. संध्याकाळ होईल. का?"

"हॅ! मग अजून वेळ आहे. नाही बराच वेळ आपण बोलतोय, आई साहेब आल्या तर अवघड होईल म्हणून विचारले.

'हा... एवढंच होय...' सुटकेचा निःश्वास...

'पण चला या निमित्ताने हे तरी कळालं, की मिस्टर वाघ या जगात कोणाला तरी घाबरतो; आणि तेही माझ्या आईला...'

'आमचा संबंध तुटेल म्हणून ही भीती का?...'

"कंटीन्यू करू?" त्याने विचारले.

एक तर मी नाही म्हंटले तर हा ऐकणार होता का? तर नाही. शिवाय मला उत्सुकता आधीपासून होतीच; ती आता शिगेलाही गेली होती. आणि आईबद्दल विचारणं हे मात्र त्याचं एक नाटक. त्याला जर आई संध्याकाळपर्यंत नाही हे माहीत नसते, तर तो आलाच नसता.

माझा अडकलेला स्वास मोकळा करण्यासाठी त्याने विषय थोडावेळ भरकटवला होता.

फोन नंबरवरून वरुणच्या टीमकडून टेलिकॉम कंपनीच्या मदतीने समर ऋषीकेश नकातेचा अड्रेस शोधण्यात आला, पण तो खोटा होता. शक्ती शुक्लाच्या

वही खात्याच्या रेकॉर्ड्सवरून समरने माऊसरसाठी शक्ती शुक्लासोबत डिलींग केल्याचे समोर आले होते.

दोनच दिवसांनी वरुणला दुसऱ्या एका शहरातील ज्यूरिसडिक्शन मधून आणखी एक कॉल आला. वरुण नवीन व कमिशनरला घेऊनच इंफॉर्म केलेल्या ठिकाणी पोहोचला.

एका फ्लॅटवर एका व्यक्तीचा मृतदेह पडला होता. बरेच रक्त वाहून गेले होते. तरी रक्ताचा निचरा अजूनही होतच होता. डोक्याच्या आरपार गोळी गेली होती. ती व्यक्ती सोफ्याला रेलून पडली होती. एक पाय दुमडलेला आणि दुसरा पसरलेला. दुमडलेल्या पायाच्या मांडीवर 'ग्लॉक' पडली होती.

फ्लॅटची तपासणी करण्यात आली. त्यावरून जो मेलाय तोच समर नकाते असल्याचे आणि हा फ्लॅट देखील त्याचाच असल्याचे कळून आले.

समोरील दृश्यावरून तरी ही आत्महत्या असल्याचे दिसून येत होते. पंचनाम्यानंतर बॉडी अटॉप्सीसाठी हलवण्यात आली... आता याचा रिपोर्ट आल्याशिवाय यांना काहीच काम उरले नाही.

आता यावेळी मात्र कार्तिकला लपून राहणे शक्य नव्हते. असह्य होऊन तो बाहेर पडला.

दुसऱ्या दिवशी कमिशनरचे केबिन; कमिशनर, वरुण, मिस्टर वाघ आणि काही विश्वासातले ऑफिसर्स केसचे सर्व धागे जुळवण्याचा प्रयत्न करत होते, तोच दारावर नॉक झाले.

"येस?" कमिशनर ओरडले.

एक कॉन्स्टेबल आत आला.

"सर, सीबीआय इन्स्पेक्टर..." त्याचे वाक्य पूर्ण होण्याआधीच कार्तिकने आत एन्ट्री मारली आणि सगळ्यांनी दचकून आपापल्या खुर्च्या सोडल्या. नवीन, वरुण आणि मिस्टर वाघ सोडून.

"मिस्टर कार्तिक आपण?" कमिशनरने वाक्य पूर्ण केलेच नाही.

कार्तिकची नजर मिस्टर वाघवर होती.

"मी बोलावलंय त्यांना." कमिशनर कार्तिकचा रोख ओळखून बोलले.

"सुरुवातीपासून मी इथेच आहे! आणि ही गोष्ट मिस्टर वरुण यांनाही माहीत होती." त्यांनी कमिशनर यांना खुलासा केला,

"पण हे या केबिनबाहेर जाता कामा नये!"

हे वाक्य कार्तिक मिस्टर वाघकडे बघून म्हणाला. यावर मिस्टर वाघने फक्त स्मित केले. त्याची ही क्रिया कार्तिकला मात्र चिडवून गेली.

'पण कुठे या मूर्खाच्या नादी लागा' या अविर्भावात त्याने मिस्टर वाघकडे दुर्लक्ष केलं. ही गोष्ट लक्षात आल्याने मिस्टर वाघला अजूनच हसू आलं. आणि त्याच्या ओठांवरील स्माईल अधिकच ब्रॉड झाली.

इतक्यात काची दारावर पुन्हा नॉक झाले. कमिशनरना आता कोण आहे हे विचारण्याचाही वैताग आला होता. कोण येणार आहे हे देखील त्यांना गृहीत असावे. म्हणून त्यांनी काहीच प्रतिक्रिया दिली नाही. मघासचाच कॉन्स्टेबल कसलेसे एन्वेलोप घेऊन नॉक करून आत आला. हा बहुदा कमिशनरच्या मर्जीतला असावा. कारण एवढ्या कॉन्फिडेनशीयल मिटिंगमध्ये सुद्धा तो ये - जा करत होता हे वाघचे निरीक्षण.

"काय?" कमिशनरचा पुन्हा वैताग.

"सर, फॉरेन्सिककडून पीएम रिपोर्ट आलाय."

"आला का. ठीकाय." चेहऱ्यावरील वैतागाचे जाळे कमी न करता कमिशनर बोलले.

जवळ उभ्या कार्तिकने तो हाती घेतला आणि डोळयाने व मानेने त्याला जाण्याची खून केली.

"रिपोर्ट काय म्हणतोय?" वरूणने रिपोर्ट पाहत असलेल्या कार्तिकला विचारले.

नाराजीनेच त्याने वर पाहिले. ओठ फुगवून नकारार्थी मान हलवत,

"काहीच फायदा नाही. इट्स प्योअर्ली अ सुईसाईड. तेथे सापडलेली युज्ड् बुलेट समरचीच कवटी छेदूनच भिंतीत अडकली होती. समर जवळ सापडलेले कार्टेज त्याच नाईन एमएम बुलेटचे, त्याच्या मांडीवर सापडलेल्या ग्लॉक सेवेन्टीनचेच आहे."

नवीनने उठून कार्तिकला बसण्यास खुर्ची दिली आणि तो बाजूला उभा राहिला. कार्तिक खुर्चीत रेलून बसला, टेन्शनच्या जाळयात.

"काय करावे, काऽऽऽय कऽराऽऽवेऽऽऽ?" कार्तिक पुटपुटला, पण थोडे लाऊड.

त्याच्या हातून वरुणने रिपोर्ट घेतला.

"त्याच्याकडे सापडलेल्या ग्लॉकनेच त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट आहे. नवीन, त्याच्या फ्लॅटवर तपासात काही सापडले?" कार्तिकने विचारले.

अदबीने उभारलेला नवीन पुढे झाला,

"सर, एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या वेपेन कलेक्शनमध्ये एक माऊसर आणि माऊसरचे अराऊंड फोर कार्टेजेस् सापडलेत. शक्ती शुक्लाच्या रेकोर्ड्स नुसार समर नकातेने एक माऊसर आणि त्याचे पाच राऊंड्स शक्ती शुक्लाकडून विकत घेतले होते."

नवीनने सांगितलेली माहिती ऐकून कमिशनरचे डोळे चमकले. कार्तिकही सावरून बसला.

"पर्चेस डेट कधीची आहे?" कार्तिकने विचारले.

"बाबाराव देसाई यांच्या मृत्यूच्या आधी चार दिवस!"

"बिंगो! दॅट्स इट! नाऊ धिस केस इज् क्लिस्टर क्लिअर!" कमिशनरना हुरूप आला. ते उत्साहाने ओरडले.

"आपल्याला असे लगेच कंक्लूजन काढता नाही यायचे. काही गोष्टी अजून कन्फर्म व्हायच्या आहेत." कार्तिकने कमिशनरच्या उत्साहाला आळा घातला,

"म्हणजे बघा, एक तर या समर नकातेने ज्याच्याकडून वेपेन विकत घेतले त्याला म्हणजे शुक्लाला का ठार का मारले? आणि मग त्याने स्वःताही आत्महत्या का केली? अजून एक, की त्याने खरेच बाबारावांना जीवे मारले असेल, तर त्यामागे त्याचा मोटिव्ह काय? असे काही प्रश्न अनुत्तरीतच राहतात."

कार्तिकच्या या बोलण्याने कमिशनरच्या चेहऱ्यावर पुन्हा वैतागाची छाया पसरली.

"साहेब..." म्हणत पुन्हा तोच कॉन्स्टेबल यावेळी नॉक न करताच डायरेक्ट आत आला. त्याच्या हातात एक लॅपटॉप होता व आणखी एक इन्वेलोप होता. यावेळी कॉन्स्टेबलच्या हाती ग्लव्हज् होते. हा लॅपटॉप काही महत्वाचा एव्हीडेन्स असणार हे मिस्टर वाघच्या लक्षात आले.

कॉन्स्टेबलने तो लॅपटॉप कमिशनर समोर डेस्कवर ठेवला.

"हा लॅपटॉप?" कार्तिकने विचारले.

"समर नकातेकडे सापडला. पण याला पासवर्ड होता. तोच डिकोड करून सायबर डिव्हिजन कडून आला आहे." नवीनने सांगितले.

"म्हणजे तुम्ही सांगितले होते तो हाच का?"

"हो सर."

कमिशनरनी सायबर क्राईम युनिटला फोन लावला.

"हा हॅलो. कमिशनर शिंदे बोलतोय. लॅपटॉप मिळाला. थँक्स् फॉर दि को - ऑपरेशन. सगळा डेटा नीट रिस्टोर झालाय ना?"

'हो डिलिटेड सर्व डेटा रिस्टोर केला गेला आहे.' पलीकडून सांगण्यात आले.

"थँक्स वन्स अगेन. ठेवतो." त्यांनी रिसिव्हर ठेवला.

"लेट्स सी वॉट्स इंसाईड?" म्हणून वरुणने लॅपटॉप ओढला आणि त्यातील फोल्डर्स व फाईल्स एक - एक करून उघडून पाहण्यास सुरवात केली.

कार्तिकही त्याच्याकडे सरकून बसला. नवीनही एव्हाना एक रिकामी खुर्ची बाहेरून आणून कार्तिकमागे बसला होता. तो लॅपटॉप पाहण्यासाठी पुढे झुकला.

कमिशनरनी इन्वेलोप पाहायला सुरवात केली. फॉरेन्सिककडून आलेल्या तो रिपोर्ट पाहून झाल्यावर,

"लॅपटॉपवर समर नकाते सोडून दुसऱ्या कोणाच्याच फिंगरप्रिंट्स आढळल्या नाहीत. म्हणजे..."

"म्हणजे यातील माहिती ही शंभर टक्के ओथेन्टीक असणार आहे!" वरुणने एक्साईटमेंटमध्ये कमिशनरचे वाक्य तोडले.

आता कमिशनर यांनी पण थोडे पुढे सरकून आपले डोके मध्ये घातले. मिस्टर वाघ मात्र काही देणे - घेणे नसल्यासारखा मागे रेलून बसला होता.

दोन - अडीच तास सगळं पाहण्यात गेले. काही सापडले नाही. मग कार्तिकने हिडन फाईल्स व फोल्डर्स पाहण्यास सुरवात केली.

त्यातही तासभर गेल्यावर काही अनटाइल्ड् एक्सेल फाईल्स सापडल्या.

एका फाईलमध्ये त्यांना समर नकातेने काही टाईप केलेले आढळले.

समर नकाते हा कॉन्ट्रॅक्ट क्रिमिनल होता. पैसे घेऊन तो लोकांची इल्लीगल कामे करायचा. अशी बरीच रेकॉर्ड्स त्या फाईल मध्ये सापडली.

त्याच्याकडून कामे करवून घेतलेल्या लोकांची नांवे, करावयाचे काम आणि त्या लोकांकडून घेण्यात आलेली रक्कम व शिल्लक रक्कम असे बरेच काही त्यात नमूद होती.

आणि त्यात बाबूचेही नांव होते...

बाबू सुतारने समर नकातेला वीस लाख रुपये देण्याचे ठरले होते आणि त्यातली ५०% रक्कम त्याला ॲडव्हान्स देण्यात आली होती बाबाराव देसाई यांना ठार मारण्यासाठी. आणि बाबूने हे का केले असेल याची कारणे तर सगळयांनाच माहीत होती.

त्यात पुढे हे देखील नमूद केले होते, की ड्यू रक्कम बाबूकडून वसूल झाली नव्हती.

"बाबूचे इंटेरोगेशन चालू होते आणि नंतर तर तो मेलाच. त्यामुळे पैसे द्यायचे राहिले असतील." वरुण म्हणाला.

"याह् राईट. असंच वाटतंय!" कार्तिकने दुजोरा दिला.

पुढील एक्सेलशीट पाहण्यात आली. त्यामध्ये समर नकाते किती जणांचे पैसे द्यायचा बाकी आहे ते नमूद केले होते.

त्यात शक्ती शुक्लाचे नांव होते. समर शक्ती शुक्लाचे पाच लाख रुपये देणे बाकी होता.

शक्ती शुक्लाकडील रेकॉर्ड्सवरून हे कळलेच होते, की दोघांमध्ये व्यवहार व्हायचे. समरने शक्तीकडून बऱ्याच वेळेला महागडी आणि विंटेज वेपेन्स खरेदी केली होतीत. त्यांतील पैसे तो देणे बाकी होता.

"याच कारणावरून तर समर नकातेने शक्ती शुक्लाला ठार मारले नसेल!" नवीनने आपला तर्क बोलून दाखवला.

"असू शकते." वरुण म्हणाला.

"पण त्याने स्वतः आत्महत्या करण्याचे कारण अजूनही उघड होत नाहीये..." समाधान न होऊन नकारार्थी मान हलवत कार्तिक बोलला.

"शुक्लाचे पेमेन्ट फक्त बाकी होते?" इतका वेळ गप्प बसलेल्या मिस्टर वाघने प्रश्न केला.

सर्वांनी त्याच्याकडे पाहिले.

"नाही. अजून चारजण आहेत. सगळी रक्कम मिळून एक कोटी बाहत्तर लाख काहीतरी होते." स्क्रीनमध्ये पाहत कार्तिकने मानातल्या मनात बेरीज करून मिस्टर वाघला सांगितले.

"साहजिक एवढी मोठी रक्कम तो आणणार कोठून होता? आणि प्रत्येक देणेकऱ्याला मारणे तर त्याच्यासाठी रिस्की असणार. मग तो दुसरे करणार काय?" मिस्टर वाघ पुढे बोलला.

"पण तो स्वतः हिटमॅन आहे. तो खुनी देणेकऱ्यांना घाबरला हे कसे मानावे?" वरुणने मिस्टर वाघला पृच्छा केली.

"बाबारावांच्या मर्डर नंतर त्याने हाड्‌र्ली एखाद - दुसरे असायनमेंटच घेतले असेल नाही?" मिस्टर वाघने त्यालाच उलट प्रश्न विचारला.

मिस्टर वाघचा हा अनपेक्षित प्रश्न ऐकून कार्तिकने पुन्हा मागील एक्सेलशीट ओपन केली.

मिस्टर वाघचे म्हणणे बरोबर होते. बाबारावांच्या मृत्यूनंतर त्याने एकच असायनमेंट घेतल्याची नोंद होती.

हे पाहून सर्वचजण आश्चर्यचकित झाले.

"तुमच्या हे कसं...?" कार्तिकच्या तोंडून अचानक शब्द बाहेर पडले. आतापर्यंत कोणाचेच या गोष्टीकडे लक्ष गेले नव्हते.

"सिंपल!" मिस्टर वाघ कार्तिकचे वाक्य मधेच तोडत बोलला,

"साहजिक पोलीस बाबूपर्यंत पोहोचलेत हे समजल्यावर हे प्रकरण शांत होईपर्यंत आपण गप्प बसू असाच त्याचा विचार झाला असेल. इट्स ए सिम्पल सायकॉलॉजी. कोणत्याही क्रिमिनलला पकडले जाण्याची भीती असतेच की. पोलीस कधी ना कधी त्याच्यापर्यंत पोहोचणार हे त्याला स्पष्ट होते. म्हणून तर त्याने हा डेटा देखील डिलीट केला. तो गप्प बसला म्हणजे इन्कम थांबला; पण देणेकरी थांबत नाहीत ना. मग काय; केली आत्महत्या!"

मिस्टर वाघाची थेअरी पटण्यासारखी होती!

"पण डाऊट उरतोच! समर नकाते क्रिमिनल असून आपल्या कामाचे रेकॉर्ड्स का ठेवत असेल?"

"अशा लोकांना आमचे शिक्षक शंकासूर म्हणायचे!" मिस्टर वाघने नवीनला टोमणा मारला.

"मिस्टर वाघ!" वरुण डाफरला.

"नाही तर काय? आता या प्रश्नाला काही अर्थ आहे का? त्याला राहवत असेल ऑर्गनाईज्ड् त्यात नवीनला काय प्रॉब्लेम आहे?" मिस्टर वाघ पुन्हा तिरकस बोलला.

कार्तिक सुद्धा मिस्टर वाघकडे रागाने पाहू लागल्याचे पाहून कमिशनर मध्ये पडले,

"मिस्टर वाघ, तुम्हाला काय म्हणायचंय ते प्लिज नीट सांगा."

"आपण आपल्या कामांचे रेकॉर्ड्स ठेवत नाही? ठेवतोच ना? त्याला ओव्हर कॉन्फिडन्स असेल, की तो कधी पकडलाच जाणार नाही. शिवाय तुम्ही नकातेचे पूर्वायुष्य पाहिलंत, तर तो कॉमर्स स्टुडन्ट् असल्याचे तुमच्या लक्षात येईल. त्याने सीएचे शिक्षण पूर्ण केलं आहे. असेल त्याला तशी सवय."

कमिशनरनी होकारार्थी मान डोलवली.

"आता सगळे स्पष्ट झाले! स्वातंत्र्य सेनानी बाबाराव देसाईंचा खून बाबूने समर नकाते कडून करवून आणला आणि त्यासाठी त्याने शक्ती शुक्लाकडून माऊसर खरेदी केली!" कमिशनरच्या चेहऱ्यावर मोकळे हसू आले. त्यांचा चेहरा खुलला.

"पण मग बाबारावांच्या नातेवाईकांचे काय?" नवीन पहिल्यापासूनचा आपला मूळ मुद्दा सोडायला तयार नव्हता.

"त्या प्रत्येकाचा मृत्यू कसा झालाय हे आधीच स्पष्ट झाले आहे. नाही का खाडे?" मिस्टर कमिशनरनी नवीनला विचारले.

"पण सर, बाबारावांचे नातेवाईक किंवा त्याच्या संपर्कातील लोकांचे इतक्या मोठ्या प्रमाणात मरणे शंकास्पद वाटत नाही?" नवीनने आपला मुद्दा पुन्हा रेटला.

"तसे कसे म्हणू शकतोस तू खाडे? बाबू सुतार, शक्ती शुक्ला आणि समर नकाते यांच्या मरणांतरही तुला असे वाटते?" कमिशनरनी ही आपला मुद्दा लावून धरला.

"हो कारण तेही या - ना कारणाने बाबारावांशी जोडले गेले होते." नवीन त्याचा हेका सोडायलाच तयार नव्हता.

मग कार्तिकनेच या कॉन्व्हरसेशनवर विरजण टाकले,

"आय डोन्ट एक्सेप्ट धिस थेअरी! समर नकाते आणि शक्ती शुक्ला याचा तसा डायरेक्ट संबंध बाबाराव देसाईंशी नव्हता. समर नकातेला त्यांना मारण्यासाठी बाबू सुतारकडून असायनमेंट मिळाली होती आणि त्यासाठी त्याने शक्ती शुक्लाकडून माऊसर विकत घेतली होती एवढाच या दोघांचा बाबारावांशी आलेला संबंध! आणि तोही इंडायरेक्ट.

"आय थिंक कमिशनर इस राईट! अँड अफ्टर ऑल, आपल्याला लेट बाबाराव देसाई यांचा खुनी शोधायचा होता. ते काम झाले आहे!" कार्तिकही आता रिलॅक्स झाला,

"हजारे, चहा सांगा सगळयांना. इतके दिवस डोके बधिर झाले होते. डोक्याच्या नसा जरा ढिल्ल्या करूया चहा पिऊन!"

असे बोलून कार्तिक निवांत दोन्ही हात डोक्यामागे घेऊन खुर्चीला रेलला. हजारे नांवाचा ऑफिसर चहासाठी बाहेर धावला.

"वेल देन, माय नेम इज क्लिअर्ड ऍट द लास्ट! आईल टेक अ लिव्ह. एन्जॉय युअर पार्टी!" असे म्हणत मांडीवर हात ठोकत मिस्टर वाघ उठला.

"कुठे चाललात मिस्टर वाघ? आणि नेम इज क्लिअर्ड म्हणजे?" कमिशनरनी प्रश्न केला.

"ते विचार तुमच्याच लोकांना!"

कमिशनर काही बोलण्याआधी मिस्टर वाघने केव्हाच केबिन सोडले होते.

मिस्टर वाघने त्याची १९६० ची कॅडीलॅक सडॅन पार्किंग मधून बाहेर काढली.

तेवढ्यात नवीन धावत गाडी समोर आला. मिस्टर वाघने घाईने ब्रेक मारला. नवीन ड्रायव्हिंग विंडोजवळ आला.

"जे काही झाले त्याबद्दल प्लिज माफ करा." नवीनने केविलवाण्या चेहऱ्याने दिलगिरी व्यक्त केली.

"हं! तुमच्या बड्या अफसरांना काय आपली चूक मान्य करून माफी मागायला काय कमीपणा वाटतोय वाटतं. तुम्हाला एकट्यालाच पाठवलंय." मिस्टर वाघ थोडा गुश्यातच उपरोधिक बोलला.

"तसे नाही. पण तुमच्यावर संशय घेण्याची सुरवात मीच केली म्हणून..." नवीन अपराधिपणाने बोलला.

"इट्स ऑल राईट. तुम्ही तुमचे कामच करत होतात. कायद्यापेक्षा कोणी मोठा नाही. मीही नाही. आय लाईक युअर कॉन्सिएन्शीयसनेस! तुमची कर्तव्यनिष्ठा मला आवडली. मला खात्री आहे तुम्ही खूप प्रगती कराल! बाय!"

मिस्टर वाघने नवीनचा निरोप घेतला आणि त्याची गाडी क्षणात दिसेनाशी झाली.

"फू... थँक्स टू गॉड! यावेळी तुम्ही कोणाला ठार मारले नाही. आणि सॉरी! मी सुद्धा आपल्यालावर डाउट घेतला होता!" मी उसासा टाकत बोललो.

"कोणी सांगितले मी कोणाला मारले नाही?" गूढ हसत तो माझ्याकडे पहात म्हणाला. त्याच्या डोळ्यात चमक दिसत होती.

"म... म्हणजे?" मी घाबरलो. अडखळलो.

"त्या सगळयांना मीच मारलंय!" मिस्टर वाघने सवयी प्रमाणे बॉम्ब फोडला.

मी त्याचक्षणी भीतीच्या अंधारात कोंडला गेलो. अंगा - अंगावर शिरशिरी आली...

"आय हॅड किल्ड ऑल ऑफ देम!"

असे बोलून त्याने त्याचे कृष्ण (?) कृत्य ठळक केले.

"पण का? त्यातील कोणीच गुन्हेगार नव्हते..." मी घाबरूनच होतो.

"पण कोणी इनोसेंटही नव्हते!" तो माझे बोलणे पूर्ण होण्या आधीच पटकन बोलला.

"अशाने सगळे गुन्हेगार तर मरतील, पण तरी एक मात्र जीवंत राहील!" मी ठामपणे मिस्टर वाघच्या डोळयांत रोखत बघून बोलून गेलो.

तोही माझ्याकडे रोखून बघत होता. काहीच भाव नाहीत. मलाच कळले नाही हे असे कसे झाले... मी असा कसा बोललो...

माझे हे बोलणे ऐकून तो उठला. माऊसर होलस्टरला खोचून घराबाहेर निघून गेला...

मी मात्र स्तब्ध!

'हा तर आता चिडला! आता माझा तर नंबर नाही ना?...'

# ऍन एन्काऊंटर विथ द डेथ गॉड्

'वाघ जाऊन मध्ये दोन - तीन दिवस गेलेत. पण कशातच मन लागत नाहीये...'

मी मिस्टर वाघने सांगितलेली ही घटना लिहून काढत होतो...

'त्याने या लोकांना का मारले हा प्रश्न अनुत्तरीतच होता. शिवाय ते गिल्टी होते म्हणजे नक्की काय? असा काय त्या सगळयांनी गुन्हा केला होता, की मिस्टर वाघने इतके मोठे हत्याकांड रचले? आणि कसे? नवीन, कार्तिक, वरुण सगळे त्याच्यावर नजर ठेवून होते. त्यांच्याकडे फिट केलेल्या ट्रान्समीटर्सचे काय? त्याने हे कसे जुळवून आणले? आणि माऊसर...'

'शॅ! काहीच टोटल लागत नाही! मी जीभ आवरायला हवी होती. तो नाराज झाला आणि निघून गेला. आता पुन्हा तो मला भेटेल? बोलेल माझ्याशी? की मला सुद्धा...'

मी लिहिणं थांबवलं. ही उत्तरं मिळाल्या शिवाय कथा पूर्ण कशी होणार? जावं का त्याच्याकडे? नाही नको... नाही! जावंच!

मिस्टर वाघच्या घराचे मेन गेट पार करत मी आत शिरत होतो, पण सावरतच. सांभाळत आणि अगदी सतर्कतेने!

काय माहीत, कुठून एखादा विषारी साप वळवळत पायात यायचा... जीव मुठीत धरून शेवटी मी मिस्टर वाघच्या मेनडोरपाशी पोहोचलो. बेल वाजवली. एक रॉकिंग बेल वाजली. पण त्या ट्यूनमध्येही एक गूढता होती.

"या आत या!" मिस्टर वाघचा आतून आवाज आला.

मी अजूनच सावधपणे आत गेलो. इकडे - तिकडे बघत मी मिस्टर वाघच्या लिव्हिंगरूम पर्यंत पोहोचलो.

मिस्टर वाघ कॉमिक (?) वाचत बसला होता.

"तुमचीच वाट बघत होतो. उशीर केलात." वर न पाहताच तो बोलला.

या कळलं नाही का, की मी आहे ते? हा मला कोणी वेगळाच समजतोय का? कोणीतरी याला भेटायला येणार असेल. तरीच दरवाजाही उघडा होता. आणि त्याने आत यायलाही सांगितले...

"हो तुम्हीच मास्टर सूरज!" कॉमिक खाली ठेवत तो माझ्याकडे पाहत बोलला.

"म्हणजे तुम्हाला माहीत होते, की मी कधी तरी येणार?"

"हो!" त्याचा चेहरा निर्विकार.

"कसे?" मी थोडे बिचकतच विचारले.

"किडे! दुसरे काय!?" हा मला टोमणा होता.

असे म्हणून त्याने नेहमी सारखे स्मित केले. आणि मला बसण्यासाठी खूण केली.

मी बसलो आणि कॉमिक खाली ठेवून तो उभारला.

"तू चहा घेणार?"

असे विचारत माझ्या उत्तराची वाट न पाहताच तो आत निघून गेला. मी भीत - भीत चौफेर नजर फिरवत होतो. कुठे सापबिप दिसतोय का बघत.

तशातही माझ्या डोक्यात एक भीती डोकावून गेली.

'हा नेहमी मला चहा का पाजतो? मला डायबिटीक करण्याचा तर याचा प्लॅन नाही? म्हणजे मग कधी तरी इन्सुलिनचा ओव्हर डोस देऊन मलाही... याला लोकांच्या आजाराचा किंवा कमजोरीचा वापर करून खून करण्याची सवय आहेच... नाही नाही! मग चहात विष... नाहीच! मी ओव्हर थिंकिंग करतोय! असं काहीच नसणार! आपल्याकडे येणाऱ्या लोकांना आपण चहा ऑफर करतोच की...' एक - एक क्षण अंतासारखा होता.

मिस्टर वाघ येण्याच्या मधल्या काळात मीच स्वतः पुढे प्रश्न उभा करत होतो आणि मीच त्याची उत्तरं स्वतःला देत होतो.

तो काही वेळाने बाहेर आला. हातात चहाचे मग.

"दार्जिलिंगचा बेस्ट चहा! पिऊन बघ! आवडेल तुला." मग माझ्या समोर धरत बोलला,

"मी काही मळे विकत घेतलेत तिकडे! तिथलाच हा." तो समोर बसला.

'एवढा पैसा हा आणतो कुठून? पण हे मला तो कधीच सांगणार नाही कदाचित.'

"मी सगळ्या हाय प्रोफाईल केसेसच घेतो!"'

'मग ही केस? यात तर सगळेच गरीब...'

"धिस केस वॉज एक्सेप्शनल!" पुन्हा मनातले ओळखल्यासारखा तो बोलला,

"आतली गोष्ट सांगतो. या केसाचेही जाम मिळालेत!" त्याने माझ्या चेहऱ्यावरील प्रश्न वाचला होता आणि त्याचेच हे उत्तर होते.

त्याने चहाचा घोट घेतला.

"विचार. काय हवंय?"

मी काहीच न बोलता चहाचा घोट घेतला. चहा खरंच खूप मस्त लागत होता. त्याचा आरोमा... अजूनही चव आठवते. नक्कीच महाग असणार!

"सूरज!" त्याने हाक मारली.

"त... तुम्ही म्हणताय की सगळयांना तुम्ही मारले, पण जे मेलेत ते कोणत्या ना कोणत्या आजाराने. नाही तरी काही तरी एक्सिडेंट झाल्याने म्हणजे त्यांच्या - त्यांच्या हलगर्जीपणामुळे आणि तुम्ही म्हणताय, की तुम्ही त्यांना मारलंय. हे कसे काय? तर मग तुम्ही त्याच्या विक्रेसेसचा उपयोग केला का?" मी घाबरतच विचारले.

यावर तो हसला,

"दॅट व्हॉज ऑल माय सेट अप!"

मी चक्रावलो.

"सेट अप?" मी आश्चर्याने विचारले.

समर नकातेच्या मृत्यूनंतर सर्वांमते सगळे खुलासे झाले होते. त्यामुळे प्रभाची सिक्युरिटी उठवण्यात आली होती.

मिस्टर वाघ तिच्या घराच्या बाहेर उभा होता. त्याने नॉक केले.

"प्रभाताई!" त्याने हाक मारली.

थोड्याच वेळात प्रभाने येऊन दार उघडले. तिने त्याला आत घेतले.

घरात,

"या ना बसा." प्रभाने त्याला बसण्यास सांगून चहासाठी आत गेली.

"ताई, चहा करत असाल, तर साखर घालू नका." तो ओरडला.

त्याची ही विचित्र ऑर्डर ऐकून प्रभा पुन्हा बाहेर आली.

"का? काय झाले?" तिने काही न समजल्याने विचारले.

मिस्टर वाघने खिशातून शुगर फ्रीची डबी काढली.

"मी हे वापरतो. चहा अगदी अमृतासारखा लागतो." मिस्टर वाघ हसत म्हणाला.

"बरं." म्हणून ती आत गेली.

प्रभा येईपर्यंत तो ती छोटी पण स्वच्छ, टापटीप खोली मिस्टर वाघ पहात होता. त्याचवेळी त्याची नजर प्रभाच्या मुलीच्या संस्कृतीच्या शाळकरी पुस्तकांवर पडली. त्यांतील एक घेऊन तो चाळत बसला.

प्रभा चहा घेऊन आली. ट्रे तिने वाघ समोर ठेवला.

"हे काय एकच कप?" मिस्टर वाघने विचारले.

"मी नाही घेत. घ्या तुम्ही!"

"मिच्व! असं कसं?"

त्याने ट्रे आपल्याकडे खेचून शुगर फ्रीच्या ड्रॉप्स कपात सोडल्या. थोडा चहा बशीत ओतला व कप प्रभाला देऊ केला.

"नको. घ्या तुम्ही!" ती नाहीच म्हणाली.

"घ्या हो! दोन घोटांनी काही होत नाही!"

मिस्टर वाघने फोर्स केल्यावर नाईलाजाने तिने कप घेतलाच.

"पणजोबांचा खरा खुनी सापडलाय, तर अजून शेखर कसा काय परत आला नाही?" तिने मिस्टर वाघला विचारले. चहाचा कप तसाच हातात होता.

"सॉरी! पण आता ते कधीच येणार नाहीत!" मिस्टर वाघ अतिशय थंडपणे बोलला.

"काय!" प्रभा जोरात किंचाळीच.

"क... कसं?..." तिच्या डोळयांतून अश्रू ओघळले. पण पापणी मात्र लवलली नाही.

"मीच मारलंय त्यांना!" तो अधिकच थंडपणे बोलला.

तशी प्रभा घाबरली.

"सुरुवात दिनेश पासून करूयात." मिस्टर वाघच्या ओठांवर तेच गूढ स्मित तरारले.

"म्हणजे दिनेश यांनाही..." प्रभा वाक्य पूर्ण करू शकली नाही.

"ऑफ कोर्स!"

"एक मिनिट, दिनेशना तर ब्लड क्लॉटिंग डिसऑर्डर होती ना. त्यामुळेच रक्तस्राव न थांबून त्यांचा मृत्यू झाला..." मी मध्ये बोललो.

"त्याला कसला डिसऑर्डर नव्हता. मीच त्याच्यावर कट करण्यापूर्वी त्याला वॉरफरीन घ्यायला भाग पाडले होते!" तो म्हणाला.

"ब्लड क्लॉटिंग डिसऑर्डर नसल्याचे त्याच्या घरच्यांना माहीत असणारच त्यांनी कसे कार्तिकला सांगितले नाही, की असे काही नाही म्हणून?" मी त्याला थांबवत मध्येच विचारले.

एक लक्षात घे. स्वतः डॉक्टर सांगत असताना इन्वेस्टीगेशन टीम कोणावर विश्वास ठेवील? घरच्यांवर, की दिनेशवर ब्लड क्लॉटिंगसाठी उपचार करत असलेल्या डॉक्टरवर? अटॉप्सीमध्ये दिनेशच्या रक्तात वॉरफरीन सापडले होते. त्यामुळे ते सिद्ध झाले." त्याने स्पष्टिकरण दिले.

"पण तरी..." माझे समाधान झाले नव्हते.

दिनेशच्या घरातील कोणी काही बोलले नसेल असे नाही वाटत.

"खरे तर असा प्रश्न उभा राहिला होता. दिनेशला कसलाच आजार नव्हता. आणि तो कसली औषधेही खात नव्हता. असेच चौकशी दरम्यान त्याच्या घरच्यांनी सांगितले होते.

"मग?"

"मग काय? याचा विचारही मी आधी केला होता. आणि समरकडून डॉक्टर मोहन पाटीलला साफ इन्स्ट्रक्शन्स दिल्या होत्या, की दिनेशला असा काही गंभीर आजार आहे हे त्याने घरच्यांना टेन्शन नको म्हणून त्यांच्या पासून लपवून ठेवले होते आणि म्हणून डॉक्टर विसीट, औषधे घेणे हे तो घरच्यांच्या अपरोक्ष करायचा म्हणूनच केमिस्टकडेही त्याच्या औषधांची नोंद पोलिसांना आढळणार नाही असे त्याने इन्वेस्टीगेशन टीमला सांगावे.

"नंतर विरेन." मिस्टर वाघ प्रभाला म्हणाला.

"आणि लीलावती मामी?"

"माझ्याकडे काही नाही. विरेनचेच काम ते!"

"म्हणून त्याला संपवावे लागले. आणखी एक कारण होते. ते तुम्हाला माहिती आहेच!

"तर; विरेनला अनेस्थेशियाचा ओव्हर झाला म्हणून तो मेला. पण डॉक्टरना त्यासाठी भाग मी पाडले."

"कसे?" मी विचारले.

"जॉ सर्जरी साठी विरेनला डेंटल हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले होते. सर्जरी आधी त्याला अनेस्थेशिया देण्यात आला. त्यामुळे तो पूर्ण बेशद्धावस्थेत होता. सर्जरी झाल्यावर त्याला आयसीयूला हलवण्यात आले. त्याचे ट्रेचर ढकलण्यासाठी मी वॉर्डबॉईज्सना मदत केली. त्याचवेळी विरेनला मी 'रेमिफन्टिनल' हे ड्रग इंजेक्ट केले. सर्जरीपूर्वी त्याला वेदना कमी व्हाव्यात म्हणून हे ड्रग अनेस्थेशिया सोबत देण्यात आलेला होते. त्यामुळे त्याला याचा ओव्हर डोस झाला.

"जेव्हा विरेन शुद्धीवर आला. रेमिफन्टिनल ओव्हरडोसच्या साईड इफेक्टमुळे विरेनला हिप्नॉटिक्स व एमनियाटिक इशूज सुरू झाले. तो ठराविक वेळेपेक्षा जास्त बेशद्ध राहिलाच, पण विरेनला जाग आल्यावर तो रेमिफन्टिनलच्या

मी दिलेल्या डोसमुळे रिसेन्ट घडलेली घटना विसरला होता. त्यामुळे तो विचित्र बिहेव करू लागला. यात तो स्वतःला अधिकच इंज्युअर्ड् करून घेईल म्हणून डॉक्टर्सनी त्याला पुन्हा लोकल अनेस्थेशिया दिली. लोकल अनेस्थेशियामुळे माणूस पूर्ण बेषधावस्थेत जातो. आणि अशा अनेस्थेशियाच्या ओव्हरडोसमुळे तो मेला. अशा प्रकारे मी सरविलेन्स कॅमेराज्ना ही अवॉईड केले आणि अटॉप्सी करणाऱ्या पॅथलॉजिस्ट व फिजिशियन सुद्धा ही ट्रिक पकडू शकले नाहीत, कारण 'रेमिफन्टिनल' हे सिडेटिव्ह ड्रग आहे. सिडेटिव्ह ड्रग्स् हे अनेस्थेशियाचा प्रभाव कमी करण्यासाठी वापरतात. पेशंटच्या वेदना कमी करण्यासाठी सर्जरीवेळी अनेस्थेशिया सोबत हे वापरतात."

"विरेनच्या बायकोला रमाला मारायला मला काहीच करावे लागले नाही. तिच्या हॉस्पिटलमधील वागण्यावरून माझ्या लक्षात आले होते, की ती खूप हळवी आणि मनाने कमजोर स्त्री आहे. त्यामुळे हॉस्पिटल कँटीनबाहेर भेटून मी तिला इतकेच म्हणालो, की

'एका खुन्याची बायको म्हणून या समाजात जगणे खूपच क्लेशदायक आहे! मी अशा बऱ्याच बायका बघितल्या आहेत, ज्या या अवहेलनेपेक्षा मरण बरे म्हणतात!'

"आणि काय? राहिलेले काम तिने स्वतःच पूर्ण केले. आपली नस कापून घेतली."

"पुढचा नंबर होता बाबूचा. तो त्याच्या गेमिंग पार्लरला गेल्यावर मीही त्याच्या मागून गेलो. त्याला भेटलो. त्याचा ग्लास मीच भरून दिला. आणि ड्राय

आईस सुद्धा मीच त्यात टाकले! नशेत त्याला समजलेच नाही साध्या बर्फाऐवजी ड्राय आईस टाकले ते."

"शेखरला कसे मारले जाणून घायचेय? तो वेल्डिंगसाठी वापरत असलेल्या इलेक्ट्रोड्स मी लिक्विड नायट्रोजन मध्ये बुडवले होते. त्याने ती इलेक्ट्रोड्स जेव्हा वापरले, तेव्हा त्या नायट्रोजनची ऑक्सिजनशी रिऍक्शन झाली आणि नायट्रोजन मोनोऑक्साईड म्हणजेच नायट्रिक ऑक्साईड प्रोड्युस झाले. आणि त्या गॅसमुळे तो मेला." मिस्टर वाघ प्रभाला सांगत होता...

"मग वरुणने नेलेल्या इलेक्ट्रोड्समध्ये फॉरेन्सिकला काहीच कसं नाही सापडलं?" मी मिस्टर वाघला मध्येच विचारले.

"दॅट व्हॉज् जस्ट् सिम्पल सायकॉलॉजी! मी ती इलेक्ट्रोड्स एक सारखी न धरता पुढे मागे धरली होती. मला जी इलेक्ट्रोड्स हवेत ते मी मागे ठेवणार, असा वरुण अंदाज लावणार हे मला माहित होते. म्हणून मी मला हवी ती इलेक्ट्रोड्स पुढे धरली. आणि वरुणने मागील इलेक्ट्रोड्स उचलली आणि तो नॉर्मल इलेक्ट्रोड्स घेऊन गेला. लिक्विड नायट्रोजन मध्ये बुडवलेली इलेक्ट्रोड्स मी घरी घेऊन आलो. आता तुम्ही नेलेली इलेक्ट्रोड्स वरुणने तपासायला मागितले असते, तर? असं काही विचारू नको!"

त्याने ओळखले मी काय विचारणार होतो ते, त्यामुळे त्याने आधीच उत्तर दिले,

"कारण वरुणने तसं केलं असतंच, तर मी इलेक्ट्रोड्स दुसरीच दिली असती. हे माझ्यावर संशय असणाऱ्या वरुणने अंदाज लावलाच असेल. म्हणून त्याने मी नेलेली इलेक्ट्रोड्स मागीतलीच नाहीत!" तो पुन्हा कपटी हसला.

मला मात्र काय बोलावे सुचेना...

"माझ्या चहात सुद्धा विष टाकलंय का?" प्रभाने अतिशय थंडपणे शून्यात पाहत विचारले.

"आहा. चहात नाही. पण याच्यात आहे!" त्याने एक पांढरी गोळी प्रभा समोर धरली,

"शुगर टॉफी. टेक इट!" मिस्टर वाघ क्रूरपणे स्मित करत म्हणाला.

त्याने हात पुढे केला.

"माझी मुलगी?"

"डोन्ट वरी! मला माणसे जड नाहीत होत! मी तिची काळजी घेईन!" वाघ थोड्या रागाने म्हणाला.

त्याने प्रभाला ती गोळी घेण्यासाठी मानेनेच खूण केली.

समोर साक्षात मृत्यू देवता बसला होता. प्रभाला आपला मृत्यू समोर दिसत होता. पळून जाण्याचा कोणताच मार्ग नाही हे ती जाणून चुकली होती. त्यामुळे कमालीची शांतता तिच्यात आली होती. प्रभाने त्याच शून्यावस्थेत ती गोळी घेतली आणि तोंडात टाकली.

मिस्टर वाघने आपली बशी प्रभासमोर ठेवली आणि तो शांतपणे उठला.

घराबाहेर; प्रभाची मुलगी बाहेरून खेळून घराकडे परतत होती. मिस्टर वाघने बाहेरच तिला अडवले आणि कडेवर घेतले.

"काका आई कुठे आहे? बाबा पण किती दिवस झाले आलेच नाहीत." तिने निष्पापपणे मिस्टर वाघला विचारले.

"बाळा, ते देव बाप्पाकडे गेलेत. त्यांनी तुला आता इथून पुढे माझ्यासोबत रहायला सांगितले आहे!" मातीने बरबटलेल्या त्या मुलीला कडेवर घेत मिस्टर वाघ म्हणाला.

"नाही...!" मुलीने हट्ट धरला.

"मी तुला चॉकलेट देईन. खूप सारी खेळणी पण. आणि मी तुला शाळेत पण पाठवीन." वाघने चालत चालत तिची समजून काढण्याचा प्रयत्न केला,

"मोठी झाल्यावर तू काय होणार?"

"मी... मी ना, पायलट!" ती म्हणाली.

"अरे बापरे. खरंच?"

"हो मग?!"

"मी तुला पायलट करीन. मग येणार ना माझ्या बरोबर?"

"हो!"

...

"मग प्रभा यांचे काय झाले?"

"शी वॉज फौंड डेड इन हर हाऊस!"

"त्या गोळीत असं काय मिक्स केलं होते?"

"मण्यारचे विष!"

"ती मेल्याच बघून कोणी पोलिसात नाही गेलं?"

तो हसला,

"जायला शिल्लक कोण होतं? शेजारच्यांनी तिचे अंत्यसंस्कार केले."

"आणि पोलिसांपर्यंत हे प्रकरण गेलेच असते तर?"

"तर काय? त्यांना काहीच सापडले नसते. अटॉप्सी रिपोर्टमध्ये तिचा मृत्यू बंगारस केरुलेअस म्हणजे मण्यारच्या न्यूरोटॉक्सिक पॉइसनमुळे झाल्याचे आढळले असते.

"तुला माहिती आहे, मण्यारच्या विषाने किती भयंकर मृत्यू येतो ते! तहान लागते, पोटदुखी, श्वसनाचा त्रास होतो. काही वेळाने रेस्पिरेटरी सिस्टीम म्हणजे श्वसन प्रणाली बंद पडून मृत्यू होतो."

हे ऐकून माझ्या अंगावर तर काटा उभा राहिला.

पण अजून काही प्रश्न मनात झुरत होते...

"रवी पवार, डॉक्टर मोहन पाटील यांना दिनेश यांच्या आजाराचा खोटा रिपोर्ट द्यायला तुम्ही तयार कसे केले?" मी विचारले.

तो हसला. त्याचे हे असे हसणे माझ्या प्रश्नांना तो किती मूर्खपणाचे समजत होता हे दर्शवत होते.

पण मला पर्याय नव्हता. मला सगळी उत्तरे हवीच होतीत. एक तर याने मला काही सांगायला नको होते. आणि आता सांगितलंय, तर काही अर्धवट ठेवायला नकोय!

"मरणाला कोण घाबरत नाही!" तो म्हणाला.

"आणि हे मॅनेज कसे केले? नवीन व कार्तिक तुमच्यावर लक्ष ठेऊन होते. तुमचे मोबाईल, लँडलाईन टॅप केले असणार नक्कीच!" माझी आणखी एक शंका.

"माणूस दोन - दोन मोबाईल वापरू शकतो हे त्यांनी लक्षातच घेतले नाही! मी दुसऱ्या नंबरवरून सगळं ऑपरेट करत होतो."

"आणि नेहमीच्या नंबरवर आलेले कॉल्स? लँड लाईनचे काय? तुम्ही फोन उचलत नाही म्हटल्यावर त्याचा संशय बळावला असणार..."

"नो! मी रेग्युलर नंबरवर येणारे कॉल्स प्रायव्हेटवर डायव्हर्ट केले होते. आणि लँड लाईनसाठी आन्सरिंग मशीन सेट केले होते. संशय येण्याचा चांसच नाही!"

"म्हणजे शेखर बाबत सुद्धा हेच केलंत? त्याच्या न्यूरॉलॉजिस्टला सुद्धा..."

"माणूस हा सगळ्यांत भित्रा प्राणी!"

माझ्या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर न देता तो असं काही तरी बोलला. पण यात माझ्यासाठीचे उत्तर स्पष्ट होते.

"मग शेखरची हेड इंज्युरी...?"

"दॅट व्हॉज जेन्युअन. म्हणून तर मी त्याला पार्किन्सन्स डिसीज असल्याचा आभास निर्माण करू शकलो."

"नवीनच्या आजाराबद्दलच्या शंकेचं काय झालं?"

"दिनेश आणि शेखरचे मृत्यू हे नॅचरल व एक्सिडेंटल डेथ्स् आहेत हे दाखवण्यासाठी त्यांना असे आजार आहेत हे दाखवणं मला गरजेचं होतं. पण ते ओथेन्टीक वाटावेत असा सेट अप मी समर नकातेला हाताशी धरून आधीच तयार केला होता. शेखरच्या हेड इंज्युरीमुळे, त्याचे पॅरेलाइज्ड् असणे आणि त्याचे अधून - मधून उद्भवणारे किरकोळ आजार यामुळे त्याच्यासाठी पार्किन्सन्स डिसीज हा आजार ठरवणे मला सोपे गेले. त्याला आधीच मेजर हेड इंज्युरी झाली असल्याने अटॉप्सीमध्येही तो खरेच पार्किन्सन्स डिजीजचा पेशन्ट होता, की नाही हे समजणे अवघड होते. या आजारामुळे नायट्रिक ऑक्साईडचा त्याच्यावर लवकर व घातक परिणाम झाला असेच सर्वांना वाटले. यामुळे त्याच्या शंकेला विचारात घेतले असतेच, तरी तपासात मी सापडूच शकत नव्हतो!"

"या रवी पवार, डॉक्टर व न्यूरॉलॉजिस्ट कॉन्टॅक्ट केलेत कसे?"

"पेशन्स! कळेल."

"मग प्रभा यांचे काय? त्यांना कसे मॅनेज केलेत? त्यांनी पार्किन्सन्स डिसीजच्याच सिम्टम्स् बरोबर कशा काय सांगितल्या?" माझा आणखी एक प्रश्न.

"शेखर त्या फौंड्रीमध्ये अल्युमिनियम व हाय अलोय्ड् स्टेनलेस स्टीलचे वेल्डिंग करायचा ओझोन प्रोड्युस होऊ नये म्हणून आणि वेल्डिंग आर्क स्थिर रहावे यासाठी नायट्रिक ऑक्साईड या गॅसचा त्याला वापर करावा लागायचाच. त्यामुळे रोजच्या नायट्रिक ऑक्साईडच्या संपर्काने, इंहेलेशनने त्याला हेडएक, रेस्टलेसनेस, नॉशिया, ब्रिदिंग प्रॉब्लेम असे वरचेवर होत होते. हेड इंज्युरीमुले तो पॅरेलाईज्ड्

होताच. तेच प्रभाने कार्तिकला सांगितले. आणि कार्तिकने त्याचा संबंध अटॉप्सी रिपोर्टशी जोडला आणि त्यामुळे शेखरला पार्किन्सन्स डिसीज् असल्याचे कार्तिकला पटले."

"आणि ते लिक्विड नायट्रोजनमध्ये बुडवलेले इलेक्ट्रोड्स? ते तुम्ही शेखरपर्यंत कसे पोहोचवलेत?"

"शेखर फौंड्रीतील चीफ वेल्डर होता. लागणारे इलेक्ट्रोड्स खरेदी करण्याचे काम त्याच्याकडेच दिले गेले होते.तो स्वतः हे खरेदी करायचा. त्याच्या नेहमीच्या दुकानात मी चौकशीचे कारण काढून त्याला भेटलो. त्याला इलेक्ट्रोड्स सांभाळण्यासाठी मदत करण्याचे निमित्त करून हातचालकीने मी ती बदलली होती. यामुळे मी पाळतीवर असलेल्या कार्तिकच्या ऑफिसर्सनाही चुकवू शकलो. लांबून लपून सावधगिरीने माझ्यावर लक्ष ठेवणाऱ्या त्यांना समजलेच नाही की मी काय केलंय!"

"आणि हे इलेक्ट्रोड्स दुसऱ्याच कोणी वापरले असते, तर? तुम्ही त्या माणसाची लाईफ कॉम्प्रोमाईज केली असतीत?"

वाघच्या प्लॅनमध्ये इतकी मोठी त्रुटी होती. माझ्या या प्रश्नाने तो चांगलाच दुखावला.

"नो माय फ्रेंड! मिस्टर वाघ कोणत्याच इनोसेंट माणसाचे आयुष्य कॉम्प्रोमाईज करत नाही! वेल्डिंगचे खूप प्रकार आहेत. प्रत्येक वेल्डिंगच्या कामात इलेक्ट्रोड्सची गरज लागत नाही. मला माहित होते, की फौंड्रीमध्ये प्रत्येकाचे काम

ठरलेले होते. वेल्डिंगचे कामसुद्धा. शिवाय वेल्डिंगसाठी इलेक्ट्रोड्स वापरणाऱ्या प्रत्येक वेल्डरचा इलेक्ट्रोड्सचा स्टोक वेगवेगळा असायचा, कारण फौंड्रीचा मालक सुशांत निकमला प्रत्येक गोष्टीचा चोख हिशोब लागायचा. असे नसते, तरी मी दुसरा मार्ग शोधलाच असता त्याला संपवण्याचा! असो, मी फक्त शेखरच्याच स्टॉकमध्ये माझे विशेष इलेक्ट्रोड्स मिसळले अँड रेस्ट इज ए हिस्ट्री!"

'किती सहज बोलतोय हा...'

"तुम्ही माणसं मारताय याचे तुम्हाला काहीच कसे वाटत नाही?" मी विचलित झालो होतो...

"माणसं नाही!" तो ठणकावून बोलला,

"मी गुन्हेगारांना मारतो!"

"तीही माणसंच."

"म्हणून त्यांना सोडून द्यायचे?" त्याने कठोरतेने मला विचारले.

"तसे नाही पण, त्यांचा जीव घेणं म्हणजे..." मी अडखळलो.

"तुम्ही लोक पूजा वगैरे करताना झाडांची पानं, फूलं, फळं ओरबाडून वापरता, प्राण्याचे जीव देता त्यावेळी विचार करत नाही, की आपण एका जीवाला मारतोय आणि हेच मी केलं की तुम्ही जजमेंटल होता. किती दोगला आहे हा समाज!" त्याच्या चेहऱ्यावर क्रूर भाव उत्पन्न झाले!

"हो पण ते देवाला अर्पण करण्यासाठी असते!" मीही धाडसाने बोललो.

"हाच जर तुमचा न्याय असेल, तर एक गोष्ट लक्षात घे; आय एम अल्सो ऑफरिंग दिज् क्रिमिनल्स् टू माय गॉड्स; द ट्रूथ अँड द जस्टीस!"

"झाडे, प्राणी इनोसेंट असतात तरी त्यांचा बळी दिला जातो. इथे मी तर फक्त गिल्टी लोकांनाच पनिश करतोय!!!"

माझा चहा माझ्यासारखाच थंड झाला झालो होतो. त्याचा हा वॅलिड तर्क ऐकून मी पुढे काही बोलूच शकलो नाही...

पण या सगळयांचा असा काय मोठा गुन्हा होता हे मात्र अजूनही अनाकलनीयच होते...

## दि रॅवेलेशन ऑफ द ट्रूथ

आता तुझ्या मगासच्या प्रश्नाचे उत्तर, की मी रवी पवार, मोहन पाटील आणि शेखरच्या न्यूरॉलॉजिस्टला खोट्या आजारांचे रिपोर्ट्स द्यायला कसे भाग पाडले. त्यांना कसे कॉन्टॅक्ट्स केले; तर ते काम समर नकातेचे!" त्याने आणखी एक बॉम्ब फोडला.

'बास!!!'

माझा मेंदू ओरडत होता...हे सगळं सहन होण्यापलिकडचे होते. पण मला गप्प बसवत नव्हतं.

"म्हणजे समर नकाते तुमच्यासाठी काम करत होता?"

"नाही. तो त्याचे काम घेऊन माझ्याकडे आलेला."

"कसलं?"

"शक्ती शुक्लाला संपवण्याचं!"

"ते कसं?"

"मी एका वेगळया केसवर काम करत होतो. त्यावेळी समर एक समाजसेवक म्हणून पोलिसांकडे आला होता. त्या केसमध्ये वापरली गेलेली '३१५ बोअर देसी कट्टा' ही गन शक्ती शुक्लाने विकली असल्याची टीप त्याने पोलिसांना दिली. पण त्याला ही गोष्ट माहीत नव्हती, की मी गुन्हेगारांचाच इतिहास फक्त बघत नाही. तो माहिती घेऊन आलाय, म्हणजे तो निष्पापच असला पाहिजे असे समजण्या इतका मी मूर्ख नाही. एक आणखी शंका म्हणजे ही माहिती त्याला कशी माहीत?

"मी समरची माहिती काढली आणि तो एक कॉन्ट्रॅक्ट क्रिमिनल असल्याचे माझ्यासमोर आले. तो शक्ती शुक्लाचे व इतरांचे बरेच देणे लागतो. हे मला कळाले. समरला शक्तीला अडकवायचे होते. जेणेकरून तो पैसे देण्यापासून वाचेल. हे सगळं बाबारावांचा मृत्यू होण्याआधी.

"समरच्या माहितीवरून शक्ती शुक्लाला अटक करण्यातही आली होती, पण पैसे चारून तो सुटला. आणि पुन्हा त्याने समरच्या मागे पैशांचा तगादा लावला. दरम्यान बाबाराव देसाईंचा खून झाला होता. आणि त्या आरोपावरून चौकशीसाठी बाबू सुतारला आत घेण्यात आले होते. आधी सीबीआय नंतर आयबी या केस मध्ये इनवॉल्व्ह झाली. त्यामुळे समरला काही हालचाल करता येत नव्हती. बाबूकडून त्याचे नांव कोणत्याही क्षणी बाहेर पडेल अशी त्याला भीती..."

"एक! एक मिनिट! तुम्ही म्हणताय हा तूमचा सेट अप होता. म्हणजे बाबूचे आणि समरचा संबंध असण्याचे तसे काही कारण नाही. मग..." मी कन्फ्युज झालो होतो...

"त्याचा तसा संबंध होता. बाबू आपली बरीच इल्लीगल कामे या समर नकाते कडून करून घ्यायचा. म्हणून तूर्तास कोणाला मारायचे नाही असे त्याने ठरवले. तो माझ्याकडे आला. पूर्वी त्याने शक्तीच्या अवैध धंद्याची टीप दिल्याने शक्ती शुक्लाकडून त्याला कसा त्रास होत आहे असे सांगून पोलीस ऐकत नाहीत म्हणून तुमच्याकडे आलो असा कांगावा करू लागला.

"मी त्याची रियल आयडेंटिटी मला माहित असल्याचे सांगितले, पण त्याला पोलिसांच्या स्वाधीन करणार नाही असे सांगून मी शक्ती शुक्लाचा काटा काढायचे त्याला आश्वासन दिले."

"ठिक आहे. पण यासाठी तुला काय हवंय?" समरने मिस्टर वाघला विचारले,

"तुला माहीतच आहे, मी तुला पैसे तर नाही देऊ शकत!" समर म्हणाला.

"पैसे नकोत. तुझ्या कलेक्शन मधले काही विंटेज वेपेंस. बस्स!"

"फाईन! असं असेल, तर मी सांगेन त्या प्रत्येकाला मारशील?"

"वाय नॉट?! पण तुला पण माझे एक छोटेसे काम करावे लागेल."

"ओके!"

समरने मिस्टर वाघशी हात मिळवणी केली.

"असे आमचे डिलिंग झाले. आणि त्याच्या कडून रवी पवार, मोहन पाटील डॉक्टर व न्यूरॉलॉजिस्टला मी सांगतोय तसे करण्यासाठी धमक्या दिल्या. यामुळे त्यांतील कोणी तक्रार केलीच असती, तर समर नकातेचे नांव पुढे आले असते. माझे नाही! शिवाय तो पोलिसांच्या हाती लागण्याआधीच मरणारही होता!" त्याने कपटी हास्य केले.

"म्हणजे समर नकातेने आत्महत्या केली नाही?"

"अलबत! त्याला गोळी घालून घ्यायला मीच फोर्स केले. त्याने मला गंडवायचा प्रयत्न केला होता. स्वतःला खूप शहाणा समजत होता. साऽऽलाऽऽ"

'किती किचकट आहे हे सगळं...'

"म्हणजे समर नकाते आणि शक्ती शुक्ला यांचा बाबारावांच्या केसशी काही संबंध नव्हता?..."

"तसा तो बाबू सुतारचाही नव्हता!" तो हसून म्हणाला.

"मग का?..." मी काकुळतीला आलो...

"का? आपल्या धंद्याचा समाजावर काय परिणाम होतोय हे त्याला माहित असूनही तो दुर्लक्ष करत होता. बाबारावांनी सांगूनही त्याने त्यांनाही जुमानले नाही. त्यामुळे त्याला मारणे माझ्यासाठी क्रमप्राप्तच होते! शुक्ला इल्लीगल वेपेन डीलर होता, आणि नकाते एक हिटमॅन! तुला काय वाटतं, मी काय करायला हवं होतं यांच्या बरोबर? यांना कधी ना कधी मी मारलेच असते. पण म्हंटलं यांच आयुष्य निरर्थक होत निदान याचं मरणं तरी कामी येऊ दे म्हणून!

"शक्ती शुक्लाने समर नकातेला माऊसर विकल्याचे रेकॉर्ड्स आणि समर नकातेचे असायनमेंट व देणेकऱ्यांचे रेकॉर्ड्स मीच तयार केले होते. बाबूने बाबारावांना मारण्यासाठी समरला सुपारी दिली असल्याचेही मीच त्या रेकॉर्ड्समध्ये नमूद केले. समर नकातेच्या लॅपटॉपवर एक्सेल फाईल्स माझ्या पेनड्राइव्ह वरून आधी कॉपी केले आणि मग ते मीच डिलीट केले. पोलीस आपल्यापर्यंत पोहोचल्यावर त्यांना काही पुरावा सापडू नये म्हणून ते त्यानेच केलेत असे दाखवण्यासाठी."

या प्रकरणात मिस्टर वाघची आणखी एक खुबी मला समजली, की तो कोणाचेही अक्षर अगदी हुबेहूब नकल करू शकतो. असेच त्याने शक्ती शुक्लाच्या वही खात्यात त्याच्याच अक्षरात समर सोबतचे माऊसरचे फेक डिलिंग तयार केले होते.

"लॅपटॉपवर मग तुमचे फिंगरप्रिंट्स का आढले नाहीत. ग्लव्ह्ज्! ग्लव्ह्ज् मुळेच शुक्लाच्या वहीवरही माझे ठसे उमटले नाहीत! त्याला कुणी चेक केले नाही तो विषय वेगळा."

"पण हे सगळं का?" मी केविलवाणा होऊन विचारले.

"मी तुला शक्ती शुक्लाचा अटॉप्सी रिपोर्ट सांगितला का?"

त्याने माझ्या प्रश्नाला बगल दिली. म्हणजे अजून काही तरी बाकी होते...

"नाही." मी म्हणालो,

"अरे हा! त्यात तुम्ही कसे सापडला नाहीत? खून चाकूने झाला होता ना? मग?"

यातून मिस्टर वाघ कसा बाहेर पडला हे मला कळालेच नव्हते.

"मी समर नकातेच्या कलेक्शन मधून जी विंटेज वेपेंस घेतली होती त्यांतील जॅपनिज मेड स्कुबा प्रो डायव्हर्स नाईफ शुक्लाला मारण्यासाठी वापरली होती. शुक्लाला मारून तो सूरा पुन्हा नकातेच्या घरी सोडला. नकातेच्या मृत्यूनंतर त्याच्याकडे ज्या गोष्टी सापडल्या त्यात तो सुराही सापडला. माझे फिंगरप्रिंट्स त्याच्यावर येऊ नयेत याची मी पहिल्यापासूनच काळजी घेतली होती. त्यामुळे फोरेन्सिक मध्ये नाईफवर पण समर नकातेचेच फिंगरप्रिंटस आढळून आले.

"ही केस नवीन, वरुण आणि कार्तिक सॉल्व्ह करतायत असे त्यांना वाटावे म्हणून मी हे नवीनच्या ज्यूरिसडिक्शनमध्ये घडवून आणले!"

"माऊसर? तुमच्याकडे आधी पहिली तेव्हा त्यात एक गोळी कमी होती. म्हणून वाटत होते, की तुम्ही बाबारावांना मारलंय. मग तुम्ही ही घटना सांगताना

त्यात समर नकातेचे नांव पुढे आले. त्याच्याकडे माऊसर आणि चारच गोळया सापडल्या. म्हणून तो खुनी वाटू लागला. त्याने माऊसर विकत घेतल्याची नोंद पण शुक्लाकडे सापडली. ती पोलिसांनी एव्हीडेन्स म्हणून जप्त पण केली. पण आता तुम्ही म्हणताय की समरने बाबारावांना मारलेच नाही. मग माऊसर त्याच्याकडे कशी?"

"समर नकातेला खुनी ठरवण्यासाठी ही माऊसर त्याच्याकडे सापडणे गरजेचे होते. त्याशिवाय ते विश्वास पात्र कसे ठरले असते? यासाठी फॉरेन्सिक डिपार्टमेंटचा उपयोग करून घेणे माझ्यासाठी गरजेचे होते."

"ते कसे?"

"फॉरेन्सिक डिपार्टमेंट नक्कीच नकातेकडे सापडलेली माऊसर व बाबाराव देसाईंच्या लंबर व्हर्टिब्रेमध्ये झालेल्या डॅमेजला कम्पेअर करून बघणार. माऊसरवर फायर होताना उडालेली गन पावडर आणि बाबारावांच्या शरीरावरील गन पावडरचे परीक्षण करणार. बरोबर? आणि नकातेकडे माऊसर सापडली तरच हे शक्य होणार होते. बाबारावांना त्याच माऊसरचे गोळी लागली आहे हे त्यातूनच तर सिद्ध होणार होते आणि समर नकाते खुनी ठरणार होता!"

"आणि ती त्याच्याकडे गेली कशी?"

"सांगेन."

"बरं. मग तुमच्याकडे ती कशी? मला माहित आहे, एखाद्या केसमध्ये क्रिमिनलने वापरलेली गन तुम्हाला आवडली तर ती तुम्हीच ठेवून घेता. तशीच ती माऊसर तुमच्याकडे आली असेल, पण ती तुम्ही मिळवली कशी?"

"चौकशी समिती व कोर्टासमोर एव्हीडेन्स सादर केल्यावर मीच ओरिजिनल माऊसर व कार्टेजेस् रिप्लेस करून त्याजागी चायनीज मेड माऊसर व त्याची चार कार्टेजेस् ठेवली. ती इतकी हुबेहूब आहेत, की ओळखली जाणारच नाहीत. कमिशनरच्या विश्वासाचा फायदा दुसरे काय? आणि आता पर्यंत नवीन, कार्तिक आणि वरुणही माझ्याबाजूने निर्धास्त झाले होते. मी त्यांचा विश्वास जो संपादन केला होता."

"यांच्यावरून आठवले. त्या ट्रान्समीटर्सचे काय केलेत, जी यांच्याकडे फिक्स्ड् केली होतीत?" मी विचारले.

"त्या तिघांच्याही समोरच मी ती परत काढून घेतलीत."

"आणि तिघांनी तसं करू दिलं? त्यांना संशय नाही आला?"

"कसा येणार होता? बाबारावांचा खुनी तर त्यांच्या दृष्टीने सापडला होता. सगळे एव्हीडेन्स सुद्धा समोर होते. त्यांनी माझ्यावर अविश्वास दाखवल्याने ते गिल्टमध्ये होतेच. त्यांनी माझ्यावर संशय घेतला, तसा मीही त्यांच्यावर संशय घेऊ शकतोच एवढेच मी त्यांना बोललो. मग कसला संशय ते घेणार होते?"

"याह! परफेक्ट मास्टर प्लॅन. हं?!"

तो मोठ्याने हसला.

"मी ती बग्स जशी त्यांच्या नकळत इंस्टॉल केली होती, तशीच ती मी काढून घेऊ शकलो असतो. पण त्यांना टीज करण्याची ही संधी मला सोडायची नव्हती." त्याने कपटी स्मित केले,

"वाईट एवढेच वाटते, की नवीन, कार्तिक, वरुण जेन्युअन असून त्यांना मला एवढे फसवावे लागले." तो हसला, त्यांना खरेच वाटत होते, की ते एक खूप मोठी कॉन्स्पिरसी सॉल्व्ह करत आहेत!"

"पण हा सगळा सापळा होता. मिस्टर वाघाचा ट्रॅप!"

"हा! हो!" तो हसत म्हणाला.

"तुम्हाला कुणी या केस मध्ये इनवोल्व्हच करून घेतलं नसतं, ही असायनमेंट तुमच्याकडे आलीच नसती तर?" मी विचारले.

"हा! मग तर मला हे सगळं घडवून आणणं अधिकच सोपं गेलं असतं!"

त्याचं म्हणणं बरोबर होतं; आणि माझा प्रश्न मूर्खपणाचा...

तो स्मित करत होता. मी मात्र खूप गंभीर होतो,

"या सगळ्यांत तुम्ही लिलावतीबाईंना का नाही वाचवलं? तुम्हाला जर माहिती होतं, विरेन त्यांना संपवणार आहे, तर मग का नाही तुम्ही त्याला रोखले? लिलावतीबाईं तर निष्पाप होत्या ना? मग का नाही?" मी उद्विग्नपणे विचारले.

"एव्हरी वन हॅस टू डाय समडे! देन व्हय बॉदर टू सेव देम?! आय डोन्ट सेव पीपल; आय ओन्ली पनिश डिलीग्विन्ट्स!" तो क्रूरपणे म्हणाला,

"आणि तसं ही त्या मरणं हे त्यांच्यासाठी चांगलंच होत्या. त्रास सहन करण्यापेक्षा त्यांना मृत्यू आला हे बरेच. शिवाय विरेन बिल भरण्यास असमर्थ झाला असता, तर तुला काय वाटते, हॉस्पिटलने काय केले असते?" हा त्याचा मला प्रश्न.

'म्हणजे या जगात मिस्टर वाघ एकटाच क्रूर नाही! निदान तो इतरांसारखा स्वार्थासाठी, तरी कोणाला मारत नाही!' मी मनाशीच बोललो.

"मग बाबाराव देसाईंना नक्की मारले कोणी?" माझा मिस्टर वाघला प्रश्न.

"मीच!"

मी चक्रावून गेलो... माझा पुतळाच होणे बाकी होते...

"ती माऊसर देखील त्यांचीच!" तो उठत म्हणाला,

"ती पहिल्यापासून माझ्याकडेच होती. समर नकातेला अडकवण्यासाठी त्याच्या फ्लॅटवर मी ती सोडली होती.

हा त्याने मला दिलेला आणखी एक धक्का...!

"पण का?"

माझ्या प्रश्नाचे उत्तर न देता तो उठला. बाजूच्या टेबलवरची एक लाकडी पेटी त्याने उचलली.

"कुठे जाताय?"

"सुशांत निकम अजून जीवंत आहे!"

ती पेटी घेऊन तो बाहेर पडलाही.

'म्हणजे आणखी एक खून...?'

# फायनली ट्रूथ वॉज् रिविल्ड्

दुसऱ्या दिवशीच्या पेपरमध्ये,

**"निकम फौंड्रीचे मालक सुशांत निकम हे 'घोणस' या अत्यंत विषारी जातीचा साप चावल्याने घरी मृत आढळले..."**

या मथळ्याची ही भली मोठी बातमी.

मी समजून चुकलो. काल मिस्टर वाघने माझ्यासमोरून जी पेटी नेली, त्यात 'घोणस' होती...!

अजूनही बरीच प्रश्न अनुत्तरीत होते. एक तर त्याने बाबाराव देसाईंना का मारले? ते तर समाजासाठी काम करायचे. त्यांनी कोणता गुन्हाही केला नव्हता.

दोन, त्यांच्या नातेवाईकांचे काय अपराध होते, की त्याने एवढे मोठे हत्याकांड घडवून आणले.

आणि तीन म्हणजे बाबारावांवर चालवलेली माऊसर समर नकातेकडे सापडली. त्याच्याकडील रेकॉर्ड्सनुसार बाबू सुतारने बाबारावांना ठार मारण्याची सुपारी दिली होती. पण मग उंचीचे काय? शिवाय बाबारावांच्या अटॉप्सी

रिपोर्टनुसार त्यांचा खुनी त्यांच्यापेक्षा उंच असणार होता. समरची उंची तेवढीच होती का? असणारच त्याशिवाय समरच बाबारावांचा खुनी आहे यावर नवीन, कार्तिक, वरुण यांनी विश्वास ठेवला नसता.

इकडे मिस्टर वाघ म्हणतोय, की त्यानेच बाबारावांना मारलंय. हे त्याने कसे साध्य केले?

खूप विचार केल्यानंतर माझ्या लक्षात आले, की शेवटच्या प्रश्नाचे मिस्टर वाघने या उत्तर मला आधीच दिले आहे.

मिस्टर वाघने बाबारावांचा खून करण्याआधी समर नकाते मिस्टर वाघकडे दुसऱ्याच एक केस संदर्भात आला होता. म्हणजे बाबारावांना मारतेवेळी या प्रकरणात समर नकातेला अडकवायचे हे त्याने आधीच ठरवले असणार आणि म्हणूनच त्याने समर नकातेची उंची लक्षात घेऊन बाबारावांच्या लंबर व्हर्टिब्रेवर गोळी मारली होती!

पण मग अजून एक प्रश्न उभा राहतोच, की त्याने इतक्या जवळून बाबारावांवर गोळी चालवली कशी? आणि तेही त्यांच्याच माऊसरने?

असे तर नाही, की मिस्टर वाघच्या क्रूर कृत्यांमुळे बाबाराव देसाईच त्याला मारायला गेले असतील आणि मग त्यानेच बाबारावांना मारले?

नाही! मिस्टर वाघ असे कधीच सत्याची बाजू असणाऱ्या माणसाला मारत नाही. तसं नसतं, तर त्याने नवीन, कार्तिक, वरुण यांना जीवंत सोडलंच नसतं...

शिवाय मिस्टर वाघ इतकं बेमालूम काम करतो, की कोणाला त्याची भणकही लागत नाही. मग बाबारावांना मिस्टर वाघबद्दल कळेलच कसे?

दुसरी गोष्ट अशी दिसून येते, की उतार वयानुसार बाबाराव देसाई मवाळ झाले होते. नाही तर बाबूला त्याचा धंदा बंद करण्यासाठी त्यांनी विनंती केली नसती. त्याला मारूनच टाकले असते...

ते मवाळ होते म्हणूनच तर त्यांना सांभाळण्यासाठी नातेवाईक नकार देण्याची हिंमत करू शकले होते...

विचार करत बसलो होतो. हातात पेपर तसाच होता. पानही पालटले नव्हते. ती बातमी तशीच समोर होती आणि मी शून्यात...

इतक्यात दारावर टकटक झाली. आईला मी बघतो म्हणून सांगून बाहेर आलो. समोर इन्वेलोप पडले होते. इन्वेलोपवर आमचा किंवा पाठवणाऱ्याचा पत्ता नव्हता. पोस्टमनने नक्कीच टाकली नसणार. मग कोण? मी इन्वेलोप उघडला. त्यात एक चिठ्ठी आणि युस्ड् बुलेट होती. मी चिठ्ठी उघडून पाहिली...

"सूरज!"

चिठ्ठी वरचं मी माझं नांव वाचलं आणि मिस्टर वाघने मला हाक मारल्याचा मला आभास झाला.

ती चिठ्ठी मिस्टर वाघची होती. म्हणजे ही गोळी बाबारावांना मारण्यासाठी वापरलेली तर...

पुढे लिहिले होते,

"मी तुझ्याकडे का येतो माहिती आहे तुला?"

मी नकारार्थी मान हलवली.

"कारण मी स्वतःला तुझ्यात पाहतो! याला कारण काय हे मला नाही सांगता येणार, पण मी ज्यावेळी तुझ्या वयाचा होतो, तेव्हा मी तुझ्यासारखाच होतो. त्यामुळे मला तूच लोकांपर्यंत नीट पोहोचवू शकशील असे मला वाटते...

"होय! तू म्हणतोस तसा मीही गिल्टी आहे. म्हणूनच तर मलाही वाटते कुठे तरी मोकळे व्हावे म्हणून तर येतो तुझ्याकडे. रिता होण्यासाठी!

"मला सांग, गुन्हेगारांना शिक्षा करणे चूक आहे का? माझा सिस्टीमवर विश्वास नाही. मला एक सूंदर जग बनवायचंय. म्हणून मग मीच कायदा हातात घेतला!

"चूक - बरोबर याच्या मी खूप पलीकडे गेलो आहे!"

आज आई घरात होती. म्हणूनच तो घरात आला नव्हता.

तो जवळपासच कोठेतरी असेल, असे वाटून मी इकडे तिकडे पाहिले. दूर उभारून तो माझाकडे पाहत होता. मी त्याच्याकडे पाहिले, पण माझ्या नजरेत गिल्ट होता. हे पाहून तो गंभीर झाला.

रात्रीची ९:१७ ची वेळ. पार्क रिकामे होते. बाबाराव पार्कच्या मध्यभागी घनदाट झाडीत कोणाची तरी वाट बघत थंडगार बाकावर बसले होते...

थोड्या वेळाने एक व्यक्ती तेथे आली. झाडी पार करून एक मंद प्रकाश झोत त्या व्यक्तीवर पडला.

"आलात तुम्ही विजय वाघ!"

बाबारावांनी वर पाहत तो मिस्टर वाघ असल्याची खात्री करून घेण्यासाठी विचारले.

"होय सर. मीच आहे! बोला ना काय काम होतं?"

"मी तुमचं खूप नांव ऐकून आहे. सामाजिक कार्य करत असताना अनेकदा पोलिसांशी संबंध येतो. सगळया पोलीस डिपार्टमेंटमध्ये आपल्याच नांवाची चर्चा असते."

बाबाराव हातातील काठीवर भर टाकत उभे राहत म्हणाले.

"आपल्या इतका मोठा मी नक्कीच नाही सर!" पुढे होत त्याने बाबारावांना हात दिला.

"उठू नका. बसा." त्याने आग्रह केला.

बाबारावांनी नकारार्थी मान हलवली,

"असू देत."

"बोला ना सर, काय काम होतं?"

"खरंच कराल मी सांगेन ते काम?" त्यांनी खूप आशेने मिस्टर वाघच्या नजरेत पाहत विचारले.

"का नाही सर? बोला ना, काही गुन्हा घडलाय, की कोणाला शोधून काढायचंय?"

बाबारावांनी पुन्हा नकारार्थी मान हलवली.

"त्च्च! शोध संपवायचं!" शून्यात पाहत ठामपणे ते म्हणाले. त्याच्या डोळ्यांत आशा मात्र तशीच होती.

"म्हणजे? कशाचा?" मिस्टर वाघने विचारले.

बाबारावांनी मिस्टर वाघकडे पाहिलं.

"या आयुष्याचा!" ते म्हणाले.

"मी समजलो नाही सर..."

"आई मला पायलट होता येईल नका गं? मला भुर आकाशात उडायंच आहे..." प्रभाची मुलगी तिला विचारत होती.

प्रभा काहीच बोलली नाही.

"बोल ना गं आई..." मुलीने हट्ट धरला.

प्रभा काहीच बोलत नाहीही पाहून ती प्रभाच्या हाताला हिसके देऊ लागली.

"पणजोबा जोपर्यंत जीवंत आहेत तोपर्यंत आपल्याला खर्च कसा आवरणार काही सांगता येत नाही..." मुलीच्या हलवण्याने तिच्या डोक्यातील विचार असा तोंडावाटे बाहेर पडला होता.

"मग मी मोठी होईपर्यंत खापर पणजोबा मरतील ना? होय ना आई?"

आपण काय बोलतोय हे समजत नसलेल्या त्या मुलीने विचारले.

"नक्की मरतील!"

असे म्हणत बाहेरून आलेल्या बाबारावांनी हसत मुखाने त्या मुलीला उचलून कडेवर घेतले.

प्रभा भानावर येऊन त्यांच्याकडे बघत राहिली. अपराध बोधाने तिचे डोळे भरून आले होते.

बाबाराव मात्र काहीच झाले नाही अशा रीतीने मुलीला खेळवू लागले...

"तिची तरी काय चूक म्हणा? नवऱ्याला डोक्याला मार लागलाय. वर्षभरापासून त्याचे औषध - पाणी चालू आहे. तसे नसते, तरी शेखरच्या पगारात आमचे भागणे कठीणच. मी हा असा. काम करण्याचे वय राहिले नाही, समाजाच्या उचापती मात्र करतो. त्याची भीती तिला असणारच. घरचा कर्ता पुरुष आणि नवरा जाण्याची कामना ती कशी करेल. मग राहतो मीच..." ते पुढे बोलले नाहीत.

हे बोलत असताना कमालीचा शांत, वैरागभाव त्याच्या चेहऱ्यावर होता.

"यात मी काय करू शकतो?" कधी नव्हे तो मिस्टर वाघ अस्वस्थ झाला होता.

"मला मारून टाक!"

ते कसलाही विचार न करता बोलून गेले. पण नाही! ते सगळा विचार करूनच आले होते!

"म... मी?" मिस्टर वाघ चपापला.

अशी अवस्था होण्याची ही त्याची पहिली वेळ असेल.

"माझं आयुष्य संपलंय. प्रमाणापेक्षा जरा जास्तच जगलो. हात - पाय चालत नसतानाही जगण्याची वासना ठेवणं या सारखं पाप नाही. शेखर आणि प्रभाचं आयुष्य आहे, जगू दे त्यांना.

"आजपर्यंत ताठ मानेनं जगलोय. त्यामुळे सद्सद्विवेक बुद्धी आत्महत्या करू धजत नाही. मला इच्छा मरण हवंय. म्हणून याशिवाय पर्याय नाही. मग मग कोण मला मृत्यू देऊ शकेल?

"मग तुझ्या सारख्या कर्तव्यनिष्ठ आणि प्रामाणिक माणसाकडून मृत्यू आला तर बरं होईल असा माझा विचार झाला."

"पण... पण मीच का?" मिस्टर वाघ जड आवाजाने म्हणाला.

मिस्टर वाघच्या या प्रश्नावर ते हसले.

"मला माहिती आहे, असे अनेक जण आहेत जे खुषीने मला मारतील, पण लायकी नसलेल्या लोकांकडून मरण म्हणजे मृत्यूचा पण अपमान. म्हणून!"

या अवस्थेतही बाबारावांनी आपला स्वाभिमान गमावला नव्हता. त्यांचा मरणाचा निर्णय हे त्याचेच तर द्योतक होते...

"काळजी करू नको. मी पत्र लिहिले आहे, की हे माझ्या इच्छेने झालंय. त्यामुळे तुला दोषी ठरवू नये." त्यांनी पत्र खिशातून काढले आणि घडी न उघडताच मिस्टर वाघला दाखवले.

"पण मी फी घेतल्याशिवाय काम करत नाही. माझी फी?"

पाणावलेल्या डोळयांनी बाबारावांना या निर्णयापासून परावृत्त करण्यासाठी त्याने शेवटचा प्रयत्न करून पाहिला.

आणि त्यांनी त्यांची लोड केलेली माउसर सी नाईन्टी सिक्स त्याच्या समोर धरली...

"पैसे नाहीत, पण याची किंमत आज दहा लाखांच्या आसपास तरी असेल." ते म्हणाले.

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासाचा एक भाग त्यांनी हात धरला होता. दहा लाखांची नाही, तर एक अमूल्य वस्तू होती ती. या पिस्टलनेच तर बाबाराव देसाईंनी वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी ब्रिटिश जनरल ऑगस्टसचा वध केला होता आणि आज याच पिस्टलने...

ज्या माऊसर व हातानी एकेकाळी एक क्रांती घडवून आणलेली; तीच माऊसर आता त्याच हाताला निश्चल करणार होती...

पाणावलेल्या डोळयांनी मिस्टर वाघने ती माऊसर हाती घेतली. पण बाबारावांच्या डोळयांत डोळे घालून त्यांना ठार मारणं त्याच्यासाठी शक्य नव्हतं. म्हणून तो त्यांच्या मागे जाऊन उभारला...

**'शूटऽऽऽ'**

माऊसरचा आवाज त्या शांत वातावरणात घुमला...

आपल्या घरट्यात शांत झालेले पक्षी घाबरून ओरडू लागले...

आणि भटकी कुत्रीही बावरून भुंकू लागले...

त्या वातावरणात एकच विदारकता निर्माण झाली...

'उपहास बघ. एकेकाळचा इतका श्रीमंत माणूस आज त्यांच्यावर ही वेळ यावी?! बाबाराव देसाईंसारखा धाडसी, महान आणि समाजाला आदर्श असणारा व्यक्ती आत्महत्येला प्रवृत्त व्हावा ही गोष्ट जर समाजाला कळली असती, तर त्यांच्या प्रतिमेला तडा गेला असता. म्हणून मी माझे निर्दोषत्व सिद्ध करणारी ती चिठ्ठी नाहीशी केली. आणि म्हणूनच मला हा सारा प्रपंच रचावा लागला. हा एक एवढा मोठा खेळ...'

एका व्यक्तीचा स्वाभिमान टिकवण्यासाठी याने संपूर्ण देश ढवळून काढला होता...

'बाबारावांच्या नातेवाईकांचा इतका मोठा काय गुन्हा होता, की मी या सगळयांना मारले असे तुला वाटते होय ना?

'एका म्हाताऱ्याला सांभाळणे या लोकांना इतके जड झाले होते, की त्या म्हाताऱ्याला मरणाची इच्छा व्हावी?

'हे असे लोक जगत नाहीत. किड्यांसारखे फक्त सर्वाईव्ह करतात, मग हे असले स्वार्थी अप्पलपोटी लोक मेलेच तर काय वाईट?!'

पत्रातून त्याने मला विचारलेला हा प्रश्न वाचून मीही अंतर्मुख झालो. आणि मग ही घटना सर्वांसमोर ठेवायचीच असं ठरवून ही कथा लिहून काढली...

पत्रात पुढे,

'मला माहित आहे एवढ्या उत्तरावर तुझं समाधान होणार नाही. लेट्स सम ऑफ धिस इव्हेंट, म्हणजे मी हे का केलं ते तुझ्या लक्षात येईल.

'दिनेशने बाबारावांची जबाबदारी नाकारलीच. पण तो बाबारावांना वाट्टेल ते अर्वाच्य बोलला. यातून त्याने आपल्या उन्मत्तपणाच आणि माणूस म्हणून जगण्यास तो किती नालायक आहे याचं दर्शन घडवून आणलं. शेखरसाठी त्यांनी जमीन विकली हा राग त्याला होताच.

'विरेनला ऑब्शन होता लीलावतीबाईंचे व्हेंटिलेटर रीतसर काढण्याचा. पण त्याचा स्वार्थ त्याला नडला. बाबारावांना सांभाळण्यासाठी त्याने नकार दिला, तो त्याच्या आईची लीलावतीबाईंची त्याला काळजी घ्यायची म्हणून नाही; तर त्यांनी त्यांची जमीन प्रभाच्या नवऱ्यासाठी शेखरच्या उपचारासाठी विकली. त्याला त्यातून काही मिळाले नाही म्हणून.

'विरेनची बायको वरकरणी निष्पाप वाटते, पण नीट विचार केल्यास, तर लक्षात येईल, की विरेन त्याच्या आईला मारणार आहे हे तिला आधीपासून माहिती होते, तरी ती गप्प बसली. त्यामुळे तीही त्या दोषात सहभागी झाली. आणि मृत्यूस पात्र ठरली.

'शेखर आणि प्रभाचे पाहिले, तर बाबाराव ज्या रात्री मला भेटले, त्या रात्री त्याच्या जेवणातून त्यांच्यावर विषप्रयोग करण्यात आला होता. ही गोष्ट बाबारावांना माहीत होती. म्हणून तर त्यांनी निर्णय घेऊनच टाकला, की आता बास! संपवावं हे सगळं. त्यांचा राग मात्र कुणावरच नव्हता. आपल्याला इतके दिवस सांभाळणाऱ्या शेखर आणि प्रभावर त्यांच्याच खुनाचा कलंक लागू नये म्हणून ते मला भेटले होते. आणि हे सगळं त्यांनी मी निर्दोष असल्याच्या पत्रात नमूद केले होते.

'मला माहिती आहे, प्रभाच्या मुलीविषयी तुला काळजी वाटत असेल, पण काळजी करू नको. तिला मी काहीही केलेलं नाही. बऱ्या - वाईटाची समज अजून तिला यायची आहे. त्यामुळे ती माझ्या नजरेत निष्पापच आहे. तिची मी एक चांगल्या अनाथाश्रमात सोय केली आहे. बाबारावांची केस सोल्व्ह करण्यासाठी मिळालेला सगळा पैसा मी तिच्या नांवे ठेवला आहे. या उपर तिची स्वप्न पूर्ण करण्याची सगळी जबाबदारी आता माझी आहे..."

मिस्टर वाघ मला कळलाय असं जेव्हा - जेव्हा मला वाटायला लागतं, तेव्हा तो असं अनपेक्षित काही तरी वागतो. आणि माझ्या समजुतीवर पाणी फिरते...

त्याने त्याला कमी - जास्त प्रमाणात गिल्टी वाटत असलेल्या माणसांना त्याच क्रमाने संपवले होते.

कमी गिल्टी असलेल्याला जरा जास्त जगण्याची मुभा... पण मिस्टर वाघकडून मृत्यू अटळ...

मला खात्री आहे, लिलावतीबाई ज्या हॉस्पिटलमध्ये होत्या त्या हॉस्पिटलचे सर्जन्स्, डीन, ओनर्स्, बोर्ड मेम्बर्स्, इत्यादी हॉस्पिटलशी रिलेटेड् सगळे देखील मिस्टर वाघचे शिकार होतील. त्यांच्यामुळेच, तर विरेनने आपल्या सख्या आईचा खून केला होता...

पण वाटते, जर हे मिस्टर वाघ असंच वागत राहिला, तर उद्या कोणी रस्त्यावर थुंकलं तरी हा त्याचा खून करेल... हा सायको तर नाही ना?...

नाहीच! असा इतका बुद्धिमान व्यक्ती सायको कसा असू शकतो?!

आजपर्यंतच्या आयुष्यात मी पाहिलेल्या लोकांमध्ये मिस्टर वाघ हा सर्वात संयमी आणि स्थिर बुध्दीचा माणूस मला भेटला आहे.

पण मिस्टर वाघसाठी भीतीही वाटते, गुन्हेगारांना मृत्यू देणाऱ्या मिस्टर वाघचा स्वतःचा मृत्यू कसा असेल?...

**समाप्त...**

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन
सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान